It is observed the three different outcomes- physical, psychological, and behavioral-might result from being a victim of elder abuse besides physical problems for the elderly. Such as depression fear, helplessness, low self esteem and problems relating to eating and sleeping "Depression among the victims is particularly problematic as it may prevent them from seeking alternatives to their current situation".

According to Gribson (1985) the elderly, play an important role in socialization and care of grand children. Further they play roles as advisors, counselors, arbitrators, and repositories of knowledge about traditions, customs, and oral history. So the status of elderly is affected by these factors.

Senior citizens are a treasure to our society. They have worked hard all these years for the development of the nation as well as the community and family. They possess a vast experience in different walker of life. The youth of today can gain from the experiences of senior citizens in taking to nation to grater heights. At this age of their life the need to be taken care of and made feel special. So it is our duty to provide them all facilities and look after them, because they are pillars of our life community & nation.

-------------------------------------------------

References:

1. Dandekar (1996): Elderly in India, Sage publication India Pvt. Ltd. New Delhi.

2. Bali Arun (1994) "Aging and social care: Trends and polices" Help Age India.

3. Mishra P. (1981) "Social Adjustment in old age" B.R. Publishing Corporations New Delhi.

-------------------------------------------------

# ROLE OF PARENTS IN CURBING THE TREND OF RAVES CULTURE AMONG YOUTH

**Rajshri Gajghate**, Asst. Prof., Smt.Binzani Mahila Mahavidyalaya, Mahal, Nagpur.

It becomes a greater responsibility of peer group especially the parents who can understand the mentality of his son or daughter and divert them from this abusive culture. It's a time to let your kid know that you know that what happens at raves and you are aware of the drug use at these parties. Now it is a good time to reinforce your family's rules against drugs. Parents, police and people at large need to join hand and deal sternly with such immoral activities and protect innocence of entire generation which is under threat.

**Introduction:** Now a day's every newspaper, weekly and national news forum is ablaze with the news of raids on party pubs, hotels, and events where the teenagers shake their legs with many dangerous types of amusements. This reveals the shocking side of our youngsters and a disturbing social trend. The demon of Raves, rain parties and pool parties is devouring the youth. Wards of rich and famous are often found in an inebriated condition and entire generation of parents with teenagers is now a worried lot. Why it happens? The increasing trends of Rave culture are stealthily creeping in our social life.

The aim of this paper is to ponder upon the causes and effect of partying culture among young generation and role of parents in guarding against it. Special focus will be on Rave parties.

**Raves Culture:** * 30.2% of students had been offered drink in their life. * 47.2% of students had used Marijuana before their 13th year. * .5% of students had used cocaine duringtheir life time. * 81% of students had at least 1 drink during their life time.

This is the shocking Annual Survey conducted by Centre for Disease Control [CDC].

Across the country, teens and young adults enjoy all night dance parties known as' Raves' increasingly encounter more than just music. Raves emerged in U.K., youth culture in the late 1980s, having started amidst the party atmosphere of Ibiza, a Mediterranean island frequented by British youth on vacation. Now it has extended and crept in every part of the Globe.

**Drug abuse in Raves:** Youngsters are thrilled to have an experience of some powerful drugs. Dangerous substances are known collectively as club drug including Ecstasy, GHB and Rohypnol which are gaining popularity.

Rave parties are dance parties that future fast-paced, repetitive electronic music and accompanying light shows.

Rave culture is a youth oriented subculture that blends music, art and social ideals with the use of illicit drugs to boost up the energy.

These drugs can produce a range of unwanted effects, including hallucinations, paranoia, amnesia and death also. Studies suggest club drugs found in party setting are often adulterated or impure and thus even more dangerous. As they are colourless, tasteless and odourless, they are easy to slip in drinks. Some of these drugs have been associated with sexual assault. So they are called as 'date rape drugs'.

**Causes of increasing partying culture:** Why there is a need to take drugs for the young generation? There are so many issues related to the drug addiction and increasing partying culture. Some are social, personal and psychological. Some of them are enlisted as:- * Nuclear Family System. * Double- income group family. * Modern and westernized fashionable trend. * Lack of communication between parent and a child. * Peer pressure and lack of decision making. * Absence of inculcating moral values. * Misguided youth.

There are many more issues which contribute towards the increasing partying culture amongst youth.

**Rave-related concern for Police and peer group:** Due to Raves culture following social problems raises their heads, such as:- * Drug overdose and medical hazard. * Drug Trafficking. * Noise pollution. * Driving under the influence of drug. * Traffic control and parking congestion. * Problems due to music club. * Assault in and around bars. * Theft in parking area. * Street level drug dealing. * Clandestine Drug labs. * Use of drugs in rape. * Other family and personal problems.

**Environmental Risk factors at Raves:** Various environmental risk factors are caused due to Raves. Such as heat and humidity are generated by the large crowed of people whose body temperature rise due to strenuous dancing and chemical effect of rave-related drugs, lack of good ventilation. Prolonged exposure to loud music can cause temporary or permanent hearing loss. Sound level at many Raves is around 135 decibels, which can cause hearing loss.

**Role of Parents in stopping pervert partying culture:** It becomes a greater responsibility of peer group especially the parents who can understand the mentality of his son or daughter and divert them from this abusive culture.

**1) Have open interaction with their wards:** Noted surgeon Dr Prashant Nikhade said that a powerful interaction with children can build a good bond between them, and inculcate good values in them. Parents themselves need introspection. They should know their child's friend circle and night life, source of income.

2) **Spend quality time with children:** Many parents also agreed about need to involve children in family affairs and project good side of our culture, rituals, festivals, celebration and at the same time made them aware about pitfalls of

blind imitation of socially undesirable, morally corrupt practices aped by spoilt brats. Noted surgeon Dr. Mukund Thakur has advised parents to keep a close watch on child's activities and also social media accounts. He said that parents must allow his privacy, but retain some control. Don't take your children casually, but maintain atmosphere of openness.

3) **Punish erring youngsters as well:** Dr. R. Krishnakumar, V.C. of YCMOU said that parenting at home in very important. Parents must be aware of the changing culture. Develop confidence among to make good bonding with them. At the same time children committing mistakes should be punished else they would become wayward and it would have greater impact on society.

4) **Develop openness with the wards:** Rita Dhanwate, noted theatre personality is of the opinion that police is not executing their duties properly. It should be made mandatory for the hotel owners to check identities of children and age too. Parents should openness in their homes only and keep as watch guard on children.

5) **Stop such Rave parties:** Apart from harmful effects on the body, youth waste their time in such things which is only for self- satisfaction. Swami Vivekanand has said that 'youth is the real wealth of the nation'. We have so many exemplary personalities. So peer group should take serious actions to stop such rave parties.

6) **Keep tab on social Media:** Most of the successful professionals confirmed that their kids never go to such parties. But a misleading propaganda about party culture sweeping the entire generation has been unleashed and new social networking websites like Face book, Twitter and SMS is keeping it personal and parents are kept at a bay by some youngsters who are swept away and allured by vested interests.

**Some tips for parents:** * Listen to their daily experiences without judging their choice. * Check out their styles of clothing. * Know who their role models are. * Check out their entertainment. * Become a techno-savvy parent. * Build an emotional shock-up in your kid.

**Conclusion:** So, it's a time to let your kid know that you know that what happens at raves and you are aware of the drug use at these parties. Now it is a good time to reinforce your family's rules against drugs.

Parents, police and people at large need to join hand and deal sternly with such immoral activities and protect innocence of entire generation which is under threat.

--------------------------------------

**Notes and references:-**

1. Micheal. S. Scott- The problem of rave parties. (Centre for problem Oriented policing) POP Conference on Oct.22-24.2012.
2. Asha Mishra- Youth ki Awaaz; The Party Culture 'Join me for a cocktail-6 June 2012-09-26
3. Parents: The anti Drug: Is your teen Using?
4. Talking to teens- About.com.Teens.
5. Annual Survey Conducted by Centre for Disease Control (CDC)
6. The Hitvada: City Line.Page 12: 'Parents and Police should act together to stop partying culture-Tues. Aug. 28. 2012.

# भारतातील बालहत्त्येची समस्या आणि फुले दाम्पत्याचे बालहत्या प्रतिबंधक गृह

**प्रा. डॉ. टी. जी. गेडाम**, संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा, जि. नागपूर.

आज भारतीय समाजात स्त्री–पुरुष समानता निर्माण झाली आहे. या समानतेचे प्रणेते महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले हे ठरतात आणि म्हणूनच आज आपल्या देषात स्त्री–पुरुषाच्या बरोबरीने प्रगतीचे एक–एक षिखर काबीज करित आहे. ही देण समाजसुधारणेच्या कार्यात अग्रणी असलेल्या फुले दाम्पत्याची आहे. पण एवढ्यानेच समाधान माणून चालणार नाही. कारण आजही स्त्री रुढी–परंपरापासून व आपल्या समस्या पासून पूर्णपणे मुक्त झालेली नाही.

**प्रस्तावना** :– भारतात हिंदू धर्माने जी समाजव्यवस्था निर्माण केली होती ती पूर्णपणे धर्माधिष्ठीत होती. त्यात ही समाजव्यवस्था पुरुष प्रधान. यामुळे पुरुषप्रधान संस्कृतीने रुढी–परंपरांची भक्कम अषी तटबंदी उभारुन स्त्री जातीवर नानाप्रकारची बंधणे लादली. यामागे पुरुषी एकाधिकाराचीच भावना दिसून येते. बालविवाह, जरठ विवाह, सती प्रथा, विधवा पुनर्विवाहाला बंदी, देवदासी प्रथा, केषवपनाची प्रथा इत्यादि सर्व प्रथा फक्त स्त्रीयांवरच लादण्यात आल्या. पुरुष वर्गाने मात्र स्वतःवर कोणतेही निर्बंध लावून घेतले नाही. अगदी वैदिक काळापासून विचार केला तर अतिकडे ब्रिटीष काळापर्यंत आपल्या समाजात स्त्री जातींवरिल या सर्व प्रथांचे काटेकोरपणे व बिनबोभाटपणे पालन होत आल्याचे दिसून येते. आपल्या समाजात या रुढींचा एवढा अतिरेक झाला की, स्त्री ही पुरुषाची कायमची गुलाम बनली. यामुळे भारतीय समाजात मुलीचा जन्मच अषुभ मानला जाऊ लागला. पुरुषी वर्चस्वातून आणि श्रेष्ठत्वाच्या भावनेतून स्त्रियांवर ही सर्व बंधने लादली गेली व तिचे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन तिला परावलंबी बनविण्यात आले. यामुळेच स्त्री ही पुरुषाची मालमत्ता मानली जाऊ लागली.

या पुरुषी वर्चस्वाला धर्मग्रंथांनी बळ दिले होते. धर्मग्रंथाची ही तटबंदी तोडणे कुणालाही शक्य नव्हते. कुणी याच्या विरोधात बोलण्याचा प्रयत्न जरी केला, तरी त्याला धर्मद्रोही ठरविले जाई. परंतु या अनिष्ठ रुढी–परंपरांमुळे अनेक निरागस बालिका आणि स्त्रियांचे संपूर्ण जीवनच उध्वस्त होत होते, याचीही समाजाला पर्वा नव्हती. एवढे समाजमन बधिर झाले होते. एकून लोकसंख्येचा अर्धा हिस्सा असलेल्या या भारतीय स्त्रियांना ना षिक्षण घेण्याचा अधिकार होता ना संपत्तीचा अधिकार, ना कोणताही मान सम्मान ना कोणताही दर्जा. एकूनच पारतंत्र्यात व विषम परिस्थित स्त्रिया जगत होत्या. महाराष्ट्रातील समाजसुधारक गोपाळ गणेष आगरकर आपल्या सुधारक नावाच्या पत्रात लिहितात, ''पुरुष स्वामी–स्त्री दासी, स्वातंत्र्य पुरुषाकडे – पारतंत्र्य स्त्रियांकडे, विवाहाषिवाय स्त्रीस गती नाही व गृहाषिवाय तिला विष्व नाही. वैधव्य हे तिचे महाव्रत व ज्ञानसंपादन हा तिचा मोठा दूर्गूण.''[1] अषा धर्मविषयक कल्पनांना समाजात प्रतिष्ठा मिळालेली होती.

**शोध निबंधाचा उद्देष** :– 1) भारतातील स्त्रियांची स्थिती जाणून घेणे. 2) स्त्रियांवर लादलेल्या अनिष्ठ रुढींचा परामर्ष घेणे. 3) बालविधवांच्या परिस्थितीवर प्रकाष टाकणे. 4) बालविधवांच्या समस्येतून निर्माण झालेल्या बालहत्येच्या प्रष्नाविषयीची माहिती जाणून घेणे. 5) या समस्येचा समाजावर झालेला परिणाम स्पष्ट करणे. 6) बालहत्या थांबविण्यासाठी फुले दाम्पत्याने केलेल्या कार्याची माहिती जाणून घेणे. 7) स्त्री–पुरुष समानतेचा विचार अधोरेखित करणे.

या शोध निबंधात केवळ महाराष्ट्रातील स्त्रियांच्या स्थितीची मांडणी केली असली तरी यातून भारतातील एकूनच स्त्री जातीच्या स्थितीचे चित्र निदर्षनास येते. यामुळे हा विषय आपल्या देषातील संपूर्ण स्त्री जातीषी निगडीत असल्यामुळे व्यापक असा आहे. कारण संपूग्र भारतात स्त्री जातीचा कोंडमारा करणाऱ्या या अनिष्ठ रुढी–परंपरा मान्यता पावल्या होत्या. आणि या परंपरांमुळे संपूर्ण स्त्रिया परावलंबी बनून पुरुषांच्या गुलाम बनल्या होत्या.

**भारतातील बाहत्येच्या समस्येची पार्ष्वभूमि** :– भारतीय समाजात बालहत्या मोठ्या प्रमाणात सुरु होत्या. मध्यकाळात तर बालहत्येचे प्रमाण कमालीचे वाढलेले होते. व ही एक जटील समस्या बनली होती.

भारतात पूर्व वैदिक काळात ही प्रथा असावी असे दिसत नाही. परंतु उत्तर वैदिक काळात मात्र स्त्रियांवर असंख्य बंधणे लादली गेली. व त्यातून स्त्रियांची, यातही विधवा स्त्रियांची परिस्थिती बिकट बनली. येथेच बालहत्यांची समस्या जन्माला आली. कारण या काळात विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहावर पूर्णपणे बंदी घातली गेली. आणि दुसरीकडे याच काळात समाजात बालविवाहाची प्रथा सर्रासपणे सुरु असल्यामुळे बालविधवांचा प्रष्नही जटील बनला होता. एका बाजूला पुरुषांना कितीही विवाह करण्याची मुभा होती, पण स्त्रीने दूसरा विवाह केला तर तो निषिध ठरविला जाई. ''सन 1888 ला भारतात तीस वर्षाखालील 21 लाख स्त्रियांना विधवेचे जीवन जगावे लागत होते.''[2] हा आकडा विधवांच्या समस्येची भीषणता दाखविणारा आहे. 70–75 वर्षाच्या जख्खड म्हाताऱ्याषी 8–9 वर्षाच्या मुलीचा विवाह लावून देण्यात येत असे. व नंतर काही दिवसातच हा म्हातारा मरण पावला की ती बालवयातील मुलगी विधवा होत असे. यातही एक पुरुष अनेक स्त्रियांषी विवाह करित असे. एकेका पुरुषाने 100 च्या वर विवाह केल्याची उदाहरणे इतिहासात सापडतात. यामुळे एका पुरुषाचा मृत्यु झाला की त्यांच्या सर्व बायका विधवा होत असत.

यातील बऱ्याच विधवा स्त्रिया तरुण असल्यामुळे कधी आपल्यातील नैसर्गिक भावनेला बळी पडत तर कधी कुटूंबातील व्यक्तिच्या वासनेच्या बळी ठरत. आणि स्वतःवर मातृत्व लादून घेत. समाजाबरोबरच निसर्गही स्त्रियांवर आघात करित असे. या आघातामुळे समोर दोनच पर्याय उरत. एकतर आत्महया, नाहीतर भ्रुणहत्या. या स्थितीत स्त्री आपल्या मातृत्वाचा बळी देऊन नवजात बाळाला ठार मारित असे तिच्या या अघोरी, क्रुर कृत्याला ती एकटीच जबाबदार नाही तर हा समाजही तेवढाच जबाबदार होता. इ.स. 1837 ला एक तैलंग ब्राम्हण आपल्या लेखात लिहितो की, ''ज्या तरुण विधवेचे पाऊल कुमार्गाने पडते. ती गर्भपात करते किवा तो न साधल्यास तिची माता–पित्तरे गाव सोडून तिर्थ यात्रेस जातात. आणि परदेषात आपल्या पतीत अपत्याकडून घडलेल्या पापाचे कसे तरी प्रक्षालन करवितात.''[3] अषा प्रकारे समाजाच्या निंदा नालस्तीला घाबरुण अनेक कुटूंबांनी गावे सोडल्याची उदाहरणे आहेत. तर बऱ्याच स्त्रियांनी आत्महत्या केल्याचेही दिसून येते. बालहत्येच्या समस्येला जरठ विवाहही कारणीभूत ठरलेले आहेत. याबाबत महात्मा जोतिबा फुले म्हणतात,'' साठ सत्तर वर्शाच्या जरठांषी आर्य भटांनी पूर्वी लग्न लाविलेल्या स्त्रिया मरताच त्यांनी लावण्यवती अषा अज्ञानी मुलीबरोबर पुनःसंबंध करुन त्या अबलांच्या तारुण्यात माती कालवितात. परंतु बालपणी वैधव्य आलेल्या अज्ञानी मुलीने मात्र पुनः द्वितीय संबंध करु नये म्हणून कडेलोट प्रतिबंध करुन प्रचारात आणिला आहे.''[4]

एकूनच या बालहत्यांना तरुण विधवांची समस्या कारणीभूत ठरली होती. परंतु समाज या तरुण विधवांचा सहानुभूतीने विचार करायला तयार नव्हता. जणू काही विधवा स्त्री म्हणजे निर्जिव दगड आहे. असेच त्यांना वाटत असावे. यामुळे पुरुष प्रधान समाज विधवेच्या डोक्यावरिल केस काढून, तिचे केषवपन करुन तिचे सौंदर्य नष्ट करित असे. व तिला चार भिंतीत बंदिस्त करित असे. 1854 मध्ये हिंदू धर्माचे धर्मगुरु षंकराचार्य यांनी एका विधवेला तिच्या व्यभिचाराबाबत प्रायष्चित म्हणून षिक्षा सुनावली होती. ती अषी की, 'आंब्याच्या झाडाचा बुंधा कोरुन एक ढोली तयार करावी, तिच्यात त्या मुलीला बसवावे. बाहेरुन गवत–पाचोळा पेटवावा आणि बरिच धग लागल्यावर तिला बाहेर काढावे. नंतर तिचे केषवपन करावे आणि शेवटी सहस्त्र ब्राम्हणांना जेवन घालावे म्हणजे मुलगी शुध्द होईल.'[5]

भारतीय स्त्री एकदा विधवा झाली की, तिच्या दुःखाला पारावार राहत नसे. यातही ती जर तरुण असेल तर तिचे दुःख कल्पनातीत असे. विधवांना आपल्या समाजाने पुनर्विवाहाचा अधिकार नाकारल्यामुळे जे अनर्थ घडत होते, त्यांची अधिकृत माहिती तंतोतंतपणे आपल्याला मिळत नसली तरी काही प्रमाणात त्या काळात ती माहिती प्रसिध्द झालेली होती. लोकहितवादींनी आपल्या शतपत्रात 'पानसे नावाच्या सरदाराच्या घरात सत्तावन बोडक्या होत्या' असे लिहिले आहे. ते पुढे लिहितात की, '' मला खचीतच वाटते की, यामुळे एका जिल्ह्यात सरासरी ष्शंभर बालवध होत असतील. त्या मानाने पुण्यात व आसमंतात प्रान्ती ष्शंभर कोसात दोन तीन हजार लेकरे मारली जातात.''[6] त्याचप्रमाणे नारायने केषव वैद्य यांनीही आपल्या पुस्तीकेत लिहिले आहे की, ''1881 सालच्या खानेसुमारी रिपोर्टवरुन हिंदूस्थानातील पुनर्विवाह न होणाऱ्या ब्राम्हणवादी जातीतल्या विधवांचे हातून पंधरा वर्षात 12542 बालहत्या झाल्या अषी आकडेवारी दिली आहे.[7] या आकडेवारीवरुन बालहत्यांचा प्रष्न किती गंभीर होता याची कल्पना येते''.

म्हाताऱ्या पुरुषाषी अगदीच अल्पवयीन मुलीचा विवाह झाला म्हणजे स्वाभाविकपणे येणारे वैधव्य हे

स्त्रिच्या दुःखाचे महत्वाचे कारण होते. विधवांच्या दुर्दषेची दखल घेऊन त्याविषयीचे विचार जाहीरपणे महाराष्ट्रात प्रथमतः बाळषास्त्री जांभेकरांनी आपल्ल्या दर्पन नावाच्या पत्रात 1837 साली मांडले. पुढे 1884 मध्ये एक पत्रकार बैरामजी मलबारी यांनीही या प्रष्नात लक्ष घातले. विवाह झालेली मुलगी 12 वर्षाची होईपर्यंत पतीने तिच्यासोबत ष्शारीरसंबंध करु नये असा कायदा करण्याचा विचार सरकारने 1891 ला केला होता. परंतु या प्रष्नावर महाराष्ट्रात दोन गट पडले. परंतु याही स्थितीत हा कायदा सम्मत झाला. वयात येण्यापूर्वीच मुलीवर शारीरिक आघात होऊ नये व अकाली मातृत्व येऊ नये हा यामागील उद्देष होता. विवाहित स्त्रीचा जगण्याचा अधिकारच तिच्या पतीच्या मृत्यूबरोबर हिरावून घेण्याची दुष्ट अषी सतिची चालही भारतात रुढ होती. यामुळेच इंग्रजी राजवटीत सतीबंदीचा कायदा करावा लागला. त्याकाळात विधवांच्या आणि बालहत्यांच्या बातम्याही विविध वृत्तप्रत्रातून येत असत. त्यात लिहिले जाई की, अमक्या नदीत, अमक्या रस्त्यावर, अनाथालयात मुलांची प्रेते किवा सजीव मुले आढळून आलीत. बालविधवांवर अकारण लादलेले वैधव्य, त्यातून त्यांचा होणारा कोंडमारा आणि त्यांच्यातील न दाबता येणारी नैसर्गिक उर्मी यामुळे त्यांची स्थिती अतिषय  कठीण होत असे. अषा स्थितीत त्या परपुरुषाकडे आकर्षित होऊन शरिर संबंध करित व यातूनच त्यांना गर्भधारणा होई. परंतु समाजाच्या भीतीमुळे त्यांना बालहत्या करावी लागे.

**बालहत्येमागिल कारणे :–** 1) विधवा स्त्रीला अपत्यप्राप्ती होणे समाजमान्य नव्हते. यामुळे तिला आपल्या बाळाची हत्या करावी लागे. 2) विधवा  स्त्रिया तरुण  असल्यामुळे त्या आपल्यातील नैसर्गिक भावनांना बळी पडत व परपुरुषाच्या सहवासात येत. त्यामुळे त्यांना गर्भधारणा होई. परंतु समाजाच्या दृष्टीने हे पाप समजले जाई. हे पाप लपविण्यासाठी तिला बालहत्या करावी लागे. 3) बरेचदा  कुटूंबातील व्यक्तिच विधवा स्त्रीवर बलात्कार करित असे. यामुळे तिला गर्भ धारणा होई. हे कुटूंबातील व्यक्तिचे पाप लपवून कुटूंबाची अब्रु राखण्यासाठी तिला बाल हत्या करायला भाग पाडले जाई. 4) बरेचदा विधवा स्त्री ही परावलंबी असे. यामुळे तिला स्वतःचाही उदर्निवाह बरोबर करता येत नसे. यात जन्माला आलेल्या या बाळाच्या पालनपोषणाचा प्रष्न निर्माण होई. व यातून सुटका करुन घेण्यासाठी ती बालहत्या करित असे. 5)    विधवा स्त्रिला अपत्यप्राप्ती झाली की, ती लोकांच्या रोषाला बळी पडत असे. बरेचदा तिच्यावर शारीरिक, मानसिक अत्याचार केले जात. या भितीमुळेही ती जन्माला आलेल्या बाळाची हत्या करित असे.

**फुले दाम्पत्याचे बालहत्या प्रतिबंधक गृह :–** महात्मा जोतिबा फुले यांनी महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. भारतीय स्त्रीला पुरुषांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचे क्रांतीकारक कार्य म. फुल्यांनी केले. सक्तीच्या वैधव्यातून आपलाच समाज स्त्रियांना व्यभिचार करावयास भाग पाडत असे. यामुळे विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाचा अधिकार मिळावा यासाठी जोतिबांनी अथक प्रयत्न केले. या विधवा स्त्रियांची केविलवाणी स्थिती, त्यातही गरोदर विधवांची स्थिती पाहून त्यांचे अंतःकरण द्रवत होते. आणि म्हणूनच या पतित विधवा स्त्रियांना या गर्तेतून बाहेर काढण्याचा जोतिरावांनी निर्धार केला. त्यांना या कार्यात त्यांच्या सुविद्य पत्नी सावित्रीबाई यांनी मोलाची साथ दिली व या दाम्पत्याने विधवांची समस्या सोडविण्यासाठी खंबीरपणे पावले उचलली.

यासाठी फुले दाम्पत्यांने सुरुवातीला आपल्या घराषेजारीच एक घर भाड्याने घेतले व त्यात बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. वर्ष होते 1863 नंतर त्यांनी आपल्या घराषेजारीच स्वखर्चाने एक घर बांधले व हे बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु झाले. ''विधवा बायांनी गुप्तरितीने येवून व बाळंत होऊन, येथेच मुल ठेवून जावे अषी सोय तेथे करण्यात आली. या घराचा नंबर होता 395.''[8] याची माहिती लोकांना व विषेषकरुन विधवा स्त्रियांना व्हावी यासाठी पुणे शहरात ठिकठिकाणी भिंतीपत्रके लावण्यात आलीत त्यावर मजकूर होता, ''विधवांनो इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मुल न्यावे किवा इथे ठेवावे हे तुमच्या खुषीवर अवलंबून राहिल. त्या मुलाची काळजी हा अनाथाश्रम घेईल.''[9]

अषा प्रकारे या बालहत्या प्रतिबंधक गृहाची माहिती संपूर्ण पुणे शहरात पसरविण्यात आली. जी विधवा स्त्री येथे राहण्याचा विचार करित असे, तिला तेथे आश्रयही मिळत असे. या दृष्टीने हा विधवांचा अनाथाश्रमही होता. या गृहाद्वारा अडल्या–नाडल्या, फसविल्या गेलेल्या स्त्रियांची राहण्याची व त्यांच्या बाळंतपणाची विनामूल्य सोय जोतिबांनी केली होती. या सर्व विधवांची बाळंतपणे सावित्रीबाईच्या देखरेखीखाली होत असत. या कामात त्यांना चार प्रषिक्षित सुईनी (दायी) मदत करित होते. जोतीबांनी स्थापन केलेले हे बालहत्या प्रतिबंधक गृह सर्वच जाति–धर्माच्या स्त्रियांसाठी खुले परंतु प्रामुख्याने त्या काळात उच्च जातीतील विधवांचा प्रष्न गंभीर

बनला होता. यामुळे या बालहत्या प्रतिबंधक गृहात ब्राम्हण जातीच्या अनेक विधवा दाखल झाल्यात. व त्यांनी समाजापासून आपली अब्रु वाचविली तसेच छळापासून मुक्तीही मिळविली. येथे जन्माला आलेल्या बालकांपैकी काही बालकेच जगलीत. सावित्रीबाईच्या अथक परिश्रमामुळे व सेवेमुळे पुण्यातील 10–12 अर्भके काळाच्या दाढेतून बचावली गेली.'[10] 'याच बालहत्या प्रतिबंधक गृहात 1873 ला काषिबाई नावाची ब्राम्हण विधवा दाखल झाली. व तिने एका मुलाला जन्म दिला. सावित्रीबाईंनी स्वतः तिचे बाळंतपण केले. स्वतः मुलाची नाळ कापली.'[11] पुढे त्या मुलाचे नाव फुले दाम्पत्याने यषवंत असे ठेवले. नंतर त्याला दत्तक घेऊन त्याचे पालनपोषण करुन, षिक्षण देऊन डॉक्टर बनविले.'या बालहत्या प्रतिबंधक गृहात स्वतः सावित्रीबाईंनी 35 अर्भकांच्या नाळी कापल्या होत्या.'[12] या गृहात सावित्रीबाई तेथील मुलांची सर्व प्रकारची काळजी घेत. पोटच्या मुलांप्रमाणे त्यांचा सांभाळ करित. त्यांचे लालन–पालन करित. त्यांच्यासाठी कपडे षिवत. मुलांना सोबत घेऊन जेवन करित. या मुलांमध्ये वावरतांना त्यांना अतिषय सुख आणि आनंद मिळत असे. या माऊलीला स्वतःचे अपत्य नव्हते. पण तिने या सर्वांना आपले अपत्य मानले होते. जोतिबांनी स्थापन केलेले हे भारतातील पहिले बालहत्या प्रतिबंधक गृह असावे. अतिषय उदात्त हेतूने आणि परोपकाराच्या भावनेतून त्यांनी या गृहाची स्थापना केली होती. या कार्यासाठी त्यांची प्रषंसा तर दूरच राहिली, उलट पुण्यातील सनातनी मंडळी पेटून उठली. ''जोतिरावांना ते चांडाळ संबोधू लागले. ते संतापाने म्हणू लागले की, जोतिबा आपल्या वागणुकीमुळे सर्व समाजाला काळीमा लावत आहे.''[13] वास्तविकता अषी होती की, हेच सनातनी, विधवांवर अत्याचार करुन, त्यांना परंपरांच्या बेड्यात अडकवून त्यांना आत्महत्या व भ्रुणहत्या करायला भाग पाडत होते यामुळे खऱ्या अर्थाने तेच समाजाला कलंकीत करित होते.

जोतिबा फुले यांनी मुलींसाठी व अस्पृष्यांच्या मुलांसाठीही शाळा काढल्या होत्या. परंतु नंतर त्यांनी या शाळा देखरेखीसाठी अनेक संस्थांकडे सोपविल्या. यातील बऱ्याच संस्थाचे सभासद ब्राम्हण जातीतील लोक होते. परंतु जोतिबांनी आपले हे बालहत्या प्रतिबंधक गृह कोणाकडेही सोपविले नाही. याचा कारभार ते पत्नी सावित्रीला घेऊन स्वतःच पहात. याबाबत त्यांचे असे मत होते की, जे ब्राम्हण लोक आपल्या आया–बहिनींना विधवा म्हणून मानसिक यातना देतात, त्यांच्या डोक्यावरील केस काढून त्यांचे मुंडण करतात असे लोक या प्रतिबंधक गृहाला सांभाळण्यास पात्र नाहीत. जोतिबांनी या कामात सरकारचीही मदत घेतली नाही. कारण विधवा स्त्रियांवर होणारा अन्याय सरकारला दिसत असूनही सरकार या गुन्हेगारांना षिक्षा करित नाही किवा विधवांना कोणत्याही प्रकारची सुरक्षा प्रदान करित नाही याचे जोतिबांना आष्चर्य वाटत होते. आणि याबाबत त्यांना संतापही येत होता.

जोतिबांनी स्थापन केलेल्या या बालहत्या प्रतिबंधक गृहामुळे बालहत्यांचे प्रमाण कमी झाले होते. त्याचबरोबर या विधवा स्त्रियांना आश्रयही प्राप्त झाला होता. ज्यांना कुटूंबाने टाकून दिले. समाजानेही नाकारले अषा अनाथ, असहाय विधवा येथे आश्रयाला येत. जोतिबा–सावित्री त्यांना नुसता आश्रयच देत नव्हते. तर ते त्यांची सर्व प्रकारची काळजी घेत. तेथे त्यांना लिहायला–वाचायलाही षिकविले जाई. आणि वेगवेगळे व्यवसायिक षिक्षणही दिले जाई. जोतिबांचा हा अनाथाश्रम व बालहत्या प्रतिबंधक गृह अनेक वर्ष सुरु राहिले. या कामात त्यांना सामाजिक कळवळ असलेल्या अनेक लोकांची मदत मिळाली. परंतु समाजपरिवर्तनाचा वसा घेतलेल्या फुले दाम्पत्याला यासाठी समाजाषी संघर्ष करावा लागला.

**मुल्यमापन** :– मध्यकाळात बालविधवांची समस्या अतिषय गंभीर बनली होती. एका सर्वेक्षणा द्वारा सन 1891 च्या खानेसुमारीनुसार महाराष्ट्रात केवळ शून्य ते चार वर्ष वयाच्या विधवा झालेल्या, आईचे स्तनपानही न सुटलेल्या शैषवावस्थेतील निरागस बालिकांची संख्या 13878 एवढी होती.[14] या आकड्यावरुन महाराष्ट्रात बालविधवांचे प्रमाण किती मोठे होते, हे दिसून येते. परंतु हा आकडा फक्त चार वर्षपर्यन्तच्याच बालविधवांचा आहे. चार वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या विधवांचा आकडा तर याहून मोठा होता. हिंदू धर्मातील चुकीच्या रुढी–परंपरांमुळे विधवांचे काय हाल होत होते, याचा विचारही करवत नाही. तिचे केषवपन करुन तिला चार भिंतीत बंदिस्त तर केले जात होतेच, पण वरुन तिच्यावर नाना प्रकारची बंधणे घातली जात होती. या सर्व धार्मिक रुढींना धर्मग्रंथाचे अधिष्ठाण लाभल्यामुळे त्यांची समाजमनावर फार मोठी छाप होती. यामुळेच कुणीही या रुढींच्या विरोधात जात नसत. परंतु जोतिबा व सावित्रीबाई यांनी चुकीच्या धर्मरुढींना नाकारुन व समाजाचा रोष पत्करुन अतिषय मोलाचे कार्य केले. पुढे चालून त्यांच्या कार्यातून अनेकांनी प्रेरणा घेतली व महाराष्ट्रात अनेक ठिकाणी विधवांसाठी, स्त्रियांसाठी

अनाथ महिलाश्रम, विधवा आश्रम अषा संस्थांची स्थापना झाली.

खरे तर मनुष्याला जन्मतःच काही नैसर्गिक अधिकार प्राप्त होतात मग तो पुरुष असो की स्त्री. यात जीवन जगण्याचा अधिकार महत्वाचा मानला जातो. यालाच आज मानवाधिकार म्हटले जाते. परंतु आपल्या देषात धर्मरुढींनी विधवांचा हा अधिकारच हिरावून घेतला. होता. कुटूंबाच्या खोट्या प्रतिष्ठेसाठी आणि धर्माधिष्ठीत संस्कृतीच्या नावाखाली हजारो वर्षापासून या देषात अव्याहतपणे हे सुरु राहिले. आणि हेच संस्कृतीचा आदर्ष बनले. याला काय म्हणावे ? परंतु या देषात ब्रिटीष सत्तेच्या काळात एक फार मोठे स्थित्यंतर घडून आले आणि समाजाची आधूनिक युगाकडे वाटचाल होऊ लागली. याला कारणीभूत ठरले महाराष्ट्रातील समाज–सुधारकांचे कार्य. यातही महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचा कृतीषील लढा. या दाम्पत्याने स्त्रीला एक माणूस म्हणून दर्जा मिळवून दिला. माणूस म्हणून स्त्रीला काही अधिकार आहेत. ते अधिकार समाजाने तिला दिले पाहिजे, हा विचार त्यांनी समाजमनावर बिंबविला. प्रसंगी समाजाचा विरोध सहन केला, अपमान सहन केला, पण आपल्या कार्यापासून ते तसूभरही ढळले नाही. केवळ बोलून किवा लिहून भागणार नाही तर प्रत्यक्ष कृती केली पाहिजे हा विचार या दाम्पत्याने समाजाला दिला. त्यांनी केलेल्या कार्यामुळेच आज आपल्या देषातून स्त्रियां बाबतच्या अनिष्ठ रुढी–परंपरा हद्दपार झालेल्या आहेत. आज भारतीय समाजात स्त्री–पुरुष समानता निर्माण झाली आहे. या समानतेचे प्रणेते महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले हे ठरतात आणि म्हणूनच आज आपल्या देषात स्त्री–पुरुषाच्या बरोबरीने प्रगतीचे एक–एक षिखर काबीज करित आहे. ही देण समाजसुधारणेच्या कार्यात अग्रणी असलेल्या फुले दाम्पत्याची आहे. पण एवढ्यानेच समाधान माणून चालणार नाही. कारण आजही स्त्री रुढी–परंपरापासून व आपल्या समस्या पासून पूर्णपणे मुक्त झालेली नाही.

———————————————————

**संदर्भः–**


1. चपळगांवकर, नरेन्द्र व कुलकर्णी महेष, 'विकास संकल्पना आणि मार्ग, प्रकाषन – यषवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाषिक, प्र. आ. 2000, पृष्ठ क्र. 7
2. रानडे, प्रतिभा, 'स्त्री प्रष्नाची चर्चा – एकोणिसावे शतक', पॉप्युलन प्रकाषन, मुंबई, द्वि. आ. 1992, पृष्ठ क्र. 172
3. कित्ता, पृष्ठ क्र. 173
4. किर, धनंजय (संपा.) रा. ग. मालषे, 'महात्मा फुले समग्रवाड.मय,' म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1969, पृष्ठ क्र. 361
5. रानडे, प्रतिभा, 'स्त्री प्रष्नाची चर्चा–एकोनिसावे शतक', पृष्ठ क्र. 174
6. खोले, विलास (संपा.) ताराबाई षिंदे लिखित स्त्री–पुरुष तुलना', प्रतिमा प्रकाषन, पुणे, द्वि. आ. 1999 पृष्ठ क्र. 40
7. कित्ता, पृष्ठ क्र. 40
8. पाटील, ' पंढरीनाथ सिताराम', महात्मा जोतिराव फुले', मनोविकास प्रकाषन, नारायणपेठ पुणे, सु. द्वि. आ. 2004 पृष्ठ क्र. 43
9. गजघाटे, दा. स. 'जोतिबा सावित्री', ऋचा प्रकाषन, नागपूर, प्र. आ. 1997 पृष्ठ क्र. 112
10. पाटील, पंढरीनाथ सिताराम, 'महात्मा जोतिराव फुले', पृष्ठ क्र. 54
11. किर, धनंजय, 'महात्मा जोतिराव फुले', पॉप्युलर प्रकाषन, मुंबई, पुनर्मुद्रण 1920, पृष्ठ क्र. 109
12. उगले, जि. ए. 'महात्मा फुले – एक मुक्तचिंतन', कौषल्य प्रकाषन, औरंगाबाद, प्र. आ. 2000, पृष्ठ क्र. 38
13. किर, धनंजय, 'महात्मा जोतिराव फुले', पृष्ठ क्र. 99
14. माळी, मा. गो. (संपा.) 'सावित्रीबाई फुले समग्र वाड. मय', म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, द्वि. आ. 1998 पृष्ठ क्र. 11


———————————————————


**Important Note**

**The next Issue of the 'National Research Journal on Social Issues & Problems', will be published in June, 2013. Researchers & Lecturers can send their papers on or before 15 May, 2013.**

**Email- rjbhagat1968@yahoo.co.in / Mobile- 09420359657.**


# महिला आरक्षणाचे राजकारण

**प्रा. नलिनी बोरकर,** अंशकालीन प्राध्यापक, एस.एन.मोर महाविद्यालय, तुमसर

जिथे पोटातील भूकेची जाणीव नसेल, कडक उन्हात पायपिट करीत दोन घागर पाण्यासाठी वणवण भटकावे लागते हे माहित नसेल, जन्म दिलेले मुल दहा दिवसांचे होत नाही तर दुस–यांची धुनीभांडी करून घर चालवावे लागते हे कळत नसेल, झोपडीतील विदारक सत्य पाहिले नसेल, तर संसदेत जावून बसणारी सिने अभिनेत्री सामान्य स्त्री चे प्रतिनिधित्व कशी करेल.? धनाढय परिवारातील एसी मध्ये बसून निवडणूकांवर चर्चा करणारी स्त्री सामान्य महिलांचे प्रतिनिधीत्व कशी करेल.? समाजमन जागृत असणारे आणि समाजातील स्त्री चे दुःख जाणून घेणारी स्त्री जर संसदेत पोहचू शकली तर ख–या अर्थाने महिला आरक्षण सफल झाले असे म्हणावे लागेल.

लोकशाहीमध्ये सर्वच घटकांना समानतेची संधी दिल्याने समानतेतील राजकीय, सामाजिक, आर्थिक अडथळे दूर होत नाहीत. भारतासारख्या पुरूपप्रधान संस्कृती असलेल्या देशात तर हे काम खूपच अवघड वाटते कारण कित्येक वर्षापासून जनमनावर असलेला स्त्री–पुरूष, जात, वंश, हक्क हिरावणे, स्वतःच्या हितसंबधाचे रक्षण करणे हे जणू रक्तातच भिनलेले आहे. पितृप्रधान संस्कृतीमूळे निर्माण झालेले पूर्वग्रह दैनंदिन आयुष्यात आणि सरकारी धोरणांमध्ये सुध्दा परिणाम करतात ज्यामुळे समाजातील दुर्बल घटक सत्ता, साधने व राजकीय अवकाश यात सहभागी होण्याची ईच्छा असूनही मुख्य प्रवाहाबाहेर फेकले जातात. ज्यांना कष्ट सहन करावे लागत असूनही नुकसानच होत आहे अशा गटांना सकारात्मक वृत्तीच्या आधाराची ज्याला भारतात आरक्षण असे म्हणतात त्याची गरज आहे. इथे प्रश्न स्त्रियांविषयींचा आहे. भारतात औपचारिक क्षेत्रात, स्त्रियांसाठीच्या सुधारणेचे आधार म्हणून टाकलेले असे पाउल म्हणजेच सर्व परिस्थितीमध्ये आरक्षण हे समानता, गुणात्मकता, समानसंधी, सामाजिक आणि लिंगाधिष्ठित न्याय यांच्याबरोबरच सोडवता येवू नये असा गुंतागुंतीचा प्रश्न झाला आहे. दुस–या बाजुने या प्रश्नाने पूर्णपणे राजकीय स्वरूप धारण केले आहे. स्त्रियांच्या संघटनांनी या विषयावर 70 पेक्षा जास्तवेळा चर्चा केलेली आहे.[1] महिलांना बरोबरीचा दर्जा देण्याच्या गोष्टींबाबत भारत इतर देशांच्या तुलनेत बराच मागे आहे. जागतिक क्रमवारीत 134 देशात भारत 114 व्या नंबरवर आहे. गेल्या 60 ते 62 वर्षाच्या कालावधीत स्त्री जागृत होत आहे. तीला आर्थिक, सामाजिक सुरक्षा हवी आहे. महिला कल्याणासाठी मजबूत कार्यक्रम हवा आहे. ज्यामुळे ती सुशिक्षित व स्वावलंबी बनू शकेल. हे कार्य तेव्हाच पूर्ण होवू शकेल जेव्हा स्त्रिला संसदेत आरक्षण मिळेल. जर स्त्रियांना संसदेत आरक्षण प्राप्त होत असेल तर ती राजकीयदृष्टीने शक्तीशाली बनेल आणि या अपंग नौकरशाहीच्या विरूध्द संघर्ष करू शकेल. कारण या देशात राजकीय अधिकार आणि सत्ता सर्वोच्च आहे. बाकी सर्व गौण आहे.[2] म्हणूनच पुरूषप्रधान समाज स्त्रियांच्या 50 टक्के आरक्षणाला विरोध करतात. कारण स्वतःला संधी मिळावी असे प्रत्येकच पुरूषाला वाटत असते.

आंर्तराष्ट्रीय पातळीवर सुध्दा स्त्रियांच्या या समस्येवर गहण विचारविमर्श केला गेला. 1975 ते 1985 या दहा वर्षाच्या काळात स्त्रियांच्या राजकीय क्षेत्रातील प्रवेशाबाबत ज्या चर्चा झाल्या त्यांचे प्रतिध्न्वी मोठया प्रमाणात उमटले. 1985 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघ व सर्व देशांनी मिळून राजकीय पक्षांमध्ये स्त्रियांना महत्वाची भूमिका मिळावी म्हणून लढा सुरू केला. ही महत्वपूर्ण व सशक्त अशी सुरूवात होती. 1982 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाव्दारे संपूर्ण जागतिक स्तरावर राजकीय अधिकाराची बाजू मांडली. या सोबतच त्यांच्या मताधिकारावर ही शिक्कामोर्तब केले. 1979 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाव्दारे महिलांच्या विरोधातील सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट करण्यात यावे अशी घोषणा केली. जवळपास 20 वर्ष हे प्रयत्न सुरू राहिले. अनेक चर्चासत्रे आयोजित करावी लागलीत. खूप पुस्तके या विषयावर लिहली गेली. त्यामुळे विधानसभा व लोकसभा यात महिलांना 33 टक्के आरक्षण लागू झाले. 1993 मध्ये 73 वी आणि 74 वी घटनादुरूस्ती झाली आणि याव्दारे पंचायत आणि नगरपालीकामध्ये महिलांना एकतृतीयांश पद आरक्षित केले जातील. 1995 मधील बिजींग महिला संमेलनानंतर महिला आरक्षणाचा मुददा अधिकच ऐरणीवर आला. त्याचा परिणाम म्हणजे 1996 च्या महिला आरक्षणाला मूर्तरूप प्राप्त झाले.[3] 1995 मध्ये सात राष्ट्रीय स्त्रियांच्या संघटनांनी म्हटले आहे की, सर्व पातळयावरील सर्व संस्थावर ज्यातील सभासद निवडून आलेले असतात. अशा आरक्षित जागा निवडणूकीव्दारेच भरता कामा नये, अशी नोंद करण्यात आलेली आहे.

**81 वी घटना दुरूस्ती – स्त्रियांचे आरक्षण विधेयक – 1996–99** :– स्त्रियांची चळवळ, राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा वाढता प्रभाव, राजकीय पक्षांचा दबाव यामुळे युनायटेड फ्रंटच्या आघाडी सरकारने मान्यता देवून, 81 वी घटनादुरूस्ती विधेयक (स्त्रियांचे आरक्षण) 1996, सप्टेंबर 1996 मध्ये सादर केले. लाकसभा व राज्यविधिमंडळे यांच्यात एकतृतीयांश आरक्षणाची तरतूद करण्यात आली. ते जॉईट सिलेक्ट कमिटी कडे (JSC) तपासून पाहण्यासाठी पाठवण्यात आले. त्यांनी डीसेंबर 1996 मध्ये अशी शिफारस केली की, जसे विधेयक आहे तसेच ते पास करावे. या मतांसंबधी पाहणीतून असे दिसते की मोठया संख्येने स्त्रियांनी व पुरूषांनी या विधेयकास पाठिंबा दिला आहे. परंतू 181 जागा सोडाव्या लागतील या कल्पनेने संसदेतील सभासद असलेल्या पुरूष राजकारण्यांनी त्यांच्या भावना संघर्षमय पध्दतीने व्यक्त केल्या. 73 व्या आणि 74 व्या दुरूस्तील इतका तिव्र विरोध झाला नाही कारण कदाचित ग्रामीण महिलांकडून इतका धोका वाटला नसावा.

लोकसभा व राज्यसभा यामध्ये स्त्रियांसाठी एकतृतीयांश जागा अनिश्चित काळापर्यंत राखून ठेवण्याचा प्रस्ताव WRB ने मांडला. यात अनुसूचित जाती व जमाती यांचा समावेश होता. ज्यांच्यासाठी त्यांच्या वर्गात एकतृतीयांश जागा राखून ठेवण्यात येतील. या विधेयकाच्या विरूध्द ओरडणा–या एका पुरूष गटाने तर इतर मागास जातील (OBC) आणि अल्पसंख्याक गट यातील स्त्रियांसाठी जागा राखून ठेवण्याची मागणी पुढे आणली. राखीव जागांमध्ये जागा राखीव ठेवणे इतर अनेक प्रश्नांना उपस्थित करते. उदा.कोण कोणाचे प्रतिनिधित्व करते आणि फक्त 'उपस्थितीचे राजकारण' हे कल्पना किंवा विचार यांच्या राजकारणापेक्षा उच्चप्रतीच्या लोकशाहीला अधिक चांगले प्रतिनिधीत्व म्हणून हितकारक आहे का? जर राखीव जागांमध्ये राखीव जागा या तत्वाचा स्विकार झाला नाही आणि हे विधायक कायद्यात रूपांतरीत झाले तर जे पक्ष इतर मागासवर्गाच्या पायावर उभे आहेत ते जास्तीत जास्त स्त्री उमेदवार त्यांच्या जमातीचे उभे करतील आणि त्यांचे प्रतिनिधीत्व वाढवतील. यामुळे अशी भिती निर्माण होते की, सर्व पक्षांमध्ये जातीय गट आकाराला येवून स्त्रियांचा उपयोग केवळ प्रतिनिधीचे प्रतीक असाच होईल. हे अतिशय रोगट व खेदजनक विकासाचे लक्षण ठरेल.[4] पुढील काळात आरक्षण वाढेल, कमी होईल की रदद् केले जाईल हे ही निश्चित नाही. स्त्रियांची संख्या पुरूषांच्या निम्मी आहे तर आरक्षण ही 50 टक्के असावे असाही प्रश्न उपस्थित केला जातो. हे विधेयक डीसेंबर 1998 मध्ये लोकसभेत मांडण्यात आले.

**पंचायतराज आणि आरक्षण** :– महिला आरक्षणाच्या संदर्भातील महत्वपूर्ण निर्णय म्हणजे पंचायतीमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण लागू करणे होय. याचा फायदा असा झाला की, स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत त्यांचे आपल्या क्षेत्रातील राजकारणात सक्रियता वाढू लागली. काही तरी करून दाखविण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. आपल्या स्थानिक क्षेत्रातील विविध समस्या नष्ट करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. आपल्यापेक्षा उच्चस्तरीय राजनितीज्ञ व अधिकारी लोकांसोबत चर्चा करून नविन ध्येयधोरणे आखणे त्यांनी सुरू केले. या प्रयत्नामुळे पंचायतराज मध्ये महिलांना सचेतन बनविण्याची तयारी सुरू झाली. याचेच कारण आता भारतात 12 लाखाहून अधिक निर्वाचित प्रतिनिधी महिला आहेत. हे एक पंथविरहीत, संप्रदायविरहीत असे संघटन आहे. यात दलित, मुस्लीम, आदिवासी, सवर्ण अशा सर्वच स्तरातील महिला आहेत. ही एक मुक स्वरूपाची क्रांती आहे. ज्या क्रांतीची सुरूवात पंचायत मधून झाली आणि संसदेच्या सभागृहापर्यंत जाउन पोहचली आहे.[5] जरी हा बदल स्पष्टपणे दिसत नसला तरी त्यामुळे महिलांमध्येही पुरूषांप्रमाणेच राजकीय बदल घडवून आणन्याची क्षमता, बुध्दी आणि चातुर्याने काम करण्याची शक्ती आहे हे सिध्द झाले. उदा. इंदिरा गांधी या महिला राजनितीज्ञ होत्या. भारताच्या माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील, दिल्लीच्या मुख्यमंत्री शिला दिक्षित, राजस्थानच्या वंसुधरा राजे, कुशल संघटक म्हणून सोनिया गांधी यांच्या नावाचा उल्लेख केला जातो. श्रीलंकेच्या सिरिमाओ भंडारनायके यांनी 28 वर्षे, 3 वेळा श्रीलंकेचे पंतप्रधानपद भुषविले. बांगलादेशात ही पंतप्रधान शेख हसीना आणि पूर्व पंतप्रधान बेगम खालिदा जिया या आलटून पालटून सत्तेवर विराजमान होतात.

**15 वी लोकसभा** :– 15 व्या लोकसभेच्या निवडणुकीचे निकाल येईपर्यंत महिलांची राजकीय पकड मजबूत झाली होती. 2009 च्या लोकसभा निवडणूकीत सर्वाधीक महिला निवडून आल्यात. या आधी 49 महिला बाराव्या लोकसभेसाठी नवडून आल्या होत्या. परंतू 2009 ला 51 महिला सदस्य निवडून आल्यात. सहाव्या लोकसभेसाठी केवळ 19 महिला निवडून आल्या होत्या. 2009 मध्ये मात्र 11 महिला 80 लोकसभेच्या जागा असलेल्या उत्तर प्रदेशातून निवडून आल्या. 42 जागा असलेल्या पश्चिम बंगाल मधून 8,

मध्यप्रदेशात 29 पैकी 8, बिहार मधून 40 पैकी 4, आंध्रप्रदेशातून 42 पैकी 3, गुजरात मधून 26 पैकी 3, राजस्थान मधुन 25 पैकी 3, पंजाब मधून 13 पैकी 3, महाराष्ट्रातून 48 पैकी 3, छत्तीसगढ मधून 11 पैकी 2, आणि हरियाणा मधून 10 पैकी 2 महिला लोकसभेत निवडून गेल्या. आणि आश्चर्याची बाब म्हणजे सर्वात जास्त साक्षर असलेल्या केरळ राज्यातून 20 पैकी एकाही जागेवर महिला प्रतिनिधी निवडून आली नाही. तसेच इतर मोठी राज्ये जसे तमीलनाडू, ओरिसा आणि झारखंड या राज्यातूनही एक ही महिला प्रतिनिधी निवडून आली नाही.[6] पंधराव्या लोकसभेतील 51 महिला सदस्य निवडून येणे म्हणजे महिलांच्या सशक्तीकरणाची ही सुरूवात आहे असे म्हणता येईल. संपूर्ण देशात आपली ओळख राजकीय क्षेत्रात निर्माण करण्यासाठी महिला तत्पर झाल्या आहेत. हे याचेच द्योतक आहे की, काही दिवसानंतर महिला भारताच्या लोकसभेतही 50 टक्के दिसू लागतील. त्यामूळे हे ही सिध्द झाले की राजकीय क्षेत्रातही महिला पुरूषांपेक्षा कुठेही कमी नाहीत.

**स्त्रियांच्या आरक्षणाचा इतिहास** :– मंडल आयोगाच्या शिफारसी वरून उफळलेला हिंसाचार, माध्यमांनी केलेला प्रचार, पाठोपाठ बाबरी मस्जिद उध्वस्त होणे इत्यादी घटनांमूळे स्त्रियांच्या आरक्षणाला जणूकाही खिळ बसली होती. हा प्रश्न अधिकच किचकट व गुंतागुंतीचा बनू लागला होता. 1980 च्या दशकातील समान नागरी कायद्याच्या चर्चेत महिलांच्या स्त्रिवादी चळवळीनीं म्हणावा तसा प्रतीकार केलाच नाही. किंबहुना बराच भाबडेपणा दाखविला होता. 1990 च्या दशकात उजव्या विचारसरणीच्या हिंदुत्ववादी शक्ती प्रबळ ठरल्या. खरे तर 1920 मध्येच स्त्रियांसाठी वेगळे राजकीय आरक्षण ठेवावे असा मुदद्ा चर्चेत आला परंतू त्यला विरोधच झाला. याचे कारण सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या मागणीची दिशाच त्यामुळे बदलत होती आणि स्त्रिंया पुरूषांच्याच पातळीवर निवडणूका लढतील याच्याशी ते विसंगत होते. या मताचा त्यावेळच्या प्रमुख स्त्री संघटना ऑल इंडीया वुमन्स कॉन्फरन्स, दी इंडीयन असोशियशन आणि दी नॅशनल कॉन्सील ऑफ वुमेन्स इन इंडीया यांनी पांठीबा दर्शविला पण होमरूल लीग, दी इंडीयन नॅशनल कॉग्रेस आणि मुस्लीम लीग यांनी सुध्दा हाच दृष्टिकोन व्यक्त केला, 1932 मध्ये दुस–या गोलमेज परिषदेत स्थापन झालेल्या जॉईंट मेनोरॅडम ऑन दी स्टेटस ऑफ वुमेन संघटनेनी मताधिकार सादर केले. या समितीने प्रौढ मताधिकाराची मागणी केली. या जाहीरनाम्यास स्त्री संघटनांनी मान्यता दिली. परंतू या मागण्यांना ब्रिटीशांनी विरोध केला व स्त्रियांना मतदानाचा अधिकार फक्त नागरी विभागापुरताच मर्यादित ठेवण्यात आला. त्यात असे गृहीत धरण्यात आले की, नागरी भागातील स्त्रियां भारतीय स्त्रियांचे योग्य प्रतिनिधित्व करतील. परंतू तरीही आरक्षणाचा मात्र विरोधच होता. 1932 मध्ये ब्रिटीश कम्युनल अवार्ड च्या अन्वये मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, ॲंग्लो इंडियन आणि मागासवर्ग यांना वेगळे मतदारसंघ आणि आरक्षित जागा दिल्या गेल्या होत्या. याला दी ऑल इंडीया वुमेन्स कॉन्फरन्स ने विरोध केला. यामागे तर्कशुध्द विचार असा होता की, धर्म, जात, संप्रदाय, पंथ यानुसार अशा पायावर विभागणी झाल्यास वसाहतवादी राज्याच्या विरोधात चालू असलेला लढा दुर्बल होईल आणि विधानमंडळात असेच लोक असायला हवेत जे व्यक्तिगत किंवा जातीय, धार्मिक योग्यतेच्या पलीकडे जावून विचार करतील आणि देशाच्या हिताला प्राध्यान देतील. 1975 मध्ये पुन्हा एकदा स्त्रियांच्या आरक्षणाचा प्रश्न कमिटी ऑन दी स्टेटस् ऑफ वुमन्स इन इंडीया मध्ये उपस्थित केला. कमिटीचा युक्तीवाद स्त्री आरक्षणाला अनुकुल होता कारण हा युक्तीवाद प्रामुख्याने सक्रीय स्त्री कार्यकर्त्यांनीच केला होता. सीएसडब्ल्यूआय च्या 1975 च्या आरक्षणविरोधी मतप्रवाहात दोन असहमती होत्या. परंतू स्थानिक संस्थामध्ये स्त्रियांना आरक्षण देण्याबाबत मात्र एकमत होते. कारण त्यामध्ये ग्रामीण व गरीब स्त्रियांचे हितरक्षण होते. 72 व्या व 74 व्या घटनादुरूस्तीमुळे स्त्रियांना एकतृतीयांश आरक्षणाची तरतूद देण्यात आली ज्याची अंमलबजावणी 1994 पासून झाली. 81 व्या घटनादुरूस्तीच्या विधेयकात स्त्रियांसाठी एकतृतीयांश आरक्षण राज्य आणि केंद्राच्या कायदेमंडळामध्ये ठेवण्यासंबधी प्रस्ताव होता. राष्ट्रीय स्त्री संघटनाची या विधेयकाला पूर्ण पांठींबा दर्शविला. तथापी बहुतेक राजकीय नेते विधेयकाला जोरदार विरोध करीत होते. कारण पांरपारिकतेने आजवर जो पुरूषांचाच हक्क राहिला आहे त्यावर आता हे आक्रमण आहे. या चर्चेला माध्यम्ये हवा तसा प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे स्त्रीवादी विरूध्द जातीयवादी असेच दृश्य दिसून येते. समाजातील सर्वागींण लोकशाहीला बळकट करावयाचे असेल तर राजकारणात स्त्रियांचा पुरूषांच्या तुलनेत अर्धा वाटा असणे आवश्यक आहे. हेच या संघर्षावरून सिध्द होते.

**निष्कर्ष** :– 1996 च्या महिला आरक्षण विधेयकापासून महिलांना संसदेत 33 टक्के आरक्षण जाहिर करण्यात आले होते. अलिकडेच त्यात संशोधन

करून ते 50 टक्के करण्यात आले. भारतासारख्या पितृस्थानीय उच्च वर्चस्व मानणा–या देशात विविध जाती, धर्म, संप्रदाय एकत्र नांदणा–या देशात महिलांना 50 टक्के आरक्षण ही एक क्रांतीकारी बाब आहे. स्त्रियांना अगणित काळापासून ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या त्याचे जणू परिमार्जनच यातून घडले आहे. स्त्रियांना संसदेत मिळालेल्या अधिकाराने पुरूषांचा काही प्रमाणात अधिकार संपुष्टात आला आहे. स्त्री आपल्या मागण्या संसदेत निर्धास्तपणे मांडू शकेल. यामूळे एक स्वतंत्र महिला शक्ती निर्माण होईल जी जगातील अनेक समस्यांच्या निराकरणासाठी आवश्यक आहे.

आरक्षण सर्व समस्यांचे समाधान नव्हे. ज्या आरक्षणाबाबत एवढया पोटतिडकीने बोलले जाते त्याचा फायदा खरोखरच गरीब, दलित, मागासलेल्या वर्गाला झाला आहे काय? आरक्षणाबाबत गरीब स्त्रियांना विचारले तर म्हणतात की आमचा काय फायदा? आम्हाला तर रोज राबल्याशिवाय पोटाला अन्न मिळत नाही. आम्हाला काय दिले या आरक्षणाने? एकंदरीतच महिला आरक्षणाचा फायदा काही मोजक्याच महिलांना झालेला आहे. बहुतांश महिलांच्यामते महिला आरक्षणाचा त्यांना काहीही फायदा झालेला नाही. त्यांचे जीवन आजही संघर्षमय आहे. औषधांच्या अभावाने मरणा–या गरीब स्त्री ला, दवाखान्यापर्यंत पोहचू न शकणा–या व गावातच बाळंत होणा–या स्त्री ला या आरक्षणाचा काही फायदा आहे का?

महिला आरक्षणाचा फायदा केवळ त्या कुटूंबातील महिलांना मिळतो ज्यांचे भाउ, पती, वडील सत्तेत उच्च पदावर आहेत. ज्या मोठया महाविद्यालयात शिकतात किंवा बाहेरच्या देशात जावून उच्च पदवी प्राप्त करतात. काही तुरळक गरीब सोडले तर याचा फायदा केवळ त्याच परिवारातील स्त्रियांना होतो ज्यांच्या परिवारात सत्तेवर असण्याचा पूर्वापार संबध चालत आलेला आहे.

'मुक्ती के स्वर', देहरादूनच्या संपादिका अमिता श्रीवास्तव म्हणतात, 'आता प्रश्न असा आहे की आज जे चित्र निवडणूका संदर्भातील राजकारणात दिसून येते, या राजकीय आरक्षणामूळे सामान्य स्त्रियांच्या जीवनात काही परिवर्तन होईल काय? ज्या स्त्रियां सामान्यामधूनच संसदेत पोहचतात त्या असा थोडा तरी बदल करण्यास समर्थ होतील काय? आपल्याला माहित आहे की आशिया खंडात इंदिरा गांधी, बेनजीर भुटटो, शेख हसीना, कुमारतुंगा आणि इतर प्रतिभावान महिला सत्तेत आल्यानंतरही स्त्रियांच्या एकूणच स्थितीमध्ये बदल घडवून आणन्याचा प्रयत्न झाला नाही. आज ज्या स्त्रियां संसदेत आहेत त्या आपआपल्या पक्षाचे नेतृत्व करतात.'[6] या वक्तव्यावरून हा भ्रमच ठरतो की संसदेत केवळ स्त्री जात नाही तर ती एका पक्षाची घटक असते. 50 टक्के महिला जर संसदेत जात असतील त्यांनी आपल्या पक्षापासून वेगळे काहीतरी करायला हवे जे सामान्य कुटुंबाना आणि इतर महिलांना प्रोत्साहित करू शकेल की त्या राजकारणात येतील.

तन्वीर एजाज आपल्या 'महिलाओ के लिए आरक्षण' या लेखात म्हणतात, 'एका अध्ययनात घेतलेल्या नोंदीत 19 महिला पैकी केवळ दोन महिलांनी स्विकार केले की, त्यांनी राजकारणात आपल्या इच्छेने प्रवेश केला, उर्वरित महिलांना त्यांच्या पक्षातील पुढा–यांनी जबरदस्ती राजकारणात ओढले.' यु. एम. ए. ने सुध्दा हे सिध्द केले आहे की, आरक्षणाने प्रभुत्वसंपन्न जातीचीच शक्ती वाढत आहे.'[7]

यावरून असे सिध्द होते की, आजपर्यंत ज्या जागेवर घरातला कर्ता पुरूष निवडून येत असे अचानक ती जागा महिलांसाठी राखीव होते, त्यामुळे स्वतःच्या ऐवजी पत्नी किंवा मुलगी यांना राजकारणात ओढले जाते. मग त्यांना निर्णय घेण्याचे स्वातंत्रही उरत नाही. कित्येक महिला सरपंच नव–याने म्हटले तेच योग्य म्हणून रबर स्टॅम्प प्रमाणे कार्य करतात. केवळ मते मागण्यासाठी स्त्रियांच्या हक्काची गर्जना करणारी स्त्री प्रतिनिधी सुध्दा महिलांच्या विरोधात समजावी कारण त्यांच्या पक्षाची मुळ निती स्त्री विरोधी असू शकते. अशाप्रकारे निर्वाचित सांसद स्त्री केवळ पक्षाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी संसदेत गेली असेल तर ती स्त्रियांच्या अधिकार व हितांसाठी लढणे शक्यच नाही.

जिथे पोटातील भूकेची जाणीव नसेल, उन्हाळयाच्या उन्हात पायपिट करीत दोन घागर पाण्यासाठी वणवण भटकावे लागते हे माहित नसेल, जन्म दिलेले मुल दहा दिवसांचे होत नाही तर दुस–यांची धुनीभांडी करून घर चालवावे लागते हे कळत नसेल, झोपडीतील विदारक सत्य पाहिले नसेल तर संसदेत जावून बसणारी सिने अभिनेत्री सामान्य स्त्री चे प्रतिनिधित्व कशी करेल.? धनाढय परिवारातील एसी मध्ये बसून निवडणूकांवर चर्चा करणारी स्त्री सामान्य महिलांचे प्रतिनिधीत्व कशी करेल.? समाजमन जागृत असणारे आणि समाजातील स्त्री चे दुःख जाणून घेणारी स्त्री जर संसदेत पोहचू शकली तर ख–या अर्थाने महिला आरक्षण सफल झाले असे म्हणावे लागेल.

.................................................................................................

संदर्भ :–

1. रेहाना घडयाली, अनुवाद–मंजुषा गोसावी, समकालीन भारतातील नागरी स्त्रिया, डायमंड पब्लीकेशन, पुणे, 2008, पृ. 382.
2. वी. एन. सिंह, जन्मजेय सिंह, आधुनिकता एंव नारी सशक्तीकरण, रावत पब्लीकेशन, जयपूर, 2010, पृ. 289.
3. तत्रैव पृ. 290
4. रेहाना घडयाली, अनुवाद–मंजुषा गोसावी, समकालीन भारतातील नागरी स्त्रिया, डायमंड पब्लीकेशन, पुणे, 2008, पृ. 393.
5. वी. एन. सिंह, जन्मजेय सिंह, आधुनिकता एंव नारी सशक्तीकरण, रावत पब्लीकेशन, जयपूर, 2010, पृ. 291.
6. श्रीवास्तव, 'मुक्ती के स्वर', पृ. 14
7. तन्वीर एजाज, 'महिलाओं के लिए आरक्षण' हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, पृ. 346

..........................................................................................................

# ''कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा 2005 बाबत महिलामध्ये असलेल्या जाणीव जागृतीचे अध्ययन'' विशेष संदर्भः– लाखांदूर पंचायत समिती

***प्रा. धनराज चौखुंडे,*** *अधिव्याख्याता, आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा*

भारतीय संविधानाने स्त्री–पुरूष समानतेच्या संदर्भात कितीही घटनात्मक तरतुदी केलेल्या असतील तरीही भारतीय समाजातील पुरूषप्रधान मानसिकता अजूनही कायम आहे. त्यामूळेच आजही भारतीय समाजात कौटूंबिक हिसांचार मोठया प्रमाणात घडून येतो आहे. कौटुंबिक हिंसाचाराला कौटुंबिक व व्यावसायिक हे दोन्ही घटक जबाबदार आहेत. पुरूषांची भोगवादी प्रवृत्ती व महिलांना हिन लेखण्याची वृत्ती यात बदल न झाल्याने, स्त्रिया कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडत आहेत. विकसनशिल भारताची ही एक गंभीर समस्या आहे.

**रा**ज्य घटनेच्या उद्देष पत्रिकेमध्ये आम्ही भारताचे लोक अषी सुरूवात होते यावर विचार केला तर महिलांना किती महत्वाची संधी भारतीय संविधानाने मिळवून दिली याचा आपण विचार करू शकतो. भारतीय संविधानाच्या उद्देष पत्रिकेत महिलांना समान संधी, समान वागणूक, समान दर्जा पुरूषाप्रमाणे मिळेल अषी तरतूद केलेली आहे. उद्देषपत्रिकेतील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अषी न्यायाचे तीन प्रकार केलेले आहे. महिलांना सामाजिक न्याय समाजाधिष्टीत समाज व्यवस्थेने दिलेला आहे. महिलांना पुर्वी आर्थिक बाबतीत आपल्या वडीलावर, पतीवर व मुलांवर अवलंबून रहावे लागत असे. परंतू महिलांना आर्थिक न्याय हा समाजकार्य, समान वेतन तसेच रोजगाराची संधी उपलब्ध आणि जगण्याकरीता पुरेषे साधन उपलब्ध करण्याचा संविधानाने दिलेल्या अधिकार संधीमुळे मिळाला आहे. संविधामुळे महिलांना भारतीय राजकिय क्षेत्रात भाग घेण्यास मुक्त व न्याय संधी मिळाली आहे. तसेच मतदानाचा अधिकार घटनेने बहाल केला. महिलांना विचार अभिव्यक्ती व स्वातंत्र्याची हमी दिलेली आहे. तसेच पुरूषाप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात महिलांना समान दर्जा दिलेला आहे.

**स्वतंत्र भारतातील महिलांचा दर्जा :–** भारत स्वतंत्र झाल्यानंतर स्त्रियांच्या जीवनात बरेच परीवर्तन झाले आहे. स्त्रिया विविध क्षेत्रात काम करू लागल्या आहे. काही अंषी त्याच्या दर्जात सुधारना झाली तरीपण स्त्रियावर वेगवेगळया कारणावरून होणाऱ्या अत्याचाराची बाब व संख्या जर आपण लक्षात घेतली तर केवळ महिलांनाचा नव्हे तर पुरूषांना सुध्दा आत्मपरीक्षण करावे लागेल.

संविधानाच्या कलम 14 नुसार सर्व व्यक्ती कायद्यासमोर समान आहेत व प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण आहे. म्हणजे सर्व कायदे स्त्रि, पुरूष असा भेदभाव करण्यावर बंदी घालण्याचे आष्वासन देण्यात आले आहे. वरील घटनात्मक तरतुदी व वेगवेगळे कायदे असले तरी कौटुंबिक हिंसाचारामध्ये दिवसेंदिवस लक्षणिय वाढ होत असल्याचे भारतातील कौटुंबिक हिंसाचाराच्या आकडेवारीवरून दिसून येते.

**कौटुंबिक हिंसाचाराबद्दल भारतातील स्थिती :–** संयुक्त राष्ट्र संघटनेतील लोकसंख्याकोष विभागाच्या अहवालानुसार भारतात 14 ते 49 या वयोगटातील 70 टक्के महिला घरगुती हिंसाचाराच्या झालेल्या असतात. ''नॅषनल क्राइम रेकार्ड ब्युरो'' च्या अहवालानुसार 2004 मध्ये घरगुती हिंसाचाराच्या 55439 प्रकरणे

दाखल झाले होते. 2003 मध्ये तक्रारीची संख्या 50,703 होती. पती आणि सासरच्या अन्य नातेवाईक मंडळींनी, महिलांनी केलेल्या हिंसाचारामध्ये 2006 या वर्षात 9.3 टक्के वाढ झाली आहे.

**कौटुंबिक हिंसाचाराची पार्श्वभूमी :–** कौटुंबिक हिंसाचाराची सोपी व सुटसूटीत अषी व्याख्या करणे अवघड आहे. कारण काही अभ्यासक शारीरिक मारहाणीसारख्या ज्या कृत्यातून दुसऱ्याच्या शरीराला प्रत्यक्ष इजा होते त्या कृत्यास हिंसक कृत्य असे संबोधतात. हिंसाचार या संज्ञेच्या अर्थामध्ये शारीरिक इजेसोबतच मानसिक इजा किंवा मनावरील आघात देखील समाविष्ट आहे.

**कौटुंबिक हिंसाचारामध्ये खालील बाबींचा समावेष होतो –**

1) सामाजिक विकासात महिलांचा सहभाग हा मुद्या नेहमीच महत्वाचा मानला गेला आहे. तथापि या महत्वाच्या घटनाकडे अयोग्य, अलिप्त किंवा तिरस्कार युक्त भावनेने पाहणे, अन्याय करणे, अपमाणित करणे, व वंचीत ठेवणे या गोष्ठी पावलोपावली आढळून येतात. 2) महिलांना सर्वात जास्त त्रास घरातल्या घरात पतीकडून किंवा त्याच्या नातेवाईकाकडून होतो व त्यासाठी दाद मागणे जवळजवळ अषक्य असते. त्यातुन मार्ग शोधण्याचा प्रयत्न म्हणून सदरचा अधिनियम अस्तित्वात आला. 3)सदर कायदा केंद्र शासनाच्या दि. 17/10/2006 च्या अधिसूचनेद्वारे दि. 26/10/2006 पासून देषभरात आत्मसात आणला आहे. 4) कौटुंबिक हिंसाचार हा मानवी हक्क विषयक प्रष्न असून तो विकासाच्या मार्गावर अडसर आहे. ही बाब लक्षात आल्याने त्यापासून महिलांचे संरक्षण करणे हा प्रमुख उद्देष यामागे आहे. 5) कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना सार्वत्रिक असल्या तरी या अदृष्यच राहतात. सध्या महिलांवर स्वकियांनी अत्याचार केल्यास भारतीय दंड संहितेच्या कलम 498 अ नुसार अपराध ठरतो. मात्र दिवाणी कायदे या घटनावर सखोल चर्चा करीत नाहीत म्हणून दिवाणी कायदयान्वये कौटुंबिक हिंसाचारावर प्रतिबंध घालण्याचा उद्देष यामागे आहे. 6) महिलेचा छळ करणारी व्यक्ती एकाच घरात राहत असेल त्यांच्यात रक्ताचे विवाहातील नात्याचे दत्तक विधानाने आलेले संबंध असतील किंवा याषिवाय एकत्र कुटुंबातून निर्माण होणारे नातेसंबंध असतील तर त्यांचा अंर्तभाव या कायदयात येतो.

**अध्ययनाचे उद्देष :–** 1) कौटुंबिक हिंसाचार कायदा 2005 बद्दल महिलामध्ये असलेल्या जाणीव जागृतिचे अध्ययन करणे. 2) महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडल्यानंतर त्या कायदयाचा अवलंब करतात कां? 3) कौटुंबिक हिंसाचार हा महिलांच्या कौटुंबिक व व्यावसायिक बाबीषी निगळीत असतो काय? 4) महिलांच्या शैक्षणिक दर्जाच्या प्रमाणात, कौटुंबिक स्थानात सकारात्मक बदल होतो काय? इत्यादींचे अध्ययन करणे.

**अध्ययन क्षेत्र/विष्व :–** प्रस्तुत संषोधनासाठी भंडारा जिल्हयातील लाखांदूर पंचायत समितीचा अध्ययन क्षेत्रात समावेष केला असून पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व प्राथमिक शाळेतील महिला षिक्षिकांचा अध्ययन विष्वात समावेष केला आहे.

**नमूना निवड : –** प्रस्तुत शोध निबंधात पंचायत समिती लाखांदूर येथील सर्व प्राथमिक शाळेतील एकंदर 168 महिला षिक्षिका असून त्यापैकी 60 महिला षिक्षिकांची नियमित अंकन तंत्र पध्दतीनुसार निवड केली आहे.

**तथ्य संकलन : –** प्रस्तुत शोध कार्यात मिळालेली माहिती ही मौखीक स्वरूपाच्या उत्तराषी निगडीत आहे. त्याकरीता मुलाखत अनुसूची व निरीक्षण तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्याचे विष्लेषण :–** कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा 2005 च्या संदर्भात महिलामध्ये जाणीव जागृती आहे किंवा नाही याबाबत मत जाणून घेतले असता संपूर्ण 60 उत्तरदात्यांनी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदयाची माहिती असल्याचे सांगितले. यावरून असा निष्कर्ष निघतो की, विष्वातील सर्व उत्तरदात्यांना या कायदयाची माहिती आहे.

**सारणी क. 1**

**कौटुंबिक हिंसाचाराला जबाबदार असलेल्या घटकांबाबत मत दर्षविणारी सारणी**

| अ. क. | हिंसाचाराला जबाबदार घटक | पुर्णतः | अंशतः | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. | कौटुंबिक घटक | 46 (76.66) | 14 (23.34) | 60 (100.00) |
| 2. | व्यावसायिक घटक | 43 (71.66) | 17 (28.34) | 60 (100.00) |

उपरोक्त सारणीमध्ये एकंदर 60 उत्तरदात्यापैकी 46 म्हणजे 76.66 टक्के उत्तरदात्याच्या मते, कौटुंबिक हिंसाचाराला कौटुंबिक घटक जबाबदार असून कौटुंबिक घटकापैकी पती हा सर्वात जास्त जबाबदार असलेला घटक आहे. 43 म्हणजे 71.66 टक्के उत्तरदात्याच्या मते, कौटुंबिक हिंसाचाराला व्यावसायिक घटक जबाबदार असून स्त्रियांची आर्थिक

मिळकत, व्यवसायात खर्च होणारा वेळ व पुरूषाची संषयी वृत्ती हे सर्व घटक जबाबदार आहेत.

**निष्कर्ष :** कौटुंबिक हिंसाचाराला कौटुंबिक व व्यावसायिक हे दोन्ही घटक जबाबदार आहेत. पुरूषांची भोगवादी प्रवृत्ती व महिलांना हिन लेखण्याची वृत्ती यात बदल न झाल्याने, स्त्रिया कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडतात.

**सारणी क. 2**

**महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडल्यानंतरही कायदयाचा अवलंब करतात काय? याबाबत मत दर्षविणारी सारणी**

| अ.क. | पर्याय | वारंवारिता | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | होय | 22 | 36.66 |
| 2. | नाही | 38 | 63.34 |
| | एकूण | 60 | 100.00 |

उपरोक्त सारणीमध्ये एकंदरीत 60 उत्तरदात्यापैकी 22 म्हणजे 36.66 उत्तरदात्यांच्या मते, महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडल्यानंतर त्या कायद्याचा अवलंब करतात. तर 38 म्हणजे 63.34 उत्तरदात्यांच्या मते, त्या बळी पडल्यानंतरही सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, सांस्कृतिक इ. दबावामुळे कायदयाचा अवलंब करीत नाही.

**निष्कर्ष :** उपरोक्त सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, महिलांच्या सक्षमिकरणाच्या दृष्टीकोणातून अनेक घटनात्मक तरतुदी केल्या असून त्याच बरोबर कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा केला असून स्त्रियांची परंपरागत दबाव सहन करण्याच्या प्रवृत्तीत अजूनही बदल झालेला दिसून येत नाही. त्यामुळे महिला या कायदयाचा अवलंब न करता छळाला सामोरे जातात.

**सारणी क. 3**

**महिलांचा शैक्षणिक दर्जा जर उच्च असेल तर त्यांच्या कौटुंबिक स्थानात सकारात्मक बदल होतो काय? याबाबत मत दर्षविणारी सारणी**

| अ क | शैक्षणिक दर्जा | कौटुंबिक स्थानातील बदल | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | अंशतः सकारात्मक | पूर्णतः सकारात्मक | बदल होत नाही | |
| 1. | उच्च | 52 (86.66) | 04 (06.64) | 04 (06.64) | 60 (100.00) |

उपरोक्त सारणीमध्ये एकंदर 60 उत्तरदात्यापैकी 52 म्हणजे 86.66 टक्के उत्तरदात्याच्या मते स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा जरी उच्च असला तरी त्यांच्या कौटुंबिक स्थानात पुरेसा बदल न होता केवळ अंषतः सकारात्मक बदल होतो असे दिसून येते.

**निष्कर्ष :** उपरोक्त सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, सरकारचे निषुल्क व सक्तिचे षिक्षण हे धोरण महिलांच्या सक्षमिकरणाकरीता राबविले जात असले तरी त्यांच्या कौटुंबिक स्थानात षिक्षण या घटकामुळे अजुनही फारसा बदल झालेला दिसून येत नाही. त्याकरीता समाजाने स्त्रिकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलला पाहिजे.

**सूचना व षिफारषी : सूचना** – 1) स्त्रीने स्वतःला दुर्बल न समजता पुरुषाप्रमाणे आपल्याला समान दर्जा आहे असे समजून घेवून आपले कुटुंबातील महत्व सिध्द केले पाहिजे. 2) महिलांनी स्त्रि विषयक कायदयाविषयी सदैव जागृत असले पाहिजे. 3) महिलांनी स्वतःवर झालेल्या हिंसाचाराला प्रतिउत्तर दिले पाहिजे.

**शिफारषी :** 1) महिलांना कायदयाची जाणीव जागृती निर्माण व्हावी म्हणून सुट्टीच्या दिवसी निवृत्त न्यायाधिषाच्या मार्गदर्शनाखाली चर्चासत्राचे आयोजन केले पाहीजे. 2) मासिके, पाक्षिके, दुरदर्षन च्या माध्यमातून कायदयाच्या जाणीव जागृती करता विषेष कार्यक्रम प्रसारीत केले पाहीजे.

.......................................................................

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1) आगलावे डॉ. प्रदिप, : संषोधन पध्दती, शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाषन, नागपूर–2

2) भांडारकर डॉ. पु.ल. : सामाजिक संषोधन पध्दती

3) लोटे रा.ज. : भारतातील सामाजिक समस्या

4) सामाजिक न्याय व विषेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन : सामाजिक न्यायाच्या दिषेने (मासिक), विकासाच्या वाटा 2010, महिला व बालविकास माहिती पुस्तिका

.......................................................................

# उदारीकरण आणि दलित वर्ग : नवी आव्हाने

**डॉ. राहुल भगत, समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर.**

उदारिकरणामूळे मागील 12–14 वर्षात भारतात विदेशी कंपन्यांचा विकास खूप जलद गतीने झाला आहे. परंतू दरवर्षी येणा–या या नवनवीन कंपन्यांमुळे रोजगाराच्या संधी कमी झालेल्या आहेत. या उदारिकरणाच्या प्रक्रियेमुळे संविधानातील कल्याणकारी राज्य संकल्पना मागे पडली. कल्याणकारी राज्य संकल्पनेमुळे दलितांना फायदा झाला होता परंतू प्रतिस्पर्धात्मक राज्याच्या संकल्पनेने रोजगार निर्मितीच्या प्रक्रियेत खूप घट झाली.

1980 ते 1990 च्या दशकात भारतातील राजकारणात नव–नवे प्रयोग करण्यात आले. ज्यामुळे अनेक परिवर्तने घडून आलीत. मुख्यतः हे परिवर्तन म्हणजे आर्थिक बाजू समजली जाते परंतू ज्याला उदारीकरण, खाजगीकरण आणि वैश्वीकरण या नावाने संबोधले जाते. त्याचा परिणाम केवळ अर्थव्यवस्थेवरच झालेला नाही तर सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आरोग्य व र्प्यावरणावर सुध्दा झालेला आहे. संपूर्ण भारतीय समाज व्यवस्थाच या त्रीसुत्रीच्या परिणामामुळे प्रभावित झाली आहे.

भारत हा विविधतेच एकता असलेला देश आहे. वेगवेगळे धर्म, जाती, वर्ग यांच्या संमिश्रणातून भारतीय समाजाची निर्मिती झाली आहे. प्रस्तुत अध्ययनात उदारीकरणाची प्रक्रिया भारतीय समाजातील दलित वर्गावर कसा प्रभाव टाकते व त्यामुळे दलित वर्गासमोर कोणती नवी आव्हाने उभी ठाकली आहेत त्याचे विश्लेषण केले आहे. दलित वर्गावर उदारीकरणाचा सकारात्मक परिणाम होत आहे की नकारात्मक होत आहे किंवा त्यांच्या आर्थिक परिस्थितीमूळे आजही ते या परिणामांपासून तटस्थ आहेत.? दलित वर्ग भारतातील समाजव्यवस्थेत सर्वात खालच्या स्तरावरील वर्ग मानला जातो. या वर्गाची अर्थव्यवस्था ही अत्यंत निकृष्ट दर्जाच्या व खूप मेहनतीच्या कामावर अवलंबून असते. परंतू वर्तमान काळात या अर्थव्यवस्थेवर त्यांच्या जीवनमान उंचावण्यावर उदारीकरण या प्रक्रियेचा प्रभाव कितपत झालेला आहे याचा शोध घेणे हा या अध्ययनाचा मुख्य हेतू आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा अंगीकार केला कारण इंग्रजांनी भारताचे जे आर्थिक शोषण केले होते त्यामूळे भारताला दारिद्रय, दुष्काळ, महामारी अशा अनेक संकटांचा सामना करावा लागला होता. अशा दारिद्रय पिडीत असलेल्या भारत देशाला इतर देशांच्या बरोबरीत आणायचे असेल तर राज्य व खाजगी क्षेत्र यांच्या संयुक्त आर्थिक प्रयत्नांची व योजनांची गरज होती. याच प्रणालीवर भारताने तीन दशके अंमल केला. या कालावधीत विभिन्न स्तरावर भारताचा विकासही घडून आला. सार्वजनिक क्षेत्रच नव्हे तर राज्य अनेक अशा क्षेत्रांचा विकास करण्याचा प्रयत्न करतो की ज्या क्षेत्रात खाजगी उद्योजक पैसा गुंतवण्यास तयार नसतात. उदा. सुरक्षा, खनीज, रेल्वे, सागर परिवहन, आंर्तराष्ट्रीय व्यापार इत्यादी.

शासनाच्या अर्थनीतीमध्ये नाविन्य नसल्याचे कारण सांगत 80 च्या दशकाच्या शेवटी भारताचा विकास म्हणावा तसा झाला नसल्याचा निष्कर्ष काढला गेला त्यामूळे आपले आर्थिक धोरण बदलविण्याचे भारत सरकारने प्रयत्न सुरू केले. व्यापार – उद्योग, आयात – निर्यात, राजकोष, मुद्रा इत्यादी क्षेत्रामध्ये नवीन धोरणांचा स्विकार केला गेला. तत्कालीन भारतीय रिजर्व बॅकेंचे गर्वनर विमल जालान म्हणतात, 'नविन अर्थनिती अशी काही गोष्ट आहे, यासंबधात ना कोणता अधिकारीक भारतीय प्रस्ताव किंवा वक्तव्य उपलब्ध आहे आणि नाही त्याला औपचारिक स्वरूपात स्विकृत केले गेले'[1] वास्तविक अनेक सरकारी दस्तावेज या शब्दाच्या प्रयोगापासून दूरच राहीले. साधारणतः 1985 च्या सुरूवातीपासून असे काही महत्वपूर्ण बदल अर्थव्यवस्थेत करण्यात आले ज्यांचा संबध करनिर्धारण, औद्योगिक परवाना पध्दती, आयात प्राद्योगिकी आणि गुंतवणुकीच्या प्राथमिकतेशी आहे. आर्थिक उदारीकरणाची ही प्रक्रिया भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशात सुरू झाली.

अमेरिका भांडवनवदी विचारसरणीचा देश आहे. त्यामुळे अमेरिकेने उदारीकरणाला प्रोत्साहन दिले. कारण उदारीकरणानेच भांडवलवादाचा विकास होतो. जागतीकीकरण साठवलेल्या भांडवलाच्या अधिकतेमूळे निर्माण होणा–या संकटाचे एक कारण आहे. भारतातील उच्च वर्ग उदारीकरणाला प्रोत्साहित करतो परंतू बहुसंख्य जनतेला त्याचे काही सोयरसुतक नाही. असे म्हणायलाही काही हरकत नाही की, या प्रक्रियेमुळे लोकसंख्येचा एक लहानसा भाग जागतीक अर्थव्यवस्थेशी जुळेल पण एक मोठा भाग तलवारीच्या धारेवर चालू लागेल. अमीन समीर यांच्या मते, 'विकसित राष्ट्रांनी आपल्या अर्थव्यवस्थेचा विस्तार

तीस–या जगातील संसाधने आणि श्रमशक्तीचे शोषक करून केलेला आहे. तर डॉ. जोगदंड यांच्या मते, उदारिकरणाची प्रक्रिया ही अनुसूचीत जातींना अधिक दारिद्रयात ढकलणारी प्रक्रिया आहे, असे म्हणतात.[2] अमेय कुमार बागची यांच्या मते, 'उदारिकरण, खाजगीकरण यांची नउ लक्षणे आहेत. परंतू ख–या अर्थाने दलितांसाठी यात कोणतीच जागा नाही. यात असमानता कमी करणे किंवा सामाजिक न्यायासंबधी कोणताच विचार केलेला नाही.[3] तरीही भारत सरकारने कोणत्यातरी विवशतेने भारतातील बहुसंख्य दलित वर्गाचा विचार न करता 1991 मध्ये उदारीकरण व खाजगीकरणाचे धोरण लागू केले.

नविन अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत उत्पादनाच्या क्षेत्रात दलित आणि आदिवासी यांच्या विकासाची गती अत्यंतम ंद आहे. भारतीय संविधानात अनेक सुरक्षात्मक आणि निरोधात्मक उपाय वर्णन केलेले असुनही आणि शासनाने भरपूर प्रयत्न करूनही मागील पाच दशकात दलित आणि आदिवासी वर्ग अत्यंत मागासलेला राहीला आहे. उत्पादनात दलित वर्ग केवळ मजूर म्हणून कार्यरत आहे. अनुसूचित जाती जमातीचे केवळ 51 टक्के लोक दोन वेळचे जेवण, मुलांचे शिक्षण, आंशिक स्वतंत्रता आणि स्वइच्छेने मतदान करणे यासाठी सक्षम झालेले आहेत. यात 70 टक्के अल्पभूधारक शेतकरी, 7. 85 टक्के गिरणी कामगार, उर्वरित वाढई, चांभार, मेहतर अशा व्यवसायात आहेत. परंतू त्या 49 टक्के दलित, आदिवासी लोकांची स्थिती अधिक दयनिय आहे ज्यांना दोन वेळचे जेवण ही मिळत नाही. नेहमी भिती आणि दुस–यांच्या दयेवर जगणा–या या वर्गाचे शोषण, उत्पीडन करून त्यांच्या मानवाधिकाराचे हनन केले जाते.

उदारिकरण – रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात :– उदारिकरणामूळे मागील 12–14 वर्षात भारतात विदेशी कंपन्यांचा विकास खूप जलद गतीने झाला आहे. परंतू दरवर्षी येणा–या या नवनवीन कंपन्यांमुळे रोजगाराच्या संधी कमी झालेल्या आहेत. या उदारिकरणाच्या प्रक्रियेमुळे संविधानातील कल्याणकारी राज्य संकल्पना मागे पडली. कल्याणकारी राज्य संकल्पनेमुळे दलितांना फायदा झाला होता परंतू प्रतिस्पर्धात्मक राज्याच्या संकल्पनेने रोजगार निर्मितीच्या प्रक्रियेत खूप घट झाली आहे. या प्रक्रियेला तीन प्रकारे समजून घेता येईल. प्रथम, संघटीत क्षेत्रातील नोकरीमध्ये सरकारी क्षेत्रात नोकरीची संधी आहे. प्रत्यक्षात नोकरी मात्र नाही. खाजगी क्षेत्रामध्ये नोकरीच्या संधी भरपूर आहेत परंतू आरक्षण मात्र नाही. अशाप्रकारे दोन्ही बाजूने दलितांचेच नुकसान आहे. उदारिकरणाचा हाच सर्वात वाईट परिणाम आहे. परंपरागत व्यवसाय उदा. परीटाचे किंवा धोब्याचे कार्य वॉशिंग मशीन करते आहे. नाव्हयाची जागा ब्यूटी पार्लर व सलून ने घेतली आहे. सरकारने सामाजिक क्षेत्रांचे उदा. शिक्षण, आरोग्य इ. खाजगीकरण केले आहे. ज्यामुळे दलितांची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. कारण या सेवा खाजगी क्षेत्रामूळे अत्यंत महागलेल्या आहेत व दलितांजवळ एवढी आर्थिक मिळकत नाही की ते इतका खर्च या सेवांवर करू शकतील.

शिक्षण आणि योग्यता यावर आधिरित नोकरी मिळविण्यासाठी त्या क्षेत्रातले ज्ञान आणि प्रभावी व्यक्तीमत्वाची गरज आत प्रत्येक क्षेत्रात भासत असते. परंतू दलितांना आरक्षण व शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळत असूनही आजही अनेक दलित असंघटीत स्वरूपाच्या श्रमातच गुंतलेले आहेत. रोजगार सर्वेक्षण 2000 च्या अनुसार 45 टक्के दलित दारिद्रय रेषेच्या खाली जीवन जगत आहेत. जे उदारिकरणापूर्वी 33.70 टक्के होते.[4] जर आपण आरक्षणाचा विचार केला तर असे निदर्शनास येते की, ज्या क्षेत्रात आरक्षण लागू करता येते तिथे रोजगाराच्या संधी कमी आहेत. या विरूध्द जिथे आरक्षण लागू करता येत नाही तिथे मात्र या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होतात.

राष्ट्रीय आयोगाच्या अहवालानूसार विविध सेवाक्षेत्रांमध्ये 15 टक्के आरक्षणनानंतर अनुसूचित जातींच्या लोकांची स्थिती खालीलप्रमाणे होती.

**विविध सेवाक्षेत्रामध्ये 15 टक्के आरक्षणानंतर अनुसूचित जातींचे प्रतिनिधीत्व**

| सेवेची श्रेणी | केंद्रीय सेवा | सरकारी क्षेत्राचा उपक्रम | सरकारी क्षेत्र बॅंक व इतर आर्थिक संस्था | विमाक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| अ | 11.29 | 10.35 | 12.51 | 13.67 |
| ब | 12.68 | 11.05 | 14.88 | 12.40 |
| क | 15.72 | 18.93 | 24.46 | 17.24 |

संदर्भ : नवीन कुमार, उदारीकरण और दलित : उभरती चुनौतिया, उदारीकरण, भूमंडीलकरण एवं दलितसंपादक – अरूण कुमार, रावत प्रकाशन, न्यू दिल्ली, 2009, पृ. 38

राष्ट्रीय आयोगाच्या आणखी एका अहवालानूसार केंद्रीय विद्यापीठात अनुसूचित जातींच्या सेंवांची स्थिती दर्शविली आहे. ही स्थिती तर अधिकच दयनिय आहे.

**केंद्रीय विद्यापीठात अनुसूचित जातींच्या नोक–यांची स्थिती**

| नोकरीचा प्रकार | वी. एच. यू. | ए. एम. यू. | जे. एन. यू. | डी. यू. | जे. एम. आई. | वी. भारती | हैदराबाद सी. यू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रोफेसर | 1/360 | 0/233 | 2/183 | 3/332 | 0/80 | 1/148 | 1/72 |
| रीडर | 1/396 | 0/385 | 3/100 | 2/197 | 1/128 | 1/70 | 2/87 |
| लेक्चरर | 1/329 | 0/521 | 11/70 | 9/140 | 1/216 | 16/188 | 13/44 |

संदर्भ : नवीन कुमार, उदारीकरण और दलित : उभरती चुनौतिया, उदारीकरण, भूमंडीलकरण एवं दलित, संपादक – अरूण कुमार, रावत प्रकाशन, न्यू दिल्ली, 2009, पृ. 39

उपरोक्त तक्त्यावरून असे निदर्शनास येते की अनुसूचित जातींच्या लोकांची संख्या या विद्यापीठात नगन्य आहे. आणि या विद्यापीठात जी काही मोजकी अनुसूचित जातींची मंडळी दिसते आहे ती सुध्दा आरक्षणामूळे नव्हे तर आपल्या योग्यतेच्या आधारे तिथपर्यंत पोहचलेली आहे. देशाच्या संविधानातील अनुच्छेद 46 नुसार कमकुवत वर्गाच्या विकासाची जबाबदारी राज्यावर टाकते. परंतू आजवर या वर्गाच्या विकासासाठी केले गेलेले प्रयत्न या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. उदारीकरण, जागतीकीकरण आजच्या युगात संविधानाने प्रदान केलेल्या आरक्षण व इतर सोयी सवलतीच्या बळावर जे दलित वरच्या वर्गात पोहचलेत त्यांनी आपल्या समाजाचा उध्दार करणे सोडून उलट त्यांचे शोषण करायला सुरूवात केली आहे. एकदा मध्यवर्गात सामिल झाल्याने दलित वर्गाची प्राथमिक व राजकीय ओळख बदलून जाते. त्यांना ते सर्व हवे असते जे उच्च वर्गीयाजवळ असते. त्यामुळे शहरी जीवनात प्रवेश केल्यावर दलितवर्गाची विचारधारा बदलते.

निष्कर्षतः या उदारीकरण, खाजगीकरण व जागतीकीकरणाच्या या तुफानी वातावरणात दलित वर्गाला जो आर्थिक दृष्टया आजही मागासलेला आहे. त्याला सक्षम बनवावे लागेल जेणे करून तो या आव्हानांना सामोरा जावू शकेल. त्यासाठी खाजगी क्षेत्रात आरक्षण, तांत्रिक शिक्षण आणि परंपरागत क्षेत्राशी जुळलेल्या दलितांना प्रतिस्पर्धा करण्यालायक बनवावे लागेल. दलितांना उदारीकरणाचा लाभ कसा करून देता येईल हे ही आव्हान पेलावे लागेल. अनुसूचित जाती व जमाती यातील जातीय दरी भरून काढण्यासाठी सामाजिक समतेचा पुरस्कार करावा लागेल. अमर्त्य सेन सारखे महान अर्थशास्त्रज्ञ म्हणतात की, 'जागतीकीकरणाचा भारतातील सामान्य जनतेला लाभ होवू शकतो. जर योग्य त–हेने शिक्षण, आरोग्य आणि कृषी सुधार संबधीत धोरणे लागू केली गेली तर.' ज्यामूळे दलितांचा खरोखर सामाजिक आर्थिक विकास घडून येईल.

---

**संदर्भः–**


1. उदारीकरण, भूमंडलीकरण एवं दलित, संपादक अरूण कुमार, रावत पब्लीकेशन, पृ. 35.
2. पी. जी. जोगदंड, न्यू एकॉनॉमीक पॉलीसी एण्ड दलित, रावत पब्लीकेशन, न्यू दिल्ली, 2001
3. अमेय कुमार बागची, ग्लोबलायझेन, लिबरलायझेशन एण्ड कल्चरविलिटी, इंडीया एण्ड थर्ड वर्ल्ड, इकॉनॉमीक ॲण्ड पोलीटीकल विकली, नोव्हेंबर, 1999.
4. उदारिकरण, भमंडलीकरण एवं दलित, संपादक अरूण कुमार, रावत प्रकाशन, न्यू दिल्ली, 2009, पृ. 38.


---

# 'शेतकरी राजा' : शेतकऱ्यांच्या विदारक स्थितीचे दाहक दर्शन

**डॉ. प्रा. सौ. जयश्री संजय सातोकर,** प्रगती महिला कला महाविद्यालय, भंडारा.

डॉ. संजय गोविंदराव पोहरकर यांचा 'देव आंघोळीला गेले!'' या प्रसिद्ध काव्यसंग्रहातील शेतक—यांच्या जीवनावर आधारीत एका कवितेचा रसास्वाद प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे. वर्तमानकाळातील शेतक—यांच्या आर्थिक हलाखीचे चित्रण या कवितेत असून ही कविता शेतक—यांना तसेच समाजालाही एक नवा आशावाद दर्शविते.

गोविंदसुत' या नावाने काव्यलेखन करणारे समर्थ महाविद्यालय, लाखनीचे प्राचार्य डॉ. संजय गोविंदराव पोहरकर यांचा 'देव आंघोळीला गेले!'' हा प्रसिद्ध काव्यसंग्रह असून, यात विविध विषयांवर आधरित एकूण एक्कावन्न (51) कविता आहेत. या काव्यसंग्रहाचे शीर्षकच चित्तवेधक व एक नवी जाणीव देणारे आहे. यातील प्रत्येक कविता एक वेगळा विचार अभिव्यक्त करते.

या काव्यसंग्रहाला प्रस्तावना देतांना स्वर्गीय प्राचार्य राम शेवाळकर म्हणतात, ''कविता ज्यांच्या सहाऱ्याने अवतीर्ण होते, त्या शब्दांच्या अंगभूत शक्तीचेही भान कवीला आहे'' याच प्रस्तावनेत ते पुढे म्हणतात, ''या कवितांचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. पण बहुसंख्य कविता सामाजिक जाणिवेतून निर्माण झाल्या आहेत.'' काही निवडक कवितांचा उल्लेख करतांना त्यांनी 'शेतकरी राजा' या कवितेचा आवर्जून उल्लेख केला आहे. या कवितेसंबधी ते म्हणतात, ''शेतकरी राजा यासारख्या कवितेमध्ये नित्य परिचित असे वास्तवच धगधगत असलेले आढळते.'' शेवाळकरांचा हा अभिप्राय शेतकऱ्यांच्या सद्यस्थितितील आर्थिक व सामाजिक वास्तवाशी, जोडून जर ही कविता वाचली, तर शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे नेमके दर्शन घडते. कवीने नेमक्या मार्मिक शब्दांतून ते मांडले आहे. कवीच्या मते, आर्थिक दुर्बलतेमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. काळया आईपासून तो विलग होत आहे. उद्योगजगत शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावू पाहत आहेत. यातून 'सेझ' (Sez) चा प्रश्न निर्माण झाला आहे. परिस्थिती त्याच्या जगण्याचा हक्कच हिरावून घेत आहे. शेतीवर वैश्वीकरणाचा परिणाम होत आहे. शासनाचा आधार नसल्यामुळे तो स्पर्धेतून बाद होत आहे, जणू तो मरणकिंकाळी फोडत आहे. कवी ग्रामीण क्षेत्राशी समरस झाल्यामुळे त्याला शेतकऱ्यांच्या वेदना तीव्रतेने जाणवत आहेत. त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाच्या दाहकतेचा जवळून अनुभव घेतला आहे, हा प्रत्यक्षानुभव त्यांच्या 'शेतकरी राजा' या कवितेतून उमटला आहे. शेतकऱ्यांच्या वाटयाला आलेले दुःख शब्दरूप करतांना ते म्हणतात,

'कर्जाचे डोंगर शिरावर माझ्या
कष्टावरी माझ्या, बॅकांचीच मजा।।
शेतकरी राजा, म्हणती सकल
परी मी विकल देशामध्ये।।'

शब्द अगदी साधेच, पण शेतकऱ्यांची आर्थिक दुरावस्था नेमकेपणाने सूचित करणारे आहेत. बॅकांचे कर्ज फेडण्याची क्षमताही त्याच्यात उरत नाही. अहोरात्र कष्ट करूनही पदरी पडणारे मूल्य अतिशय तोकडे पडते. आणि कर्जाचा डोंगर वाढत जातो. अखेर बॅकाही जुन्या सावकाराच्या रूपात समोर उभ्या ठाकतात.

''भारत हा कृषिप्रधान देश आहे व शेतकरी हाच या देशाचा राजा; अन्नदाता आहे,'' असे म्हटले जाते. प्रत्यक्षात तो कंगाल झाला आहे. दाता न राहता याचक बनला आहे, भिकारी बनला आहे. राजा आणि भिकारी ही दोन परस्परविरोधी टोके कवीने नेमकेपणाने पकडलेली आहेत. एकीकडे त्याला राजा म्हणून संबोधायचे पण प्रत्यक्षात मात्र त्याला भिकारी अवस्थेत जगावे लागावे अशी विदारक स्थिती निर्माण झालेली आहे.

आर्थिक दुर्दशेमुळेच तो आपल्या कुटुंबाचे नीट भरणपोषण करू शकत नाही. अशा परिस्थितीत मुलांचे शिक्षण, लग्न या साऱ्या गोष्टी त्याच्यासाठी स्वप्नवत झालेले आहे. स्वतःला जगाचा अन्नदाता म्हणवणारा शेतकरी स्वतःच पोटभर अन्नाला पारखा झालेला आहे. वस्त्रासाठी कापसाचे उत्पादन करणारा शेतकरी स्वतः मात्र जागोजागी ठिगळे लावलेली वस्त्रे परिधान करतो आहे. अशा दुर्दैवाच्या गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्याला कधी कुठे, 'आदर्श शेतकरी' असा पुरस्कार बहाल करून, शासन आपण शेतकऱ्यांसाठी खूप काही करीत असल्याचा देखावा निर्माण करते. प्रत्यक्षात मात्र सर्वार्थाने गांजलेला हा शेतकरी,

'पोराचे शिक्षण, मुलीचे लगीन
स्वप्नात बघीन सारे काही।।

अन्नाचे मोताद, अन्नदाता जगी
वस्त्रांना ठिगळे, जागोजागी।।
कष्ट करूनिया, जिथे होती हाल
तिथे नको शाल, सन्मानाची।।'

अशा भयावह स्थितीत आहे. वरील काव्यपंक्तीत साध्या साध्या शब्दातील सहजपणे आलेली यमके लक्षवेधक आहेत. लगीन–बघीन, हाल–शाल यासारख्या शब्दकळा नेमकेपणाने, मूळ आशय जिंवतपणे व्यक्त करतात. शेतकरी कष्टकरी असला तरी 'हिन–दिन–पंगू' असा कवीला जाणवतो आहे. इथे कवी अनिलांच्या कवितेतील –

'अरे! जी तुम्ही ही स्थिती निर्मिली
मुळातच ती आहे चुकली
जेथें माणसा काम न मिळे
काम करताही पोटापुरते मिळे न मोल
आहे तो समाज मतलब्यांचा
परपुष्टांचा नफ्फेबाजांचा!
रक्तश्शोषक जळवांचाच!'

या ओळी सहजच आठवतात. कवीही अगदी त्याच भावनेने म्हणतात,

'फुका गौरवाचे, नको शब्द ओठी
घास दोन घाला, भुकेजल्या पोटी।।'

आपल्या वैयक्तिक स्वार्थाकरिता राजकारणी शेतकऱ्यांच्या गौरवाचे ढोल पिटतात. दिखाऊ सन्मान केला जातो. परंतु शेतकऱ्यांच्या दुःखावर केवळ हा पांघरून घालण्याचा प्रयत्न असतो. शेतकऱ्यांच्या समस्या प्रामाणिकपणे सोडविण्याचा प्रयत्न झाला असता, तर स्वतंत्र भारताचा शेतकरी खरोखरच राजा म्हणून दिमाखाने वावरला असता. कवीला त्या भुकेकंगाल शेतकऱ्याला दोन घास घाला, असे आवर्जुन सांगण्याची पाळी आली नसती.

'स्वतंत्र देशात, परतंत्र झालो
लाचार होऊन, दररोज मेलो।।
हाडाच्या रे माझ्या, करतो मी काडया
रक्ताचे पाणी रे, रोज होई।।
घामाने रे माझ्या, भिजते जमीन
कुणीना जामीन माझ्यासाठी।।
माझ्या इज्जतीचा, रोज रे लिलाव
थांबे ना कधी रे, तुमचा बनाव।।'

शेतकऱ्यांच्या वाटयाला आलेली लाचारी, अर्थात पर्यायाने आलेले जिवंत मरण, बाजारपेठेतील त्याची पतहीनता यासारख्या बाबी नेमकेपणाने चित्रित करून, कवीने शेतकऱ्यांच्या दुःखाचा वेध घेतला आहे. त्यांच्या आजुबाजूला राहणारी कर्मचाऱ्यांची मुले मौजेने हिंडतांना शेतकऱ्याला दिसतात. कमी कष्टात अधिक कमाई करणाऱ्यांची मुले एकप्रकारे शेतकऱ्यांच्या मुलांना डिवचत असल्याचे जाणवते. राजकारण्यांना या बाबीचे सोयरसुतक वाटत नाही. केवळ प्रलोभने, खोटी आश्वासने देऊन ते निवडणुकीत दीन शेतकऱ्यांचा पुरेपूर वापर करून घेतात. शेतकऱ्यांच्या दारिद्रयाचा व असहायतेचा ते लाभ घेतात. त्याच्याच जीवावर उठतात, याचे चित्रण कवी नेमकेपणाने करतो.

'कर्मचारी पोरे, मौजेने हिंडती
अन्नावीण पोरे, माझी रे रडती।।
मते मागतांना, माझा कळवळा
पुढे मात्र गळा दाबताती।।'

निवडणूक गेल्यावर शेतकरी राजकारण्याच्या स्मृतिपटलातून अदृश्य होतो. तो पुनः पुढच्या निवडणुकीत प्रगटतो. केवळ राजकीय नेतेच नाही तर शासकीय अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्गही अगोदरच पिचून गेलेल्या शेतकऱ्यांची पिळवणूक करतांना किती निर्लज्ज आणि निर्दयी होतात, याचा वेध कवीने घेतला आहे.

'हाफिसात जाता, किती होई जाच
मेलेल्यास लाच मागताती।।'

आजच्या भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाच्या काळात हया काव्यपंक्ती अधीकच बोलक्या होतात. 'मेलेल्यास लाच' मागण्याची कल्पना ही प्रेताच्या टाळूवरील लोणी चाटण्याऱ्या मनोवृत्तीचे दर्शन घडविते. 'मेलेल्यास लाच' मागण्याची कल्पनाच काळजाला वेधून जाते. जणू काही शेतकऱ्यांच्या जीवनाचे 'वास्तव' इथे अधिक 'गहिरे' आणि 'गडद' होत जाते. कवी येथे शेतकऱ्यांच्या दुर्दशेला कारणीभूत घटकांचा वेध घेतो. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या आधारावर भाव न मिळणे व त्याचवेळी शेतकऱ्यांनी पिकविलेल्या मालाचा व्यापार करणारे व्यापारी मात्र गलेलठ्ठ होणे, अशी काहीशी विचित्र अवस्था शेतकऱ्याच्या वाटयाला आली आहे, म्हणून कवी म्हणतो,

'अन्नधान्य माझे, बाजारात फिके
मातीमोल विके, वावरात।।
व्यापारीच मात्र, जगतात सुखे
आम्ही मात्र मुके, कर्जापायी।।'

यातील फिके, विके, पिके, सुखे, मुके या शब्दरचनांचे क्रमही कवितेला एक विशेष काव्यमूल्य देऊन जाते. कष्ट करून, दारिद्रय झेलत, इतरांना सुखी करणारा शेतकरी, आज समाजात पत गमावून बसला आहे.

'बायको माझी रे, मागे एक साडी

उधारीसाठी रे, धरतो मी दाढी।।
बजावून सांगे, दुकानदार भाऊ
तुले कसा माल, उधारीत देऊ।।'

इथे गयावया करणे, याचना करणे या अर्थी दाढी धरण्याची कल्पना शेतकऱ्यांच्या आयुष्यातील बाजारपेठेतील अप्रतिष्ठा सूचित करते. हालअपेष्टा सोसूनही शेतकऱ्याच्या वाटयाला मात्र अपमानित होणेच नशिबी येते.

'स्वतंत्र देशात, नसे कुणी वाली
करतो हमाली, दिनरात।।
माझ्या वावरात, टोचती रे काटे
चप्पल पायात, कधीही न भेटे।।'

अशा स्थितीत विकलांग, असहाय, अगतिक झालेल्या शेतकऱ्याचा टाहो कवी शेवटच्या कडव्यात मांडून कवितेला विराम देतो.

'रडून कोणाला, सांगावे गाऱ्हाणे
हिंमत धरावी, मरायची।।'

स्वतंत्र भारतात जिथे शेतकरी 'राजा' म्हणून वावरणे गरजेचे होते, तिथे तो असहाय अवस्थेत पडलेला दिसतो. त्याला कुणी वालीच उरला नाही. त्याच्या दुःखाचा टाहो म्हणजे केवळ 'अरण्यरूदन' होय. अशा परिस्थितीत अनेकांना आत्महत्येशिवाय पर्याय नसतो. पण आत्महत्या करणेही सोपे नाही, या जाणिवेने 'हिंमत धरावी, मरायची' या ओळी अधिक जिवंत होतात. वाचक शेतकऱ्यांच्या व्यथेने आणि वेदनेने अंतर्मुख होऊन अस्वस्थ होतो. अशी आशयधन कविता शेतकऱ्यांच्या मुक्या वेदनांचे प्रतीक ठरलेली आहे. स्वातंत्र्यानंतर साराच अपेक्षाभंग झाला आहे. साने गुरूजींच्या कवितेतील आवाहन आणि आशा जणू निरर्थक ठरलेले आहे.

'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान
शेतकऱ्यांच्या राज्यांसाठी लावू पणाला प्राण'

म्हणणारे साने गुरूजी स्वतःच आत्महत्येच्या वाटेने निघून गेले. उरली फक्त कृषीप्रधान देशातील शेतकऱ्यांची करूण किंकाळी ! हेच भयावह वास्तव कविता संपताना मनावर प्रतिबिंबित होते.

'उषःकाल होता होता काळरात्र झाली
अरे पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली !'

असे सुरेश भटाच्या कवितेतील आवाहन मनात संतापाने जागे होते. सहज साध्या सोप्या; पण प्रवाही शब्दांतून शेतकऱ्यांच्या जिवनातील विदारक स्थितीचा भयावह आशय हृदयस्पर्शी होतो. हेच नेमके या कवितेची वैशिष्टय आहे. शेतकऱ्यांच्या अश्रूपूर्ण जिवनाचे वास्तव जणू शेतकऱ्यांच्या आत्मकथनासारखे प्रभावीपणे प्रगट होते. व वाचकांस अंतर्मुख होवून विचार करण्यासाठी प्रवृत्त करते.

---

**संदर्भ**

1) देव आंघोळीला गेले!, कवी गोविंदसुत (प्रा.डॉ.संजय पोहरकर), अक्षय प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे, 30, प्रथम आवृत्ती : 2003.
2) चिरयौवन, अनिल, पुर्नमुद्रण डिसेंबर 1972, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे–नागपूर.

# स्त्री – भ्रुण हत्या – एक सामाजिक समस्या

**प्रा. डॉ. दिपक कृष्णराव पवार**, समाजशास्त्र– विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट ॲन्ड कॉमर्स, 310–ब, नविन नंदनवन, नागपूर–09 Email:profdipakpawar@rediffmail.com,

भारतीय स्त्रियांवर केवळ कुटुंबातच अन्याय होतो असे नाही तर समाजही स्त्रियांवर अन्याय करत आहे. भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षण, वर्तन, कार्य आणि अधिकार इत्यादी सर्वच बाबतीत भेदभावपूर्ण व्यवहाराचा सामना करावा लागतो. लिंग चाचणी करणे मुलींचा गर्भ नाकारणे याशी आपले काही देणेघेणे नाही. आपल्यात असे घडतच नाही. अशा बऱ्याचशा सुशिक्षित व सुसंस्कृत नागरीकाचा भ्रम आहे. आजही अशा अभिजात समाजात प्रत्येक ठिकाणी कळत–नकळत लिंगभेद मुलक वातावरणाची बीजे समाजात पसरवली जात आहेत. त्याचेच भिषण प्रतिबिंब लिंगदराच्या विषमतेतून प्रकट होत आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञानाने समृध्द अशा एकविसाव्या शतकात आपण प्रवेश केला आहे. तरी समाजाच्या मानसिकतेत अजूनही काही बाबतीत आमुलाग्र बदल झाला नाही. रुढी, परंपरा, धार्मिक कल्पनांचा प्रभाव आजही समजातील बुरसटलेली मानसिकता कायम ठेवण्यात जबाबदार आहे. आजच्या आधुनिक काळात स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीचे जिवन जगत आहे. स्त्री पुरुष समानता हे आजच्या जिवनातील सत्य नसून ते वास्तव आहे. तरीपण आजही मुलगा आणि मुली मध्ये फरक केला जातो. जे अधिकार व हक्क पुरुषांसाठी असतात,त्यास परंपरेच्या आधारावर स्त्रियांना वापरु दिले जात नाही. स्त्री ही दुबळी आहे त्यामुळे तिने पुरुषांसारखे वर्तन करु नये अशा भारतीय समाजात पुर्वीपासून समज आहे. त्यामुळे स्त्री व पुरुष यांच्यात भेदभाव केला जातो. भारतात आजही सर्व समाज, धर्म, जाती वंश व प्रदेशामध्ये मुलगी जन्माला येणे ही दुःखद घटना समजली जाते. मुलगी म्हणजे परक्याचे धन, लग्न होऊन शेवटी ती परक्याच्या घरी जाते असा समज दृढ असल्याने मुलीच्या जन्मापासूनच भेदभाव पूर्ण वागणूकीचा सामना करावा लागतो. मुला–मुलींना दिली जाणारी खेळणी सुध्दा भेदभाव पूर्ण असतात. ती मुलींमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण करतात. मुलांना मोटार विमान, ट्रॅक्टर अशी खेळणी दिली जाते. तर मुलींना बाहुली, किचन सामानाचा सेट दिला जातो. बाहुली किंवा बाहुल्यांच्या सेट खेळणी म्हणून दिल्यामुळे स्त्री ही व्यक्ती नव्हे तर ती एक वस्तू 'खेळणी' आहे. याची ती जणू पहिली शिकवणच असते. विवाह समारंभात वधूपक्षा पेक्षा वरपक्षाची बाजू सरस मानली जाते. घराघरात पुरुषांना झुकते माप पुरुष म्हणून मिळते. सणसमारंभात व दैनंदिन जिवनातही पुरुषांची जेवणे आधी स्त्रियांचे नंतर, अन्न जेमतेम असेल तरी पुरुषांच्या पंगतीला आग्रह, स्त्रियांना कमी पडले तरी हरकत नाही, असे चित्र सर्वत्र दिसते. या बाबत भारतीय स्त्रियांना अजिबात खंत नाही. कारण कमीपणा घेण्याचे मुल्य तिच्या रक्तातच मुरलेले आहे. लहानपणी घरात सती सावित्री, पार्वती, सिता यांच्या गोष्टी सांगीतल्या जातात. या सर्व पुराणातील स्त्रिया पतिव्रता होत्या हे मनावर बिंबवले जाते. पण त्यांच्यातील कणखरपणा, जिद्द यांच्या बद्दल मात्र बोलल्या जात नाही. अगदी जन्मापासून तिचे सामाजिकरण याच प्रमाणे होत असते. याच मानसिकतेतून सामान्य माणसापासून तर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायधिशापर्यंत अनेकांना लग्नाची मुलगी दायीत्व वाटते. ''सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिश माननीय ग्यान सुधा मिश्रा यांनी स्वतःहाचा ताळेबंद जाहीर करतांना दायीत्वाच्या (Libelities) कप्यात स्वतःच्या दोन मुली असे जाहीर केले होते.''[1] जन्मापासून सुरु झालेला हा भेदभावपूर्ण वागणूकीचे तरुण वयात अन्याय व अत्याचारात रुपांतर होते. भारतातील आकडेवारीनुसार पुरुषांपेक्षा स्त्रियांचाच जास्त बळी जातो. स्त्रियांच्या संर्दभात हुंडयासाठी छळवणूक अपहरण, बलात्कार, लैंगिक छळ होतो पूर्वी तर स्त्रियांना शिक्षण घेण्याचाच अधिकार नव्हता, आज स्त्रिया शिक्षण घेत आहे. पण मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणात फरक करण्याची प्रवृत्तीही अजूनही मोठया प्रमाणात आहे. त्यामुळेच भारतात स्त्रीपुरुष साक्षरतेच्या प्रमाणात स्त्रियांची साक्षरता कमी आहे. उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षामध्ये मुलींचे प्रमाण आजही कमी आहे.

भारतीय स्त्रियांवर केवळ कुटुंबातच अन्याय होतो असे नाही तर समाजही स्त्रियांवर अन्याय करत आहे. भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षण, वर्तन, कार्य आणि अधिकार इत्यादी सर्वच बाबतीत भेदभावपूर्ण व्यवहाराचा सामना करावा लागतो. लिंग चाचणी करणे मुलींचा गर्भ नाकारणे याशी आपले काही देणेघेणे नाही. आपल्यात

असे घडतच नाही. अशा बऱ्याचशा सुशिक्षित व सुसंस्कृत नागरीकाचा भ्रम आहे. आजही अशा अभिजात समाजात प्रत्येक ठिकाणी कळत–नकळत लिंगभेद मुलक वातावरणाची बीजे समाजात पसरवली जात आहेत. त्याचेच भिषण प्रतिबिंब लिंगदराच्या विषमतेतून प्रकट होत आहेत. त्यामुळेच मुलीपेक्षा मुलास प्राधान्य देण्याची वृत्ती आजही आपल्या देशात मोठया प्रमाणात दिसून येते. मुलीचे ओझे नको, मुलगा असेल तर अगदी सुरक्षितता तोच वृध्दापकाळाचा आधार, मग मुलगा हवाच आणि मुली नकोच. या प्रवृत्तीमुळे कुटुंबात मुलगा होण्याची वाट बघतांना अनेक मुलींना जन्माला येण्यापूर्वी गर्भातच हत्या केली जाते. एक संस्थेच्या सर्वेक्षणामध्ये गर्भजल परिक्षणानंतर करण्यात आलेल्या 8000 गर्भपातांमध्ये 7999 गर्भपात गर्भामध्ये मुलगी असल्यामुळे करण्यात आल्याचे आढळून आले आहे. महाराष्ट्र सारख्या पुरोगामी राज्यात गेल्या दहा वर्षात साडेचार लाखाहुन अधिक स्त्री अर्भकाची हत्या करण्यात आली आहे. भारतातील एकूण लोकसंख्येचे स्त्रीपुरुष प्रमाणात दिवसेंदिवस तफावत वाढत आहे.याचे कारण फक्त मोठया प्रमाणात होत असलेल्या स्त्रीभ्रुण हत्याच आहे. गेल्या काही वर्षात 'स्त्री भ्रुण हत्या' या समस्येने गंभीर रुप धारण केले आहे.

**स्त्री भ्रुण हत्यांचे स्वरुप** :– भारतातील लोकसंख्येमधील 'स्त्री पुरुष प्रमाण' लक्षात घेतल्यानंतर मागील 110 वर्षात दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण, वाढण्याऐवजी कमी कमी होत आहे. 1901 मध्ये दर हजारी पुरुषां मागे स्त्रियांचे प्रमाण 972 होते तर कमी होत होत 1991 मध्ये 927 पर्यंत आले,आणि 2001 ला 933 झाले तर ते थोडे वाढून 2011 ला 940 इतके वाढले आहे.दहा वर्षात हजारामागे 7 महिलांची त्यात भर पडली आहे. 1971 नंतर प्रथमच हजार पुरुषांमागे महिलांचे प्रमाण वाढले आहे. महिलांच्या संख्येतील ही वाढ 29 राज्ये आणि केंद्रशासीत प्रदेशांमध्ये नोंदवली गेली आहे. जम्मु आणि काश्मीर, बिहार आणि गुजरातमध्ये मात्र दरहजारी पुरुषांमागे महिलांची संख्या घटली आहे. मात्र केरळ मध्ये हजार पुरुषांमागे महिलांची संख्या 1084 तर पुडुचेरीमध्ये 1038 आहे. तर दमण व दीवमध्ये हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे 618 आहे. 2001 ते 2011 काळात पुरुषांची संख्या 17. 19 टक्यांनी वाढली. तर महिलांची संख्या 18.03 टक्यांनी वाढली. देशात शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील मुलांची संख्या 15 कोटी 88 लाख असून गेल्या दशकात त्यात 50 लाखाची घट झाली आहे. ही घट उणे 3.08 टक्के इतकी आहे. गेल्या दशकभरात 18 कोटी 14 लाख 55 हजार लोकसंख्येची भर पडली आहे. एकूण लोकसंख्या वाढीचे प्रमाण मागील दशकापेक्षा कमी झाले आहे. पण शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील मुलींच्या प्रमाणात काही राज्यात थोडी वाढझाली असली, तरी पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, गुजरात, तामिळनाडू मिझोराम, आणि अंदमान निकोबार बेटे येथे हजार मुलांच्या प्रमाणात मुलींची संख्या 914 आहे. ही मोठी चिंतेची गोष्ट आहे. त्याहीपेक्षा मुले–मुली लिंगप्रमाण हरीयाणात सर्वात कमी 830 तर त्यानंतर पंजाब मध्ये 846 इतके आहे. हे अतिशय चिंताजनक आहे.एकूणच भारतात शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील 1000 मुलांमागे मुलींचे प्रमाण 1991 ला 946, 2001 ला 913 तर 2011 ला 883 पर्यंत खाली आले आहे. जेव्हा हा वयोगट योग्य वयात जाईल तेव्हा बाहेर देशातून काय? मुलींना आयात करणार (संपूर्ण जगात स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा कमीच आहे) की बहुपती विवाह प्रथा अस्तित्वात येणार? या विषमतेतून समाजात कितीतरी समस्या निर्माण होऊन समाजात गोंधळ नक्कीच निर्माण होणार आहे. नैसर्गिक जन्मदराप्रमाणे 100 मुलांमागे 105 मुली असायला पाहिजे म्हणजे 2011 च्या जनगणने प्रमाणे 1000 मुलांमागे 1,050 मुली असायला पाहीजे होत्या. म्हणजेच एक मिलीयन लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे प्रमाण 512 मिलीयन असायला हवे होते. पण केवळ 490 मिलियन आहे. म्हणजेच एका दशकात 20 ते 25 मिलियन स्त्रिया नाहीशा होतात. ''नोबल पारितोषिक विजेते जागतिक किर्तीचे अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन म्हणतात, 'एक बिलियन लोकसंख्येच्या भारतातील 25 मिलियन स्त्रिया कशा? नाहीशा झाल्या, याचे उत्तर द्यावे लागेल''[2] अर्थातच 25 मिलियन स्त्रियांपैकी काहींचा जन्मच झाला नाही आणि ज्यांचा जन्म झाला त्यांना भेदभाव पूर्ण मानसिकतेतून जगण्याची संधीच मिळाली नाही हेच यामागचे वास्तव आहे.

**स्त्री भ्रुण हत्येची पध्दती** :– पुर्वी मुलींना जन्मानंतर ती मुलगी आहे म्हणून मारले जायचे. जन्माला आल्याबरोबर जन्मदात्री स्वतः आई, दाई, आजी किंवा इतर नातेवाईक तिच्या नरडीचा घोट घेऊन, बिछान्यात श्वास कोंडून, विष किंवा विषयुक्त पदार्थ देऊन मारुन टाकायचे आणि मृतच जन्माला आली होती असा कांगावा करायचे. समजा जन्माला आल्याबरोबर मुलीला मारुन टाकले नाही किंवा मारुन टाकण्याची हिंमत झाली नाही. तर तिची एवढी हेळसांड करायची की तिचा बालपणीच मृत्यु झाला पाहीजे. (वैद्यकीय शास्त्रानुसार मुलींमध्ये गर्भात असो की, जन्माला

आल्यानंतर रोग प्रतिकार शक्ती मुलांपेक्षा जास्त असते. मुली मुलापेक्षा शरीर स्वास्थाने सक्षम आहे तरीपण बालमृत्यूचे प्रमाण मुलींचेच जास्त आहे) आणि त्यातही ती तग धरुन जिवं राहीली तर तिच्या लग्नापर्यंत तिला ओझे किंवा दायीत्व समजणार.

पुर्वी तिला जन्माला तरी येता येत होते. पण आता विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करुन अलीकडे तिला जन्मालाच येऊ देत नाही. नवनविन तंत्रज्ञानाने माणसाचे जिवन सुखकर झाले. अनेक असाध्य रोगावर विज्ञानाच्या नवनविन शोधामुळे आपण मात करु शकलो. आपले सरासरी आयुष्यमान त्यामुळेच झपाट्याने वाढले. पण स्त्री–भ्रुण हत्येबाबत विज्ञान वरदान नसुन शाप ठरले आहे. सोनोग्राफी तंत्रज्ञानामुळे गरोदर आणि बाळंतपणात माता मृत्यूचे प्रमाण (Fertility Death Rate) यामुळे खुप कमी झाला. इतकेच नाही तर विकृत व पंगू अपत्य जन्माला येण्याचेही प्रमाण कमी झाले. हे वरदानच, पण सोनोग्राफी तंत्रज्ञानामुळे स्त्रीच्या गर्भात असणाऱ्या भ्रुणाचे लिंग कळु लागले आणि हाच विज्ञानाचा शाप स्त्री भ्रुण हत्येकरीता ठरला आहे. नैतिक दृष्टीने डॉक्टरांनी स्त्रीच्या गर्भातल्या भ्रुणाचे लिंग कोणत्याही स्थितीत सांगू नये. परंतू नैतिक अःधपतन झालेल्या या व्यवसायात डॉक्टर सर्रास लिंग चाचणी घेऊन सांगू लागले. समाजातील सुशिक्षित वर्ग (अशिक्षित नव्हे) या माहीतीचा व मार्गाचा वापर करुन लिंग निदान करुन घेऊन. गर्भात जर स्त्रीभ्रुण असेल तर डॉक्टरांना अधिक पैसे देऊन गर्भपात करुन घेत आहे. त्यामुळेच स्त्रीभ्रुणाची हत्या मोठया प्रमाणात होऊ लागली. म्हणजे असे म्हणता येईल विज्ञानाच्या प्रगतीने मानवी जीवन व आयुष्य सुधारले. तथापि मानवी जिवनात क्रांती घडविणाऱ्या वैज्ञानिक संशोधनाचा दुरुपयोगही झाला आणि आजही मोठया प्रमाणात तो होतो आहे.''मनाच्या देवाऱ्यात स्त्री ही आदिशक्ती म्हणून पूजली जाते. मात्र प्रत्यक्ष व्यवहारिक जीवनाच्या पातळीवर ती नकोशी ठरविली जाते. सोयीनुरुप कधी ती उपभोगाची वस्तुही ठरविली जाते. तिच्या गर्भातूनच तुम्हा आम्हा साऱ्यांच्या जन्माची कहाणी सुरु होते.''[3] ती आई, पत्नी, बहीण, प्रेयसी, मैत्रीण, सखी हवी पण मुलगी नको. समाजाची ही मानसिकताच स्त्री भ्रुण हत्येला जबाबदार आहे.

तार्किकता आणि विज्ञानवाद ही मुल्ये शिक्षणातुन आपोआप रुजत नाही, हे स्त्री भ्रुण हत्येल्या माध्यमातून दिसून येते. कारण समाजाकडे सुक्ष्म पण लक्ष दिले असता असे दिसुन येते की शिक्षितांचा वर्ग या प्रकारची स्त्रीभ्रुण हत्या करण्यात अग्रेसर आहे.

**स्त्री –भ्रुण हत्या रोखण्यास उपाय** – कायदा – भारतात तसे कायद्यामुळे कोणतेही प्रश्न सुटत नाही किंवा समस्या नष्ट होत नाही. कारण कायदा राबविणारी भ्रष्ट पोलीस व प्रशासन यंत्रणा, ही यंत्रणा गर्भ लिंग परिक्षणातुन आपला वाटा, हप्ता मिळाला की उलट सहकार्य करणार आणि प्रामाणिक वैद्यकिय सेवा देणाऱ्याला त्रास देणार. त्यामुळे गरजवंतांना सोनोग्राफी टेस्ट करणे कठीण जाणार. स्त्री भ्रुण हत्या रोखण्याकरीताच भारतात ''प्रसवपूर्व निदान तंत्र (विनिमय आणि दुरुपयोग) प्रतिबंध 1994'' हा कायदा आणला गेला. पण या कायद्याने स्त्रीभ्रुण हत्येवर विशेष नियंत्रण न मिळवता आल्याने 2002 ला यात दुरुस्ती होऊन 14 फेब्रुवारी 2003 पासून नवा कायदा आणखी कठोर करुन,''गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा 2003'', अस्तित्वात आला. या कायद्यानुसार गर्भलिंग निदान तंत्रावर नियंत्रण आहे गर्भलिंग निदान तंत्राचा दुरुपयोग करुन, गर्भलिंग निदान करुन मुलीचा गर्भ असल्यास तो नाहीसा केल्यास, लिंग निवड करणाऱ्यास 10 हजार रुपये दंड व 3 वर्षे कारावासाची शिक्षा देण्याची तरतुद केली. आहे पण 2003 नंतर ही या कायद्याची अंमलबजावणी योग्य झाली नाही. त्यामुळे 0 ते 6 वर्षे वयाच्या मुलींचे प्रमाण 913 वरुन 883 वर आले आहे. समजा कायद्याची अंमलबजावणी कठोर झाली असती तर असे स्त्री–पुरुष विषम प्रमाणाचे चित्र दिसले नसते. सध्या या प्रश्नाकडे सरकार, स्वयंसेवी संस्था आणि समाज सुधारकांचे लक्ष आहे. कायदयाची अंमलबजावणी होत आहे. पण भारतातील श्रीमंत, मध्यमवर्गीय, सुशिक्षीत मात्र त्यातुन पळवाट काढुन शेजारच्या देशात जावून गर्भ निदान करत आहे. शेवटी विकृत सामाजिक मानसिकता भारी पडत आहे.

कायद्याने प्रश्न सुटन नाही. जो पर्यंत कायद्याला समाजाचे पाठबळ मिळत नाही. तेव्हा समाजातील सर्व स्तर आणि समुहात जाणिव जागृत करुन, स्त्री–पुरुष समान आहेत. ही मानसिकता रुजवून आणि भविष्यात स्त्रियांची संख्या कमी झाल्यास काय? परिस्थिती निर्माण होऊ शकते, हे समाज मनात बिंबवूनच स्त्री–भ्रुण हत्येचा प्रश्न सुटू शकतो.

............................................................

संदर्भ :

1 चौकर शुभदा : 'अजन्माचे आर्जव' लोकसत्ता, चतुरंग, शनिवार, 16 एप्रिल 2011

2 देशमुख ऋतूजा : जेंडर 3 कोटी मिलेनियम डेव्हलपमेंटचे ध्येय, लोकमत, सखी दि. 17 नोव्हेंबर 2005

3 चौकर शुभदा : 'अजन्माचे आर्जव' लोकसत्ता, चतुरंग, शनिवार, 16 एप्रिल 2011

....................................................................

संदर्भ ग्रंथ :

1 Jyoti Mitra, Women and Society – Equality and Emporement, Kanishka Publisher, New Delhi, 1999

2 डॉ. प्रदीप आगलावे, भारतीय समाज सरंचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर

3 डॉ. कालीदास भांगे, प्रा. चांगदेव मुंडे, लोकसंख्या समाज आणि समस्या, चिन्मय प्रकाषन, औरंगाबाद

4 ज्ञानेन्द्र रावत, औरत – एक समाजषास्त्रीय अध्ययन, विश्वभारती पब्लिकेषन, नई दिल्ली, 2005

5 मंजू गुप्ता एंव सुभाषचंद्र गुप्ता, भ्रूण हत्या और महिलायें, अर्जुन पब्लिषिंग हाऊस, दिल्ली–53, 2009

6 डॉ. मृदूला शुक्ला, स्त्रियों का घटता अनुपात – कारण एवं समाधान, शेरणी पब्लिकेषन, कानपुर, 2009

7 रमा शर्मा, एम्. के. मिश्रा, नारी शोषण – आइने और आयाम, अर्जुन पब्लिषिंग हाऊस, दिल्ली–53, 2010

Periodicals:- 1 समाज जागरण ( मासिक) प्रकाषक – महात्मा फुले षिक्षण संस्था, नागपूर, ऑगस्ट 2010

दैनिके :– 1 लता दाभोळकर, प्रत्येक कळी उमलण्यासाठी, लोकसत्ता, चतुरंग, नागपूर, 20 मार्च 2010

2 अरुणा बुरटे, स्त्रीःभ्रूण हत्या नव्हे 'गर्भ लिंग निवड' मधूरिमा– 13 सप्टेंबर 2012

3 शुभदा चौकर, 'अजन्माचे आर्जव' – लोकसत्ता चतुरंग, 16 एप्रिल 2011.

....................................................................

( पृष्ठ 94 का शेष भाग......) इस मनुवादि और प्रतिगामी दृष्टिकोन को बामसेफ संगठन ने समाप्त करने के लिए पहल करनी चाहिए। 8) इस प्रदेश और देश में बिजली, पानी, सड़क और स्वास्थ्य से यहाँ के दलित शोषित मागासवर्गीय कर्मचारी परेशान है। इस परेशानी को बामसेफ संगठन ने अपने आंदोलन का प्रमुख मुद्दा बनाकर सारे महाराष्ट्र और देश के सरकारो को झुकाना चाहिए और सड़क पर उतरकर आंदोलन करना चाहिए। 9) बहुजन समाज में जन्मे कर्मचारियों की स्वतंत्र महाराष्ट्र और देश में अनगीनत समस्याएँ है जिनमे प्रमुख है सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक और शैक्षिक समस्या बड़े पैमाने पर विकराल रुप धारण कर चुकी है। इस समस्या को बामसेफ संगठन ने जितना जल्दी हो सके उसका निराकरण करना चाहिए। 10) जो लोग भ्रष्टाचार कर रहे है उनको नौकरी से बरखास्त करने के लिए शासन में बैठे हुए आमदार–खासदार तथा मंत्रीयों पर दबाव डालकर मागासवर्गीय लोगों को उन जगहों पर उनको नौकरी देने के लिए बामसेफ ने अपना प्रमुख जनआंदोलन करना चाहिए। 11) लोकपाल बिल जो वर्तमान में ज्वलंत मुद्दा है इस पर शासन ने सार्वमत लेने के लिए दबाव बनाने की नीति का बामसेफ ने इस्तेमाल करना चाहिए। 12) निजीकरण सुधार हेतु संविधान में संशोधन करने और उसमे दलित, शोषीत, पिड़ीत, वंचीत तथा पिछड़ो को भागीदारी मिलने हेतू बामसेफ ने शासन पर दबाव डालना चाहिए। ऐसा ही दृष्टिकोन उपरोक्त समस्या पर बामसेफ के समग्र गुटो ने अपनाना चाहिए, तो ही यह संगठन कांशीराम के जमाने जैसा पैदा होकर सारे देश में मनुवादी, गांधीवादी तथा ब्राम्हणवादीयों में धाक जमा सकता है। और बहुजन समाज को मान–सन्मान दे सकता है उसी प्रकार उसमे सामाजिक एवं राजनीतिक चेतना जगा सकता है। यही बामसेफ ने वर्तमान में करना चाहिए नहीं तो इस संगठन का भारत में नाम लेने वाला वर्तमान में कोई नही रहेगा। यही बामसेफ से संषोधनकर्ता की अपील है।

# पालक–बालक संबंधाचा अभ्यास

**प्रा.डॉ.विद्या ठवकर,** गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख, अशोक मोहरकर. महाविद्यालय, अडयाळ, जि. भंडारा.

गतिमानता हे आधुनिक जीवनाचे तंत्र आहे. बालकाला प्रगतिशील गती द्यावयाची असेल तर त्याचे संगोपन देखील तेवढेच चांगले होणे आवश्यक आहे. पालक बालक समृध्द संबंधाचा परिपाक म्हणजे समाजमान्य वर्तन, प्रगतिशील जीवन होय. प्रेमाची गुतंवणुक केल्यामुळे पालक–बालक संबंध समृध्द होतात. म्हणूनच म्हटले जाते की, शुध्द संस्कारापोटी, बालके योग्य विकसित होतील.

**प्रस्तावना** :– बाल्यकाळातील अनुभव हे महत्वपूर्ण असतात. त्यांचा बालकांच्या सर्वांगींण विकासावर गंभीर परिणाम होतो. हे अनेक शास्त्रज्ञ आतापर्यत सागंत आलेले आहे. त्याकरीता आवश्यक असलेल्या बालकाच्या शारीरिक व मानसीक गरजा बहुतांशी कुटुंबातच पूर्ण होतात. कुटुंबात माता पिता व बालक याच्यामधील सबंधास पालक बालक असे म्हणतात. कुटंबाचे अत्यतं महत्वाचे कार्य असते ते मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून.

**पालक– बालक संबंधाचे महत्वः–** बालकांचा शारीरिक मानसीक, बौध्दिक, सामाजिक व नैतिक विकास पालक–बालक सबंधावर अवलबूंन असतो. पोषक आहार, योग्य विश्रांती, नियोजित दिनक्रम व खेळ खेळण्याची संधी पालकाकडून मिळाल्यास शारीरिक सुदृढता निर्माण होते.

माता पित्याचे प्रेम विश्वास, सूरक्षितता मिळाल्याने मुंलाना भावनीक व मानसीक पातळीवर ताण–तणाव जाणवत नाही. आनंदी राहतात. काही पालक मुलांना त्यांच्या मनाप्रमाणे खेळण्यास प्रोत्साहन देतात. मुंलामध्ये स्वतः कृती करण्याचा आत्मविश्वास निर्माण होतो. अशां मुंलाना स्पर्धा करणे आवडत असते. पालक–बालक संबंध हे लवचीक स्वरूपाचे असले पाहीजे. घरातील प्रत्येकांना, मुंलाना आपले विचार मांडण्याचा पूर्ण अधिकार स्वातंत्र्य असतो. तेव्हा त्यांच्या अस्तित्वाची जाणीव होवून आत्मविश्वास वाढतो, स्वाभिमान वाढतो.

**पालक–बालक संबंधात मातेचे विशेष महत्व :** बालकाचा जन्म होताच त्याचे पोषण करणारी व्यक्ती म्हणजे 'माता' होय गर्भामधील बालकाची वाढ व विकास मातेच्याव्दारे होत असते. मानव नवजात अवस्थेपासून पुढील विशिष्ट टप्प्यापर्यंत परावलंबी असतो. तेव्हा त्यांचे संगोपन आईच करित असते. तिच्या दुधाने बाळाचे पोट भरते. व पोषण होते. तिच्या स्पर्शाने बालक समाधानी होते. व त्यास सुरक्षित वाटते. हे सर्व लक्षात घेवुन पुढील विषयाची निवड करण्यात आली.

**विषय निवडः–** अध्ययनाकरीता पालक–बालक संबंधाचा अभ्यास या विषयाची निवड करण्यात आली.

**उदिष्टयेः– 1.** पालकांचा शैक्षणिक स्तर अभ्यासणे. 2. पालकांचा बालकांच्या शैक्षणिक विकासाबद्यल माहिती जाणून घेणे. 3. बालकांच्या आहाराविषयी माहिती जाणून घेणे. 4. बालकांच्या वर्तनाचा अभ्यास करणे.

**साहित्य अवलोकनः** पी. सिंग व एम. बी प्रसाद यांनी केलेल्या अध्ययानूसार घरातील वातावरण व पालक–बालक संबंधाचा बालकांच्या भावनिक समायोजनेवर प्रभाव पडतो असे त्यांच्या निदर्शनात आले. रिब्बल यांच्या मते, शिषुचे मातापित्याशी असलेले संबंध प्रतिकुल असेल तर शिषुमध्ये अशा प्रतिक्रिया उत्पन्न होतात की, त्यामुळे प्रौढावस्थेत व्यक्तीत्वासंबंधी विकृती उत्पन्न होवू शकते. **'डॅम्बीस' या** मराठी चित्रपटात पालकांविषयी त्या बालकामध्ये दुरावा निर्माण होतो. पालक बालकांना वेळ देण्यासाठी त्यांच्याजवळ वेळ नसतो. त्याकरीता नकली आजोबांची भूमिका करणारा मकरंद अनासपूरे खरोखरचे आजोबा म्हणून त्याच्यात आजोबा–नातू असे संबंध प्रस्थापित झाले. परंतु बालक–पालक याच्यांत मात्र शेवटपर्यंत दुरावा प्रस्थापित होतो. आणि आजोबासाठी नातु खूप काही जवळचं नातं असत. हे त्या चित्रपटातून निदर्शनात आले.

**गृहितकृत्यः– 1.**पालक शिक्षित असतात. **2.** बालकाच्या शिक्षणाबद्द्ल पालक प्रयत्नशील असतात. 3. बालकाचे सगोंपन व आहाराविषयी काळजी घेतली जाते. **4.** बालकाचां स्वभाव शांत व समाधानी असते.

**संकलीत माहीतीचे विश्लेषणः–**

तक्ता क्रमांक 1

**आई –वडिल नोकरीवर असणांर कुटुंब**

| पालक | नोकरी | बालक | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| आई | होय | 3 | 4 | 07 |
| वडील | होय | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते,की पालक दोघेही नोकरीवर असणारे कुटुंब आहेत. त्यामध्ये बालकांची संख्या मुलांपेक्षा मुलींची संख्या अधिक आहे.

**फक्त वडील नोकरीवर असणारी कुटुंब**

तक्ता कंमाक 2

| पालक | नोकरी | बालक | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| आई | गृहिणी | 2 | 3 | 05 |
| वडील | शिक्षक | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, फक्त वडिल नोकरी करणारे कुटुंब आहे. त्यात बालकांची संख्या मुलांपेक्षा मुलीची संख्या अधिक आहे.

**निष्कर्ष –**

1. सर्व पालक शिक्षित आहे. त्यामुळे बालकांच्या शिक्षणाबद्दल योग्य विचार करतात. सदैव त्याबाबतीत प्रयत्नशील आहेत.

2. बालकांच्या शारीरिक वाढीच्या दृष्टिने योग्य समतोल आहाराकडे लक्ष दिले जाते.

3. पालक दोन्ही नोकरीवर जरी असले तरीही आपल्या पाल्यांची नीट जोपासना केली जाते. असे निदर्शनास आले.

4. संवाद साधण्यासाठी वेळ काढल्या जाते. प्रत्यक्षात मुलाखतीवरून लक्षात आले.

5. सर्व मुलांचा स्वभाव हा शांत, संयमी असल्याचे लक्षात आले. एंकदरीत पालक–बालक संबंध व्यवस्थित असल्याचे लक्षात आले.

---

**संदर्भ सूची–**

**1.** बालविकास, डॉ. ज्योती गायकवाड
2. मानवशास्त्र, सौ. लिना कांडलकर
3. बालमनाविज्ञान, विजेन्द्र कुमार वशिष्ट
4. मातृकला व बालविकास, प्रा. सौ. प्रियवंदा श. लाठकर

---

# आंतरजातीय विवाहातील अडचणी / अडथळे

**डॉ. राजेंद्र कांबळे,** इंदिरा गांधी कला–वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर

आंतरजातीय विवाह म्हणजे मिश्र विवाह असून असे विवाह केवळ आधुनिक काळात होतात असे नाही तर परंपरागत काळात देखील असे विवाह व्हायचे. परंपरागत काळात विवाहसंस्था जात आणि वर्ण यांच्या तटबंदीत अडकली नव्हती. कालांतराने धर्मशास्त्रयुगात व मनुद्वारा विवाहसंस्थेवर कडक बंधने लादल्या गेलीत व विवाह केवळ जाती अंतर्गत व्हायला लागलेत व रोटी बेटी व्यवहार बंद झाला.

आधुनिक काळात स्वातंत्र्यानंतर अनेक कायदे अस्तित्त्वात आल्याने आंतरजातीय विवाह होतांना दिसतात मात्र समाजाने या विवाहाला अजुनपर्यंत पूर्णतः स्वीकारल्याचे दिसून येत नाही. त्यात प्रमुख अडचण जात व जातीवादी मानसिकता असल्याचे दिसून येते.

**डॉ. धूर्वे**[1] यांच्या मते ''आंतरजातीय विवाह म्हणजे मिश्र विवाह असून ज्या विवाहाद्वारे रक्त संबंधी, एकात्मक वृत्ती मजबूत करणे व राष्ट्रीयत्वाचे पोषण करणे इत्यादी उद्देश पूर्ण केले जातात त्या विवाहाला आंतरजातीय विवाह असे म्हणतात.''

**दि. प. लाखनीकर**[2] यांच्या मते 'जातीबाहेर होणारा विवाह म्हणजे आंतरजातीय विवाह होय.'

**डॉ. राजेंद्र कांबळे**[3] यांच्या मते ''दोन वेगवेगळया (विभिन्न) जातीच्या मुला–मुलींमध्ये होणारा विवाह म्हणजे आंतरजातीय विवाह होय.''

**अनिल थत्ते व रामकृष्ण मोरे**[4] असे लिहीतात की, ''एक काळ असा होता ज्या वेळी वर्ण आणि जात यांच्या तटबंदित विवाहसंस्था अडकली नव्हती. जातीविहीन, वर्गविहीन असा समाज धर्मसूत्र आणि धर्मशास्त्राचे दंडक निर्माण होण्यापूर्वी अस्तित्वात होता. कालांतराने धर्मशास्त्राच्या वा जातीय बंधनाच्या कठोर नितिनियमामुळे ही व्यवस्था खंडीत झाली. जात आणि धर्म यांच्या बंधनात विवाहसंस्था उत्तरोत्तर अधिकाधिक जखडत गेली. प्राचिन काळात वर्ण किंवा जात हीच मुलांची असली पाहिजे असा काटेकोर नियम नव्हता.''

**कैलास सेठ व मोहनदास नैमिशराम**[5] लिहीतात, ''बौद्ध पूर्व समय में चातुर्वर्ण्य व्यवस्था एक उदार व्यवस्था थी इसका विवाह व्यवस्था से कोई संबंध नही था। चातुर्वर्ण्य व्यवस्था में जहाँ चार विभीन्न वर्णो के अस्तित्व को स्वीकार कर लिया था वहा इन वर्णो में

आपस में विवाह संबंध करने पर कोई निषेध नही था।''

परंपरागत काळात अनेक मिश्रविवाह झाल्याचे खालील पूराव्याद्वारा स्पष्ट होते.

| | पती | त्याचावर्ण | पत्नी | तिचा वर्ण |
|---|---|---|---|---|
| 1 | शांतनु | क्षत्रिय | गंगा | शुद्र अनामिका |
| 2 | शांतनु | क्षत्रिय | मत्स्यगंधा | शुद्र धींवर स्त्री |
| 3 | पाराशर | ब्राम्हण | मत्स्यगंधा | शुद्र धींवर स्त्री |
| 4 | विश्वमित्र | क्षत्रिय | मेनका | अप्सरा |
| 5 | ययाति | क्षत्रिय | देवयानी | ब्राम्हण |
| 6 | ययाति | क्षत्रिय | शर्मिष्ठा | असुरी–अनार्य |
| 7 | जरत्कारू | ब्राम्हण | जरत्कारि | नाग–अनार्य |

''वैश्य वर्णीय राजा हर्षवर्धन याने आपली कन्या वल्लभी ध्रुवभट्ट या क्षत्रिय राजाला दिली होती. हर्षवर्धनाची बहिण राजश्री कनोजचा क्षत्रिय राजा गृहवर्मा याला दिली होती.''[6] अनार्य राजा विराटाची मुलगी उत्तरा हिच्याशी अभिमन्युने विवाह केला.[7] श्रीकृष्ण स्वतः वर्ण संस्कारातून जन्माला आला.[8]

अशाप्रकारे वैदिक व परंपरागत युगामध्ये अंतरविवाहाचे नियम नव्हते. वर्ण पाश्चात्य देशाप्रमाणे मुक्त होते. ''उत्तर वैदिक युगात मात्र आंतरजातीय विवाहावर कठोर प्रतिबंध लादले तर धर्मशास्त्रयुगात आंतरजातीय विवाहावर पूर्णपणे बंधने होती. मध्ययुगीन काळात हिंदू स्त्रीयांचा मुसलमान पुरूषाबरोबर विवाह रोखण्यासाठी तसेच रक्त शुद्धता व सतिप्रथेला सुरू ठेवण्यासाठी बालविवाह प्रथा व सतीप्रथेला व्यापक स्वरूप दिले व पर्दापद्धती लादून स्त्रियांच्या गतीशिलतेला, पुनर्विवाहाला पूर्णपणे थांबविले.''[9]

''**डॉ. आंबेडकरांच्या**[10] मते आर्याच्या तीन जातीमध्ये त्यांचे मिश्र विवाह इतक्या मोठया प्रमाणात झाले की मुळच्या शुद्र लोकांचे रूपांतर आर्यलोक असे आतापर्यंत होत आलेले आहे.'' नंतर मनूने विवाहाच्या बाबतीत अत्यंत कठोर नियम तयार केलेत व त्यानंतर जातीबाहय विवाह करण्याचे धाडस लोक करू शकले नाहीत. **मनू**[11] लिहितो, एखाद्या शुद्राने सर्वात वरिष्ठ जी जात आहे त्याच जातीतील मुलीच्या प्रेमाची याचना केली तर त्याला देहांताची शिक्षा द्यावी. त्रैवर्णिक जातीत जन्मलेल्या स्त्रीबरोबर एखाद्या शुद्राने संभोग केला तर त्या स्त्रीला पालक असो वा नसो त्या शुद्राचे लिंग कापून टाकावे, त्या स्त्रिला पालक असल्यास त्याची सर्व मालमत्ता जप्त करावी व त्याला देहांताची शिक्षा द्यावी.

त्यामुळे मनूच्या निर्देशाप्रमाणे समाजव्यवस्था जातीबंद साच्यात घट्ट अडकली व त्यातून अजूनही सुटका होवू शकलेली नाही. यासाठी शासनाला कायदे करावे लागलेत. प्रोत्साहन द्यावे लागले. 1949 च्या 'हिंदू विवाह वैधकरण अधिनियमाने' व 1954 च्या 'विशेष विवाह अधिनियम' द्वारे आंतरजातीय विवाहास मान्यता देवून जातीबाहय विवाहात येणाऱ्या सर्व अडचणी दूर करण्यात आल्यात. तेव्हापासून देशात आंतरजातीय विवाहाचे प्रमाण वाढायला लागले. या वाढत्या विवाहीत कुटुंबात व त्यांच्या संबंधात काही तणाव, कटूता निर्माण होतात काय ? होत असल्यास त्यामागची कारणे काय हे शोधून काढण्याकरिता अध्ययनकर्त्याने नागपूर शहरातील 300 आंतरजातीय विवाहीत कुटुंबाचा अभ्यास केला. त्यांचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

**निष्कर्षः–**

1. आंतरजातीय विवाह आधुनिकीकरणाची देण नसून परंपरागत भारतीय समाजात असे मिश्र विवाह व्हायचे. नंतर मध्ययुगीन काळात (धर्मयुग) अशा विवाहावर पूर्णपणे बंधने लादल्या गेलीत.
2. आंतरजातीय विवाह करणारे जास्तीत जास्त पुरूष महार (43.00%) जातीचे तर स्त्रिया कुणबी (17. 33%) जातीच्या आढळून आल्या व ते पदविधर आहेत.
3. आंतरजातीय विवाह करणारे सर्वाधिक हिंदू व बौद्ध धर्मीय आढळून आले. मात्र उत्तरदात्यापैकी इस्लाम, शिख व पारसी धर्माचा एकही आंतरजातीय विवाह झाल्याचे आढळलेले नाही.
4. अधिकतम (62.00%) उत्तरदाते विभक्त कुटुंब करून राहतात.
5. आंतरजातीय विवाह केल्यामुळे कुटुंब सोडावे लागणाऱ्यांचे प्रमाण अधिकतम (32.33%) आहे.
6. जीवनसाथीची निवड स्वतः करणारे व लग्नाचा निर्णय स्वतः घेणारे 90% आढळले.
7. विवाहाआधी पत्नीच्या कुटुंबाशी कोणतीही ओळख नसून ही ओळख शैक्षणिक संबंधातून (36.00%) व सततच्या संपर्कातून (25.67%) निर्माण झाल्याचे अधिकतम आढळून आले.
8. नोंदणी पद्धतीने विवाह करणारे सर्वाधिक (55. 33%) आढळून आले.
9. आंतरजातीय विवाहितांना स्वतःच्या (पुरूष) व सासरच्या (स्त्री) अशा दोन्ही कुटुंबातून विरोध होत असल्याचे आढळून आले. त्यामुळे नोंदणी विवाहाचे प्रमाण वाढले. तरीदेखिल कालांतराने दोन्ही कुटुंबात सामंजस्यपणा घडून येतो असे आढळून आले.
10. कुटुंबातून विरोध होत असल्याने आंतरजातीय विवाहाला सर्वाधिक मदत मित्राकडून (56.33%) होत असते.

11. (85.33%) आंतरजातीय विवाहीत पूर्णतः समाधानी आढळून आले.

12. विवाहानंतरदेखील आंतरजातीय विवाहीत दुसऱ्याशी घनिष्ठ संबंध ठेवतात.

13. आंतरजातीय विवाहीत विवाहाआधी नोकरी करणारे असून विवाह करताना आर्थिक बाजूचा विचार करणारे सर्वाधिक आढळून आले.

14. आंतरजातीय विवाहीत जोडप्यात आर्थिक कारणांवरून तणाव होत नाही कारण ते कमावते असतात.

15. बहुतांश आंतरजातीय विवाहितांचा आर्थिक दर्जा एकसारखा आढळून आला व ज्यांचा आर्थिक दर्जा सारखा नाही अशा दांपत्यात देखील आर्थिक कारणांवरून तणाव निर्माण होत नसल्याचे आढळून आले.

16. आंतरजातीय विवाहीत दांपत्यात कोणतेही गैरसमज नसून त्यांचा वैचारिक दृष्टीकोन एकसारखा आढळून आला.

17. पती–पत्नीमध्ये तणाव निर्माण झाल्यास दोघे एकमेकांना समजावून तणावाचे निरसन करत असल्याचे आढळून आले.

18. कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत दोघांचाही सहभाग असतो, असे आढळले.

19. विवाहानंतर देखिल स्वतःच्या जातीशी संबंध चांगले व जवळचे असल्याचे दिसून आले. तसेच त्यांच्या मुलांना त्यांच्या जातबांधवाकडून चांगली वागणूक मिळत असल्याचे आढळून आले.

20. 59.68% कुटुंबात पती–पत्नीच्या दोन्ही कुटुंबाकडील सण–समारंभ साजरे केले जातात.

21. 94% कुटुंबात धार्मिक विधी करताना कोणताही तणाव निर्माण होत नाही.

22. सांस्कृतिक विभिन्नतेचा वैवाहीक जीवनावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही.

23. प्रेमसंबंध हेच यांच्या विवाहामागची प्रेरणा असल्याचे आढळून आले.

24. आंतरजातीय विवाहामुळे जाती निर्मुलन शक्य असल्याचे उत्तरदात्यांचे मत असून त्यामुळे हे उत्तरदाते आपल्या मुलांना देखील आंतरजातीय विवाहाकरिता प्रोत्साहन देणार असल्याचे सांगतात.

25. आंतरजातीय विवाह आजची गरज असून त्यामुळे दोघांचे जीवन सुखी होईल असा विवाहीतांचा विश्वास असल्याचे आढळून आले.

———————————————————

**संदर्भः–**


1. G. S. Ghurye, Caste, Class and Occupation (Popular Publication, Bombay, 1961, 4th Ed.) P. - 323
2. दि. प. लाखनीकर, भारतीय समाज आणि सामाजिक समस्या (लाखनीकर समर्थ महाविद्यालय, भंडारा, 2003) पृ. 89
3. डॉ. राजेंद्र कांबळे, आंतरजातीय विवाहीत कुटुंबातील तणाव–एक समाजशास्त्रीय विश्लेषण (पीएच.डी. शोधप्रबंध, 2011) पृ. 61
4. अनिल थत्ते व प्रा. रामकृष्ण मोरे, आंतरजातीय विवाह (महाराष्ट्र युवक अकादमी, पुणे) (एन.डी.) पृ. 18–22
5. कैलाश सेठ (संपादक), बबासाहेब डॉ. आंबेडकर संपूर्ण वाङ्मय (खंड 7 वा) (डॉ. आंबेडकर प्रतिष्ठान मंत्रालय, नई दिल्ली, 1998) पृ. 175
6. अनिल थत्ते, उपरोक्त पृ. 18–22
7. Haripada Chakravorty, Hindu Inter Caste Marriage in India, Sharda Publication, Delhi, 1999, P.-11
8. प्रदिप गोखले, विद्यासागर (संपादक), समाज परिवर्तनासाठी आंतरजातीय विवाह, सुगावा प्रकाशन, पुणे, 1998
9. रविंद्रनाथ मुखर्जी, भारतीय सामाजिक संस्थाएं, पृ. 200–205
10. भि. रा. आंबेडकर, शुद्र पूर्वी कोण होते, क्षितीज पब्लीकेशन, नागपूर, 2001, पृ. 115
11. तत्रैव पृ. 53


———————————————————

*Volume – 01, Issue – 02, July – December, 2012. /* ***ISSN 2278-3199***

# भारतातील अल्पभुधारक षेतकऱ्याच्या समस्या : एक समाजचिंतन

**डॉ. आश्रु जाधव,** श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय, मांढळ, जि. नागपूर.

मानसिक तान, कौटुंबिक जबाबदारी, कमी उत्पन्न, शासनाकडून होत चाललेली कुचंबना, आदिंच्यामुळे अल्पभुधारक शेतकरी व्यसनाधिनतेकडे वळत आहे. एवढेच नव्हे तर तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहे. अल्पभुधारक शेतकरी हा गरीबीतच जन्मतो, गरीबीतच वाढतो आणि गरीबीतच मारतो हे दृष्टचक्र त्याच्या नषिबी येत आहे. शासनाव्दारे ष्शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधा हया गरजु शेतकऱ्यां पर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्यांनीही नविन तंत्र, यंत्र तथा हवामान, पर्जन्यमान याचा विचार करून जागृतपणे आणि डोळसपणे शेतीव्यवसाय केला तर या आत्महत्या तर कमी होतीलच षिवाय त्यांच्या जगण्याच्या आकांक्षा सुध्दा वाढतील.

भारत हा कृषीप्रधान देष आहे. येथील बहूतांष जनता ग्रामीण भागातच राहते. ग्रामीण भागाचा विचार केल्यास शेकडा 75 टक्के लोक ग्रामीण भागातच राहतात. आणि त्यांचा उदरर्निवाह शेतीद्वारे होत असतो. कारण ग्रामीण भागात शेती किंवा शेतीषी निगडीत व्यवसाय करीत असतात आणि भारतीय अर्थव्यवस्था शेतीवरच अवलंबून असल्यामुळे शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे संबोधले जाते. परंतू आज तोच शेतकरी वर्ग दारिद्रय, गरीबी उपासमार आणि कर्जबाजारी, झालेला दिसुन येतो त्यामूळे शेतकरी आत्महत्या सारख्या वाईट मार्ग पत्करतो त्यामुळे शेतकरी त्यांच्या सर्व कुटूंबीयांना अनेक प्रकारच्या दुखाःला सामोरे जावे लागते. अषा षेतकऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासुन कृषी क्षेत्राला अग्रक्रम दिला. हरितक्रांतीच्या योजनेव्दारे नियोजनबाहय पावले टाकण्यात आले, विकास वेगाने व्हावा यासाठी पोषक असे वातावरण निर्माण करण्यात आले. त्यामुळे भारतात हरितक्रांती घडून आली तरी परंतु षेतकऱ्याचे हाल कायमच आहेत जर हरीतक्रांतिचा सर्व षेतकऱ्याना फायदा झाला असेल तर षेतकऱ्याची अषी परिस्थिती का? आणि त्याचा फायदा नेमका कुणाला झाला? हे जाणुन घेणे फार महत्वाचे आहे त्यापूर्वी भारतीय जमिनिचा किती प्रमाणात उपयोग करण्यात येते. याचा विचारही महत्वाचा आहे.

**भारतीय जमिनिचा उपयोग :–** भारताची 32 कोटी जमिनीपैकी 92.7 टक्के म्हणजे 30.5 कोटी जमिनिचा लागवडिखाली वापर करण्यात येत आहे. त्या जमिनिचा उपयोग खालील प्रमाणे सांगता येईल. 1) जंगलव्याप्त जमीन 6.8 कोटी हेक्टर असून त्याचे षेकडा प्रमाण 22 आहे. 2) लागवडीसाठी वापरात न येणारी जमीन 4.94 कोटी हेक्टर असून त्याचे षेकडा प्रमाण 14.5 ऐवढे आहे. 3) पडीत जमीन 1.4 कोटी हेक्टर असुन त्याचे षेकडा प्रमाण 5.6 आहे. 4) लागवडीखाली नसलेली इतर जमीन पडीत जमीन सोडून 3.96 कोटी हेक्टर जमीन असून त्याचे ष षेकडा प्रमाण 11.5 आहे. 5) लागवडीखाली असलेली 14.2 कोटी हेक्टर असून 46.4 षेकडा प्रमाण तसेच एकुण जमिनिचे क्षेत्रफळ 30.5 कोटी हेक्टर आहे. अषा प्रमाणात भारतीय जमीन विभाजित झाली आहे

**भारतीय षेती :–** भारतामध्ये निव्वळ लागवडीखाली असलेल्या 14.2 कोटी हेक्टर जमिनीपैकी 10.2 कोटी हेक्टर म्हणजे साधारणतः 70 टक्के जमीन कोरडवाहू स्वरूपाची आहे. कोरडवाहू षेतीत जे उत्पादन घेतले जाते ते जोखिम आणि अनिष्चितेने ग्रासलेले असते. कारण ते पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असते. भारतीय षेतीसंबंधी श्री नानावटी आयोगाने म्हटले की, ''भारतीय कृषी को मानसुन का जुऑ कहा जाता है। किसी वर्ष वर्षा होती ही नही और यदी होती भी है तो समय से बहुत पहिले या समय से बहुत बाद में। जिस वर्ष सामान्य वर्षा होती है, तब इसकी अनिष्चितता और असामान्य वितरण के कारण अकाल के दृष्य उपस्थित होते है।'' जवळपास 70 टक्के जमीन ही कोरडवाहू स्वरूपाची आहे. त्यामुळे या जमिनितुन केवळ वर्षातुन एकदा पिके काढण्यात येतात व ते सुद्धा मान्सुनच्या पावसावर अवलंबुन असतात.

नैसर्गिक पावसावर अवलंबून असलेला षेती व्यवसाय पावसाचा जुगार बनला. पिक विम्याचा फायदा सर्वांनाच पुरेसा आढळत नाही. षेतमालाचे भाव केव्हाही पडतात. षेतकऱ्यांचे मरण हेच सरकारचे धोरण असते. किंमती मधून उत्पादन खर्च भरून निघत नाही. त्यामुळे षेतकरी कर्जबाजारी झाला. समस्येनी ग्रस्त असलेला

षेतकरी अर्धपोटी उपाषी राहून कुपोषित जीवन जगतो आहे.

NSSO च्या सर्वेक्षणानुसार 48.6 टक्के षेतकरी ऋणग्रस्त आहेत. तर 40 टक्के षेतकरी पर्याय नसल्यामुळे षेतीमध्ये टिकुन आहे. इ.स. 1997 पासुन दीड लाखापेक्षाही अधिक षेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. इ.स. 1991 पासुन सुरू झालेल्या उदारीकरणाच्या प्रक्रियेपासुन दुरसंचार व्यवस्थापन, महिती तंत्रज्ञान परिवहन इ. क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात गुंतवणुक वाढत गेली परंतु कृषीक्षेत्र, सिचन, संषोधन व गुंतवणुकीच्या बाबतीत उपेक्षितच राहीले. तसेच लोकसंख्या वाढीमुळे जमिनिचे विभाजन झाले. उदा. पुर्वी एखादया षेतकऱ्याकडे 50 एकर जमिन होती ती त्याच पाच मुलांमध्ये प्रत्येकी 10 एकर वाटण्यात आली आणि आज त्या 10 एकर जमिनिचे सुद्धा 5 विभागात विभागणी होत आहे म्हणजे आज अल्पभुधारक षेतकऱ्यांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसुन येत आहे.

स्वातंन्य्रप्राप्तीनंतर विचार केला असता. कृषी उत्पादन वाढत असल्याचे दिसते. कृषी उत्पादन वाढले असले तरी षेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती मात्र सुधारलेली दिसत नाही. विदर्भातील षेतकरी आत्महत्येकडे वळत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे षेतमालाचे उत्पादनाला उत्पादन खर्चावर आधारित भाव न मिळणे आवष्यक आहे. दुसरे म्हणजे षेतमाल हा कच्च्या स्वरूपात षेतकऱ्यांच्या घरी येतो. त्यापैकी कोणतीही वस्तू त्याला प्रत्यक्षरीत्या थेट उपयोगात आणता येत नाही. जागतिकीकरणाच्या धोरणाने कृषी क्षेत्राचे नुकसानच झाले. षिवाय जागतिकीकरणाच्या धोरणामुळेच कृषी क्षेत्रातील सबसिडीचे कपातीचे धोरण, कंत्राटी षेती, परकीय मालाची मोठया प्रमाणावर आयात, बौध्दिक संपदेच्या हक्कामुळे परकीय बियाणावर वाढलेले अवलंबन इ. समस्यांना षेतकऱ्यांना नव्याने तोंड द्यावे लागत आहे. यामुळे त्याचे कर्ज बाजारी होण्याचे प्रमाण वाढले. 'षेतकऱ्याचा जन्म कर्जात होतो,' तो कर्जात वाढतो व त्याचा मृत्युदेखील कर्जात होतो. हे विधान भारतीय षेतकऱ्यांना आज तंतोतंत लागू होत आहे. तो दिवस रात्र षेतात काबाड कष्ट करतो. संपूर्ण देषाची अन्नाची गरज भागवतो परंतु आजही तो खऱ्या अर्थाने उपाषी आहे. एका दाण्यापासून षंभर दाणे निर्माण करणारा, एक पायली मागितले तर चार पायल्या देणाऱ्या षेतकऱ्याला आज आपल्या गरजा भागविण्यासाठी इतरांपुढे हात पसरावे लागत आहेत. मुलाच्या षिक्षणाचा खर्च, मुलीचे लग्न, घराचे बांधकाम इ. बाबीवर त्याला खर्च करणे अषक्य झाले आहे. त्यामुळे तो जिवाला वैतागुन आत्महत्येचा मार्ग अवलंबत आहे. षेतकऱ्याच्या या परिस्थितीला निसर्गाचा अनियमितपणा, अनियमित विजपुरवठा नापिकी, नियोजनाचा अभाव, बाजारभावाची अनिष्चितता, पुरक व्यवसायाचा अभाव, हुंडापध्दती, खाजगी, सावकारी याबरोबरच मर्यादीत षेतजमीनीचे झालेले तुकडीकरण आणि त्यामधून निर्माण झालेले अल्पभुधारक षेतकरी यांची स्थिती तर याही पेक्षा भयानक गंभीर स्वरूपाची आहे.

**अल्पभुधारक षेतकरी नेमके कुणाला म्हणायचे? :–** अल्पभुधारक या षब्दाचा षाब्दीक अर्थ घ्यावयाचा झाल्यास ज्या षेतकऱ्याकडे अगदी कमी प्रमाणात षेत जमिन असेल त्याला अल्पभुधारक म्हणता येईल. याचे नेमके प्रमाण सांगता येणार नाही. परंतु साधारणतः 5 एकर पेक्षा कमी जमिन असलेल्या षेतकऱ्यांना अल्पभुधारक षेतकरी असे संबोधण्यात येते. ''जो षेतकरी आपल्या षेतीवर आपल्या कुटुंबाचा उदर्निवाह करू षकत नाही व त्याचे कुटुंबीय दुसऱ्याच्या षेतीत मजुर म्हणून काम करतात अषा षेतकऱ्यांना अल्पभुधारक षेतकरी म्हणतात.''

आज 21 व्या षतकात प्रचंड लोकसंख्या वाढत असल्यामुळे अल्पभुधारकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असलेले दिसून येत आहे. कारण पुर्वी ज्या षेतकऱ्याकडे जास्त जमिन होती आज त्यांच्या मुलांना वाटून देण्यात आली आणि त्या जमिनीचे तुकडीकरण करण्यात आले. अल्पभुधारक षेतकरी दुसऱ्याच्या षेतात श्रमिक म्हणून काम करतांना दिसत आहेत. त्याच्याजवळ कृषी कार्याला लागणारे आधुनिक साधन खरेदी करण्याची क्षमता देखील नाही. अल्पभुधारक षेतकऱ्याजवळ स्वतःचा बैल, नांगरणी, यंत्र पेरणीचे साधन, उत्तम प्रकारचे बि–बियाने, खते, किटकनाषके अषा आधुनिक स्वरूपाची साधन सामुग्री खरेदी करण्यासाठी पुरेसा पैसा देखील नाही.

**अल्पभुधारक षेतकऱ्यांचे प्रमाण :–** अल्पभुधारक षेतकऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे आज आपल्याला दिसून येत आहे. कारण लोकसंख्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे जमिनीचे क्षेत्र मात्र मर्यादित स्वरूपाचे झालेले आहे. त्यामुळे जमिनीचे तुकडीकरण होऊन आज अल्पभुधारक षेतकऱ्यांची संख्या खुप मोठया प्रमाणात वाढलेली दिसून येत आहे. 1990–91 च्या पाहणीनुसार 1 हेक्टर पेक्षा कमी धारण क्षेत्र असलेली एकुण जमिन धारण क्षेत्र (सिमांत) 58 टक्के एवढे आहे. व 1 हेक्टर जे 4 हेक्टर जमिन धारण क्षेत्र (छोटे धारण क्षेत्र) 33 टक्के, 4 हेक्टर ते 10 हेक्टर

(मध्यम धारण क्षेत्र) 8 टक्के, व सर्वात जास्त म्हणजे 10 हेक्टरपेक्षा जास्त धारण जमीन क्षेत्र असलेल्यांची केवळ 1 टक्का एवढी आहे. म्हणजेच साधारणतः 90 टक्के षेतकरी हे कमी जमिन धारण केलेले आहेत. भारतातील षेती व्यवसाय करणाऱ्या षेतकऱ्यामध्ये केवळ 10 टक्के षेतकरी हे जास्त जमीन धारण केलेले आहे. परंतु यामध्ये सुध्दा दिवसेंदिवस त्याचे प्रमाण कमी होतांना दिसून येत आहे.

**अल्पभुधारक षेतकऱ्यांच्या समस्या नष्ट करण्याकरिता उपाययोजना** :— आज अल्पभुधारक षेतकऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. ते कषाप्रकारे दुर करता येईल तसेच षेतकऱ्यांना वेळेवर कर्ज कसे मिळेल? तसेच षेतकऱ्यांना त्यासंबंधी माहिती मिळणे फार आवष्यक आहे. बि—बियाणे कोणते वापरायचे, कोणत्या जमिनीमध्ये कोणते उत्पादन जास्त प्रमाणात घेता येईल. अषा अनेक समस्या अल्पभुधारक षेतकऱ्यांसमोर असलेले दिसून येतात. या समस्यांचा थोडक्यात उल्लेख केरता येईल. ते पुढीलप्रमाणेः—

1) कृषीयोग्य पडीत जमिनीत सुधारणेचा अभाव.

2) कृषी सिंचन योजनांचा अभाव.

3) सहकारी पत समित्यांचा विस्तार व कर्जपुरवठा यांचा अभाव.

4) षेती षिक्षणाचा प्रसार व प्रचार / षिक्षणाचा अभाव.

5) कृषी मिळावे घेणे.

6) सेंद्रीय खतांचा योग्य वापर करणे सबंधी अज्ञान.

7) पिकांचे रोग व किडीची ओळख व निदान सबंधी अज्ञान.

8) मातीपरीक्षण करणे सबंधी अज्ञान.

9) रासायनिक खतांचा मर्यादित वापर.

10) योग्य भाव / षेतमालाला योग्य मोबदला.

11) संकरीत बि—बियाणाचा योग्य वापर.

12) ठिंबक सिंचन योजना ग्रामीन क्षेत्रात न जाणे.

**सारांष** :— अषा प्रकारे मानसिक तान, कौटुंबि जबाबदारी, कमी उत्पन्न, शासनाकडून होत चाललेली कुचंबना, आदिंच्यामुळे अल्पभुधारक शेतकरी व्यसनाधिनतेकडे वळत आहे. एवढेच नव्हे तर तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहे. म्हणजे अल्पभुधारक शेतकरी हा गरीबीतच जन्मतो, गरीबीतच वाढतो आणि गरीबीतच मारतो हे दृष्टचक्र त्याच्या नषिबी येत आहे. तेव्हा शासनाव्दारे ष्शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधा हया गरजु शेतकऱ्यां पर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्यांनीही नविन तंत्र, यंत्र तथा हवामान, पर्जन्यमान याचा विचार करून जागृतपणे आणि डोळसपणे शेतीव्यवसाय केला तर या आत्महत्या तर कमी होतीलच षिवाय त्यांच्या जगण्याच्या आकांक्षा सुध्दा वाढतील.

---

**संदर्भ ग्रंथः—**

**1,** महाजन डॉ. सचिव, 'ग्रामीण समाजशास्त्र', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.

2. मिश्रा डॉ. जयप्रकाश, 'कृषी अर्थशास्त्र', साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.

3. कविमंडण प्रा. डॉ. विजय, 'कृषी अर्थशास्त्र', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

4. शेतकरी दिनदर्शिका, रब्बी विशेषांक, वसुंधरा प्रकाशन, नागपूर.

5. शेतकरी योजना विशेषांक, ऑगस्ट 2011.

6. विशेषांक, 'लोकार्पन' 16 मार्च, लोकशाहीवार्ता संपादक, 2010.

7. देसाई ए. आर, 'भारतीय ग्रामीण समाजशास्त्र', श्रीमती प्रेस रावत पब्लिकेशन नवी दिल्ली.

8. रोजगार पत्रिका, एम.एस.आर.टी. पब्लिकेशन, नई दिल्ली.

9. देशमुख प्रभाकर, 'भारतीय अर्थशास्त्र', पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर.

......................................................................

---

*Volume – 01, Issue – 02, July – December, 2012. /* ***ISSN 2278-3199***

# स्त्री भृणहत्येविषयी स्वंयसेवी संस्थांचा दृष्टिकोण

**प्रा. बबन पवनदास मेश्राम,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, एन. एम. डी. कॉलेज गोंदिया.

प्रस्तुत शोधनिबंधात स्वंयसेवी संस्थांच्या दृष्टिकोणातून गर्भजल निदान व स्त्रीभृणहत्या काय आहे? याचा विचार केला आहे. स्वयंसेवी संस्थांच्या दृष्टीकोणातून गर्भजल निदान करणे हे स्वस्थ व निरोगी बालकाला जन्माला घालण्याकरिता आवश्यक आहे. गर्भजल निदान करून गर्भपात करण्यात येतो याचा स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक स्वास्थ्यावर वाईट परिणाम होतो. गर्भजल निदान हे स्त्री भृणहत्येस कारणीभूत आहे व हयालाच पुरूषप्रधान संस्कृती जबाबदार आहे. दिवसेंदिवस सोनाग्राफी केद्रांची सतत वाढणारी संख्या ही स्त्रीभृणहत्येस कारणीभूत आहे. स्वयंसेवी संस्थांच्या दृष्टीकोनातून लोकसंख्या धारेणही स्त्रीभृणहत्येस जबाबदार आहे. येत्या पाच वर्षात विवाहाची समस्या निर्माण होवून विवाहोच्छुक तरूणांना लग्नासाठी मुली मिळणार नाहीत. समाजातील ़स्त्रियांचे प्रमाण कमी झाल्यामुळे बलात्कार, विनयभंग, छेडछाड या सामाजिक समस्यांमध्ये वाढ होत आहे. स्वयंसेवी संस्थांच्या दृष्टीकोनातून स्त्री–भृण हत्या हा समाजाला लागलेला कलंक आहे.

**प्रस्तावना** :– प्रस्तुत शोधनिबंधात संस्थांच्या दृष्टिकोणातून गर्भजल निदान व स्त्रीभृणहत्या काय आहे? याचा विचार केला आहे. स्वंयसेवी संस्थांच्या दृष्टिकोणातून गर्भजलनिदान व स्त्रीभृणहत्या याचा अभ्यास करतांना असे निदर्शनास आले की, भारत सरकारने या समस्यांच्या निवारणाकरिता कायदा निर्माण करून वेळोवेळी त्यात सुधारणा केलेल्या आहेत. परंतू, त्यांची अपेक्षेनुरूप अंमलबजावणी होतांना दिसून येत नाही किंवा प्रशासकिय यंत्रणेत कायद्याच्या अंमलबजावणीत अनेक प्रकारच्या त्रुटी आहेत, असे म्हणता येईल. सामान्यतः स्त्रिया आपल्या आरोग्याबदद्ल गंभीर नसतात. बहुतांशी हे पाहायला मिळते की, स्त्रिया गर्भनिरोधक गोळयांचा वापर करतात, अनेक प्रकारच्या सर्वेक्षणातून हे सिध्द झाले आहे. त्याच्या उपयोगामुळे हृदयावर परिणाम होवू शकतो. परंतू पुरूषांद्वारा उपयोगात आणलेल्या साधनांनी पुरूषांना फक्त आनंद कमी मिळतो, म्हणून अधिकतर स्त्रिया हया गर्भनिरोधक साधनांचा उपयोग करतात, पुरूषांकरीता हे ऑपरेशन सोपे असूनही ते करतांना कमी दिसतात, कारण पुरूषांमध्ये काही हरविण्याची भावना असते. स्त्रिया हया सर्व स्थितीचा स्वीकार करून आपला आत्मसंतोष मानतात. त्यांच्या करिता पुरूषांची ईच्छा आणि आवश्यकतांची पूर्ती करणे हे महत्वाचे लक्ष्य असते. अधिकांश शिक्षित स्त्रिया हया पुरूषाच्या अत्याचाराच्या शिकार असतात पण त्या, त्याचा सहजतेने स्वीकार करतात. वर्षानुवर्षे चालत आलेले सर्व अन्यायपूर्ण नियम, कायद्यांना मानसिकरीत्या स्वीकारणे हा त्यांचा स्वभाव बनतो. हया मानसिकतेची पाळेमुळे हजारो वर्षापासून चालत आलेल्या रूढी, परंपरांना मान्यता हे आहे. हया पुरूषांच्या अधिपत्यातून बाहेर निघण्याकरिता त्यांना संकुचित दृष्टिकोणाला तोडून, व्यापक दृष्टिकोण विकसित करण्याची आवश्यकता आहे. आज अनेक महिला उच्च पदावर कार्यरत आहे आणि आर्थिकरूपाने त्या स्वंतत्र आहेत. परंतू तरीही सामाजिक पध्दतीत त्यांचे स्थान पुरूषांच्या बरोबरीचे नाही, ही वास्तविकता आहे.

एकविसाव्या शतकात प्रवेश केल्याने, संगणकीकरण, परमाणू प्रयोग किंवा सॅटेलाईट सोडल्याने समाज विकासाकडे वाटचाल करतो आहे असे नाही, सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत स्त्रियांचे योगदान नाही काय? या बाबींवर खोलवर विचार केल्यास असे दिसून येते की, आजच्या शिक्षणात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. आजही आपला समाज अंधविश्वासाच्या जाळयात इतका अडकलेला आहे की, सॅटेलाईट आकाशात सोडतांना नारळ फोडण्याची क्रिया किंवा पूर्णवेळ विज्ञानाच्या उपलब्धतेमध्ये खेळणारे डॉक्टर जेव्हा आपल्या दवाखान्यात लिहतो की, आय ट्रीट बट ही क्योर्सश्तर हे विज्ञानाच्या प्रती असलेले अतार्किक दृष्टिकोणाला उजागर करतात. हेच कारण आहे की, अणुशक्तीचा आविष्कार या किंवा गर्भजल परिक्षणासारखा विकास एका विशिष्ट वर्गाच्या हातात कठपुतळी बनतो आणि पुंजीवादीवर्गाच्या हातातल्या शोषणाचा मार्ग बनतो. आज करोडो लोक आपल्या हक्कासाठी लढून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेकडे वाटचाल करीत आहे. तिथेच स्त्रिच्या गर्भजल परिक्षण किंवा निदानाच्या दुरूपयोगाने होणा–या स्त्री–भृण हत्येविरूध्द आपले अस्तित्वच टिकवून ठेवण्यासाठी लढावे लागते आहे. हा समाज त्यांना माणसाच्या दर्जा देण्यासही कतरतो आहे.

गर्भजल निदान ज्याद्वारे गर्भातील बालकाच्या स्वास्थाविषयी बघितले जाते. बालकाला जर काही आजार असल्यास, विकृतीसह जन्माला येणा–या बाळावर उपचार करून सुदृढ, निकोप आणि निरोगी बालक जन्माला येण्याची संभावना वाढते. स्वंयसेवी संस्थांच्या मते गर्भजलनिदानाची आवश्यकता आहे. कारण गर्भजल निदानाची आवश्यकता भासते का? या प्रश्नाचे उत्तर देतांना 200 उत्तरदात्यांपैकी 188 उत्तरदात्यांनी आवश्यकता आहे असे नमूद केलेले आहे व याचे शेकडा प्रमाण 94 % आहे, तर आवश्यकता भासत नसल्याने नमूद करणारे 200 उत्तरदात्यांपैकी फक्त 12 उत्तरदाते आहे व याचे शेकडा प्रमाण 6 % एवढे आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, स्वस्थ बाळाला जन्माला येण्याकरिता गर्भजल निदानाची आवश्यकता आहे.

गर्भजल निदानाच्या स्त्रियांवर कशाप्रकारचा परिणाम होतो? हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. कारण आजच्या धावपळीच्या जीवनात समाजात गर्भजल निदानाची आवश्यकता भासते आहे व प्रत्येक मातेला स्वस्थ बालकाला जन्म देण्याचा अधिकार आहे.

गर्भजल निदान करून लिंगाचा शोध लागतो व नको असलेल्या बाळाला जन्म देण्यापेक्षा त्याला गर्भातच मारून टाकण्याकरिता गर्भपात केल्या जातो. यावेळेस गर्भात स्त्रीभृण असते. अशा वेळेस गर्भपात करणे गर्भवती स्त्रीच्या आरोग्यास अपायकारक असते. व त्यामुळे तिच्या आरोग्यावर परिणाम होवून जिवितास धोका निर्माण होतो. गर्भपातामुळे तिच्या मानसिकतेवर परिणाम होतो. गर्भपातामुळे तिला मातृत्वापासून वंचित राहावे लागते याचा भावनिक परिणामही स्त्रियांवर झालेला असतो.

**गर्भपाताचा स्त्रियांवर होणारा परिणाम दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | परिणाम | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | आरोग्य / शारीरिक | 12 | 06 |
| 2 | मानसिक | 04 | 02 |
| 3 | भावनिक | 04 | 02 |
| 4 | वरील सर्वच | 180 | 90 |
| | | **200** | **100** |

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, गर्भजलनिदानाचा स्त्रियांच्या शरीरावर व आरोग्यावर परिणाम होण्याची वारंवारिता 12 आहे म्हणजेच शेकडा प्रमाण 06 % आहे. तर या परिक्षणाचा स्त्रियांच्या मानसिकतेवर परिणाम होतो म्हणणा–यांचे प्रमाण केवळ 4 असून याचे शेकडा प्रमाण 2 % आहे. तर या निदानाचा स्त्रियांवरच्या शरीरावर, आरोग्यावर, मानसिकतेवर व भावनिकतेवर म्हणजे वरील सर्वच परिणाम होतात याचे प्रमाण 180 असून शेकडा प्रमाण 90 % आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की गर्भजल निदान करून गर्भपात करण्यात येतो त्यावेळेस स्त्रियांच्या शरीरावर, आरोग्यावर, मानसिकतेवर व भावनिकतेवर वाईट परिणाम होतो.

गर्भजल निदानाच्या विविध पध्दतीद्वारा गर्भवती स्त्रीला कधी कमी अधिक शारीरिक धोका असतो. अनेकवेळा जीव जाण्याचा धोका असतो. तर सोबतच गर्भात असलेल्या भृणालाही गंभीर ईजा होण्याची संभावना असते. परंतू याहीपेक्षा दुःखदायक बाब ही की, परिक्षाणानंतर गर्भात जर स्त्रीभृण असेल तर गर्भावस्थेच्या कोणत्याही महिन्यात गर्भपात करण्याची तयारी असते.

**अ) गर्भजल निदान स्त्री–भृणहत्येस कारणीभूत :** गर्भजल निदानाच्या अनेक पध्दती आहेत. हया निदानाच्या मुख्य उद्देश गर्भावस्थेमध्ये भृणाला होणा–या आनुवांषिक रोगांचा शोध लावून त्यावर उपचार करणे आहे. परंतू याचा एक छोटा भाग हा ही सांगतो की, गर्भात असलेल्या भृणांचे लिंग काय आहे? लिंगाची माहिती झाल्यानंतर, जर गर्भात स्त्रीभृण असेल तर त्याची हत्या करण्यात येते. गर्भजल निदान हे केवळ लिंग परिक्षणापुरते मर्यादित करण्यात आलेले आहे.

**इ) पुरूषप्रधान संस्कृती** : समाजात पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रिया वर्षानुवर्षापासून पुरूषांच्या अधिपत्याखाली दबलेल्या आहेत. भारतीय समाजात स्त्रिला कनिष्ठ दर्जा मिळालेला आहे. त्यामुळे सतत तिला अत्याचाराला सामोरे जावे लागते. वंश टिकविण्यासाठी मुलगाच हवा असतो. मुलगी डोक्यावरचे ओझे समजल्या जाते, त्यामुळे तिला जन्मालाच येवू दिल्या जात नाही.

**गर्भजल निदान हे स्त्री–भृणहत्येस जबाबदार आहे हे दर्शविणारी सारणी**

| अ. क्रं. | जबाबदार | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | आहे | **172** | 86 % |
| 2 | नाही | **28** | 14 % |
| | | **200** | **100 %** |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, गर्भजल निदान हे स्त्री–भृणहत्येस जबाबदार आहे हे सांगणारे 172 उत्तरदाते आहेत व याचे शेकडा प्रमाण 86 % एवढे आहे. तर जबाबदार नाही हे सांगणा–यांची वांरवारिता 28 असून याचे शेकडा प्रमाण 14 % आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, गर्भजलनिदान हे स्त्री–भृणहत्येस कारणीभूत आहे.

**पुरूषप्रधान संस्कृती स्त्री–भृणहत्येस जबाबदार आहे हे दर्शविणारी सारणी**

| अनु. कं. | मत | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | **164** | 82 % |
| 2 | नाही | **36** | 18 % |
| | | **200** | **100 %** |

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, स्त्री–भृणहत्या होण्याकरिता पुरूषप्रधान संस्कृती जबाबदार आहे अशा मताचे 200 पैकी 164 उत्तरदाते आहेत, याचे शेकडा प्रमाण 82 % आहे तर नाही या गटाची वारंवारिता 200 असून याचे शेकडा प्रमाण 18 % आहे. वरील आकडयांवरून असा निष्कर्ष निघतो की, स्त्री–भृणहत्येस पुरूषप्रधान संस्कृती जबाबदार आहे.

**ई) सोनोग्राफी सेंटर्स :** गर्भाचा विकास आणि त्याची स्थिती याचा अभ्यास आणि आवश्यक उपचार करण्याच्या चांगल्या उददे्शाने सोनोग्राफी हे तंत्र विकसित झाले. समाजात सोनोग्राफी सेंटर्सची सतत वाढ होत आहे काही केंद्रे कायदेशीररित्या मान्यताप्राप्त नसतात. हया केंद्राचे व्यावसायिकीकरण होण्याला गर्भजल निदानाकडे आकर्षित होणारे लोक आहेत. या परिक्षणाद्वारे लिंग माहिती करून घेणा–यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहेत. 'स्त्रीभृण हत्या कायद्याने गुन्हा आहे'श, 'येथे गर्भजल निदान होत नाही', अशाप्रकारचे फलक दवाखान्यात लावलेले असतात पण ब–याच प्रमाणात अवैधरित्या सोनोग्राफी सेंटर्सची संख्या जेथे जास्त आहे, तेथे पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या घटली असल्याचे लक्षात येते.

**सोनाग्राफी सेंटर स्त्री–भृणहत्येस जबाबदार आहे हे दर्शविणारी सारणी**

| अनु. कं. | मत | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | **128** | 64 % |
| 2 | नाही | **72** | 36 % |
| | | **200** | **100 %** |

वरील सारणीवरून असे सिध्द होते की, सोनोग्राफी सेंटर्स स्त्री–भृणहत्येस जबाबदार आहे या मताचे 128 उत्तरदाते आहे व त्यांचे शेकडा प्रमाण 64 % आहे, तर जबाबदार नाही या मताचे 72 उत्तरदाते आहे व याचे शेकडा प्रमाण 36 % आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, स्त्रीभृण हत्येच्या वाढीस सोनोग्राफी सेंटर्स जबाबदार आहे.

**लोकसंख्या धोरण :** भारताची लोकसंख्या 110 कोटीच्या वर आहे. लोकसंख्येला आळा बसविण्यासाठी भारत सरकारने लोकसंख्या धोरण जाहिर केलेले आहे. त्यानुसार दोनपेक्षा अधिक अपत्य असणा–यांना सरकारी नौकरी मिळणार नाही. याशिवाय राजकारणातही पद भूषविता येणार नाही.

मुलगाच हवा याकरिता गर्भजल निदान करून लिंग परिक्षण केले जाते. पहिली मुलगी असेल व दुसरीही मुलगी होवू नये म्हणून या निदानाचा फायदा करून घेवून स्त्री भृण असल्यास ते काढून टाकण्यात येते.

**लोकसंख्या धोरण जबाबदार आहे हे दर्शविणारी सारणी**

| अ. कं. | जबाबदार घटक | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | सरकारी नौकरी | **112** | 56 % |
| 2 | राजकरणात प्रवेश/पद | **44** | 22 % |
| 3 | दोन्ही | **44** | 22 % |
| | | **200** | **100 %** |

उपरोक्त सारणीनुसार स्त्रीभृण हत्येस लोकसंख्या धोरण कशाप्रकारे जबाबदार आहे हे दर्शवितांना सरकारी नौकरी जबाबदार आहे असे सांगणारे 200 पैकी 112 उत्तरदाते आहेत व याचे शेकडा प्रमाण 56 % आहे. याशिवाय राजकारणात प्रवेश/पद याची वारंवारिता 44 असून शेकडा प्रमाण 22 % एवढे आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, सरकारी नौकरी मिळविण्याकरीता लोकसंख्या धोरण स्त्रीभृणहत्येस जबाबदार ठरते.

**सामाजिक असंतुलन :** सोनोग्राफीचे वाढते प्रस्थ महिलांच्या एकूणच संख्येला प्रचंड मारक ठरत असून पुरूषांच्या संख्येच्या तुलनेत महिलांची संख्या सातत्याने घटत आहे. यामुळे सामाजिक असमतोल निर्माण झालेला आहे.

**स्त्रियांच्या सतत घटणा–या प्रमाणामुळे सामाजिक असंतुलन निर्माण होते हे दर्शविणारी सारणी**

| अ. कं. | मत | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | **168** | 84 % |
| 2 | नाही | **32** | 16 % |
| | | **200** | **100 %** |

वरील सारणीवरून असे आढळून येते की, स्त्री–भृणहत्येमुळे स्त्रियांची दरहजारी पुरूषांमागे सतत घटत जाणा–या संख्येमुळे सामाजिक असंतुलन निर्माण होत आहे. या मताचे 168 उत्तरदाते असून त्यांचे शेकडा प्रमाण 84 % आहे. तर होत नाही या मताची वारंवारिता 32 असून याचे शेकडा प्रमाण 16 % आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, स्त्री–भृणहत्येमुळे सामाजिक असंतुलन निर्माण होते.

**विवाहाच्या समस्या** : स्त्रियांच्या सतत घटत असलेल्या प्रमाणामुळे येत्या पाच वर्षात सुलभ विवाहोच्छुक मुलांना विवाहासाठी मुली मिळणार नसल्याचा इशारा मानवाधिकार आयोगाने दिलेला असल्यामुळे यावर संस्थेची मते जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**स्त्रीभृणहत्येमुळे विवाहाची समस्या निर्माण होईल काय? हे दर्शविणारी सारणी**

| अ. कं. | विवाहाच्या समस्येविषयी मत | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | **152** | 76 % |
| 2 | नाही | **48** | 24 % |
| | | **200** | **100 %** |

उपरोक्त सारणीवरून असे स्पष्ट होते की, स्त्री–भृणहत्येमुळे सतत स्त्रियांच्या संख्येत घट झाल्यामुळे येत्या पाच वर्षात विवाहाची समस्या निर्माण होईल या मतांची वारंवारिता 152 आहे व याचे शेकडा प्रमाण 76 % आहे. तर होणार नाही या मतांची वारंवारीता 48 आहे व याचे शेकडा प्रमाण 24 % आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, येत्या 5 वर्षात विवाहोच्छुक तरूणांना विवाहासाठी मुली मिळणार नाही म्हणजेच विवाहाची समस्या निर्माण होईल.

**सामाजिक समस्या** : स्त्रियांच्या सतत घटणा–या प्रमाणामुळे विवाहाची समस्या निर्माण झाली. विवाहासाठी पुरूषांना स्त्रिया मिळणार नाही. तेव्हा स्त्रियांवर होणा–या अत्याचारांमध्ये भर पडेल. कोणत्या सामाजिक समस्यांमध्ये भर पडेल याचा विचार येथे करण्यात आलेला आहे.

**स्त्रियांच्या सामाजिक समस्येत भर दर्शविणारी सारणी**

| **अ. कं.** | **समस्या** | **वारंवारिता** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| 1 | बलात्कार | 44 | 22 % |
| 2 | विनयभंग | 36 | 18 % |
| 3 | छेडछाड | 32 | 16 % |
| 4 | वरील सर्वच | 88 | 44 % |
| | | 200 | **100 %** |

वरील सारणीवरून आपल्या असे लक्षात येते की, स्त्रियांच्या सतत घटणा–या प्रमाणामुळे बलात्काराच्या समस्येत वाढ होईल या मतांची वारंवारिता 44 आहे, याचे शेकडा प्रमाण 22 % आहे. विनयभंगासारखी समस्या निर्माण होईल. या मताचे 36 उत्तरदाते आहेत, याचे शेकडा प्रमाण 18 % आहे. तर छेडछाड या गटातील उत्तरदात्यांची संख्या 8 आहे व याचे शेकडा प्रमाण 16 % आहे. याशिवाय वरील सर्वच समस्यांमध्ये वाढ होईल या मताचे 88 उत्तरदाते आहे याचे शेकडा प्रमाण 44 % एवढे आहे.

**निष्कर्ष** :– 1. स्वयंसेवी संस्थांच्या दृष्टीकोणातून गर्भजल निदान करणे हे स्वस्थ व निरोगी बालकाला जन्माला घालण्याकरिता आवश्यक आहे. 2. गर्भजल निदान करून गर्भपात करण्यात येतो याचा स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक स्वास्थ्यावर वाईट परिणाम होतो. 3. गर्भजल निदान हे स्त्री भृणहत्येस कारणीभूत आहे व हयालाच पुरूषप्रधान संस्कृती जबाबदार आहे. 4. दिवसेंदिवस सोनाग्राफी केद्रांची सतत वाढणारी संख्या ही स्त्रीभृणहत्येस कारणीभूत आहे. 5. स्वयंसेवी संस्थांच्या दृष्टीकोनातून लोकसंख्या धारेणही स्त्रीभृणहत्येस जबाबदार आहे. 6. येत्या पाच वर्षात विवाहाची समस्या निर्माण होवून विवाहोच्छुक तरूणांना लग्नासाठी मुली मिळणार नाहीत. 7. समाजातील स्त्रियांचे प्रमाण कमी झाल्यामुळे बलात्कार, विनयभंग, छेडछाड या सामाजिक समस्यांमध्ये वाढ होत आहे. 8. स्वयंसेवी संस्थांच्या दृष्टीकोनातून स्त्री–भृण हत्या हा समाजाला लागलेला कलंक आहे.

---

**संदर्भ** :–


1. दिनेश धर्मपाल, स्त्री.
2. डॉ. म. बा. कुलकर्णी, मनु और स्त्री.
3. प्रा. सौ. माधवी कवि, महिला कल्याण और विकास.
4. महिला व बालविकास धोरण और भारतीय प्रावधान, आगरा, 2006.
5. गृहलक्ष्मी ;नारी विषेशांक, मार्च, 2006.
6. डॉ. ओ. पी. वर्मा, भारतीय सामाजिक समस्याए, विकास प्रकाशन 311, सी, विश्वबॅक बर्रा, कानपूर.
7. डॉ. एस. आर. तोष्णीवाल, भारतीय सामाजिक समस्याए, विश्व प्रकाशन, महाल नागपूर.
8. डॉ. बी. एम. क–हाडे, भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
9. डॉ. आगलावे प्रदिप, सामाजिक समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
10. डॉ. देशमुख निलीमा, भृणहत्या,


........................................................................

# ग्राहकवाद एक सामाजिक समस्या

**प्रा. सुधाकर किसन माटे**, महिला कला महाविद्यालय, उमरेड जि. नागपुर.

ग्राहक चळवळ, ग्राहकवाद, ग्राहकाचे अधिकार या सर्वाचा संबंध बाजारपेठीय अर्थव्यवस्थेशी किंबहुना आर्थिक विकासाशी आहे. म्हणून ग्राहकवाद ही विकासात्मक समस्या आहे असे स्पष्टपणे दर्शविता येते. ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा एक घटक आहे. यामुळे ग्राहक चळवळ हा अर्थशास्त्राचा अभ्यासाचा विषय आहे. असा काही लोकांनी समज करून घेतला. परंतू ग्राहक चळवळ ही व्यापक स्वरूपाचे सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी आहे. म्हणून तिचे समाजशास्त्रीय अध्ययन महत्वाचे आहे.

ग्राहक म्हणजे वस्तु खरेदी करणारा. या अर्थाने समाजातील प्रत्येकजण ग्राहक आहे. दुसऱ्या शब्दात प्रत्येक व्यक्ती पदोपदी ग्राहकाच्या भूमिकेत असते. तसेच समाजातील काही व्यक्ती स्वतःग्राहक असल्या तरीही ते उत्पादक, विक्रेता किंवा सेवाप्रदान करणाऱ्याच्या भूमिकेत असतात. ग्राहक – उत्पादक – विक्रेता किंवा ग्राहक आणि सेवा प्रदान करणारा यांचे परस्परसंबंध हे आजचे नाहीत तर ते समाजाएवढेच प्राचीन आहेत असे म्हणता येईल. आजच्या काळात डॉक्टर, वकील हे सेवा प्रदान करणारे आहेत. न्हावी, धोबी, भटजी किंवा पुरोहीत हे देखील सेवा प्रदान करणारे होते व आजही आहेत. शिक्षणसंस्था, पोष्ट खाते, रेल्वे खाते हे देखील सेवा प्रदान करणारे आहेत.

फसवणूकीपासुन ग्राहकांच्या अधिकारांचे संरक्षण असा अर्थ 'ग्राहकवाद' हा शब्द व्यक्त करतो असे म्हणता येईल. ग्राहकांनी केलेल्या चळवळीतून ग्राहकवादाचा उदय झाला आहे. म्हणजे ग्रहकाचे हक्क आणि त्यांचे संरक्षण करण्याच्या पध्दती व यंत्रणेचा उदय झाला आहे. शेतकरी चळवळ, कामगार चळवळ, नक्षलवादी चळवळ अशी सर्व चळवळीपेक्षा ग्राहक चळवळींचे काही बाबतीत वेगळेपण आहे. उदा. ग्राहक चळवळ ही कोणत्याही एका व्यक्ती, व्यापारी संस्था किंवा सरकार यांच्या विरोधातील चळवळ नाही. ती माणसाच्या शोषण प्रवृत्ती विरूध्दची चळवळ आहे. ती संपूर्ण ग्राहकवर्गास म्हणजे पर्यायाने संपुर्ण समाजास सामील करून घेणारी चळवळ आहे.

औद्योगिक युगाचा प्रारंभ होण्यापूर्वीच्या काळात ग्राहक–विक्रेता यांच्यामध्ये समोरासमोरचे संबंध होते. त्या काळात भारतात जजमानी पध्दती होती. या पध्दतीत ग्राहक–उत्पादक–विक्रेता यांच्यामध्ये अत्यंत मधूर संबंध होते. औद्योगिक युगाचा प्रारंभ झाल्यानंतर यंत्रसामुग्रीचा उपयोग करण्यामधून उत्पादनामध्ये बेसूमार अशी वाढ झाली. कुटुंब वा राहते घर हे उत्पादनाचे आणि विक्रीचे केंद्र राहिले नाही. उत्पादनाचे केंद्र घरापासून प्रथम वेगळे आणि नंतर घरापासून दुर झाले. असेच विक्री केंद्राबाबतही घडले. नवीन अर्थव्यवस्था म्हणजे जिला आपण आज उद्योगप्रधान अर्थव्यवस्था, भांडवलशाही अर्थव्यवस्था किंवा बाजारपेठीय अर्थव्यवस्था असे संबोधतो, ती उद्यास आली. उत्पादन, विनिमय, वितरण आणि उपभोग हे चार घटक जुन्या अर्थव्यवस्थेपेक्षा नव्या अर्थव्यवस्थेत अधिक ठळक झाले किंवा प्रकर्षाने समोर आले. नव्या अर्थव्यवस्थेत व्यक्ती आणि कूटूंबे ही प्रामुख्याने उपभोगाची केंद्रे झाली आहेत. उत्पादनात प्रचंड वाढ करण्याच्या क्षमतेचा विकास हेच नव्या अर्थव्यवस्थेचे एक महत्वाचे वैशिष्ट झाले आहे असेही म्हणता येईल. उत्पादनात वाढ झाली की विक्रीमध्येही वाढ होणे अपरिहार्य होते. जाहिरातींद्वारे – म्हणजे प्रसारमाध्यमांमधील जाहिरातींद्वारे तेही शक्य होते. किंबहुना उपभोगाच्या प्रवृत्तीला उत्तेजन देणे हाच जाहिरातींमागील मुख्य हेतू असतो. उपभोगाला बढावा देण्यामधून 'उपभोक्ता संस्कृती' चा उदय व विकास झाला आहे.

उपभोक्ता संस्कृतीत 'खरेदी' वर भर असतो. वस्तूंचे आकार, रंग, रूप, वस्तूंवर असणारी रंगबेरंगी वेष्टने या सर्वांमध्ये सतत बदल केला जातो. वस्तू निर्माण करताना 'वापरा आणि फेका' या तत्वाचा उपभोग केला जातो. काहीही करून उपभोक्त्याला खरेदीची क्रिया करण्यापासून दूर होऊ द्यावयाचे नसते. उपभोक्ता संस्कृती ही नव्या अर्थव्यवस्थेने निर्माण केली आहे. वस्तूंची विक्री करणे ही विक्रेत्याची गरज. वस्तूचे उत्पादन वाढविणे ही भांडवलदाराची वा कारखानदाराची गरज. गतिमान जीवनपध्दतीमुळे कमीत कमी वेळात अगदी घरपोच मिळत असेल तर तेही चालेल ही ग्राहकांची गरज. या सर्वांच्या गरजांच्या गलबल्यातून फसवणुकीचे प्रकार वाढले. वस्तू खरेदी करणारा ग्राहक हतबल झाला. कारण त्याला वस्तू उत्पादक व विक्रेते यांच्या एकाधिकारशाहीला तोंड द्यावे लागत होते. या हतबलतेतून बाहेर पडण्यासाठीच ग्राहक चळवळींचा उदय झाला आहे. ग्राहक चळवळ ही

आजच्या काळाची गरज झाली आहे असेही म्हणता येईल. अशाप्रकारे ग्राहक चळवळ, ग्राहकवाद, ग्राहकाचे अधिकार या सर्वाचा संबंध बाजारपेठीय अर्थव्यवस्थेशी किंबहुना आर्थिक विकासाशी आहे. म्हणून ग्राहकवाद ही विकासात्मक समस्या आहे असे स्पष्टपणे दर्शविता येते. ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा एक घटक आहे. यामुळे ग्राहक चळवळ हा अर्थशास्त्राचा अभ्यासाचा विषय आहे. असा काही लोकांनी समज करून घेतला. परंतू ग्राहक चळवळ ही व्यापक स्वरूपाचे सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी आहे. म्हणून तिचे समाजशास्त्रीय अध्ययन महत्वाचे आहे.

आधुनिक काळात भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा उदय सर्वप्रथम युरोपियन देशांमध्ये झाला. यामुळे ग्राहकवादाच्या चळवळींचा प्रारंभ देखील सर्वप्रथम पाश्चिमात्य देशांमध्ये होणे स्वाभाविक ठरते. साधारणः 1930 च्या जागतिक मंदीच्या काळात ग्राहकांना त्यांच्या न्याय्य अधिकाराची जाणीव करून देण्याचे प्रयत्न सुरू झाले. अमेरिकेत 'न्युडिल' या नावाने प्रसिध्द असणाऱ्या योजनेत उद्योगपती व कामगार यांच्यासमवेत ग्राहकास देखील प्रतिनिधित्व देण्यात आले. इंग्लंडमध्ये 1949 च्या निवडणुकीत मजुर पक्षाच्या जाहीरनाम्यात ग्राहकासंबंधीचे अनेक मुद्दे मांडण्यात आले होते. अमेरिकेत ग्राहक चळवळीला खरी गती प्राप्त झाली ती 1950 नंतरच्या काळात. 1940 ते 1950 या काळात अमेरिकन जनता अवास्तव वाढलेल्या किमती, कारखान्यात तयार झालेल्या दोषपुर्ण वस्तू आणि या सर्वांकडे कानाडोळा करणारे राजकारणी व सरकार यांच्यामुळे त्रस्त झाली होती. ती आंदोलनात उतरली. या आंदोलनात मध्यमवर्ग आणि स्त्रियांचा मोठया प्रमाणावर सहभाग होता. 1960 च्या दषकात दोन महत्वाच्या घटना घडल्या. त्या काळातील अध्यक्ष केनेडी यांनी 15 मार्च 1962 रोजी ग्राहकांना सुरक्षितता, निवड स्वातंत्र्य, माहिती प्राप्त करण्याचे स्वातंत्र्य आणि त्यांच्या तक्रारीवर सुनावणी करण्याचा हक्क असे चार हक्क देण्याच्या दृष्टीने कायद्यात तरतुद केली. ग्राहकांना त्यांचे चार न्याय अधिकार मिळवून देण्यासाठी शासनयंत्रणा कार्यान्वित केली. तसेच 15 मार्च हा दिवस दरवर्षी 'ग्राहक दिवस' म्हणुन साजरा करण्याचेही जाहिर केले. या सर्व गोष्टींद्वारे केनेडी यांनी त्रस्त झालेल्या अमेरिकन ग्राहकाला दिलासा मिळवून दिला. दुसरी महत्वाची घटना म्हणजे 1960 मध्ये देशोदेशींच्या ग्राहक संघटनांची एक आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन झाली. प्रारंभी तिचे मुख्यालय नेदरलॅडमधील हेग शहरात होते. पुढे त्याचे कार्यालय लंडन येथे स्थानांतरित झाले.

भारतात ग्राहकाच्या अधिकाराचा विचार बराच जुना आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात ग्राहक, ग्राहक संरक्षण आणि व्यापारामधील फसवेगिरीविरूध्द कडक शिक्षेची तरतुद यासंबंधीचे विचार मांडले आहेत. असे असले तरीही ग्राहक चळवळीला स्वातंत्र्योत्तर काळातच विशेष गती प्राप्त झाली. 1970 पर्यतच्या पहिल्या टप्प्यात ग्राहकांच्या हितांचे रक्षण करण्यास काही संघटना व संस्था स्थापन झाल्या. या संस्था स्थापन करण्यात व्यापारी प्रतिष्ठानांचा पुढकार होता. 1970 नंतरच्या दशकात श्रीमती मृणाल गोरे व त्यांच्यासोबतच्या महिला कार्यकर्त्यांनी दृष्ट व्यापारी मनोवृत्ती विरूध्द आपले आंदोलन तीव्र केले. या आंदोलनाने ग्राहकांमध्ये मोठया प्रमाणात जागृती निर्माण झाली. या आंदोलनांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष करून चालणार नाही अशी जाणीव राज्यकर्त्यांना झाली. ग्राहक चळवळीच्या तिसऱ्या टप्प्यात वेगवेगळया घटकराज्यात ग्राहकांच्या स्वयंसेवी संघटना स्थापन झाल्या. गुजराथमधील अहमदाबाद येथे 'ग्राहक शिक्षण आणि संशोधन केंद्र' ही संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेने ग्राहक चळवळीस महत्वाचे योगदान दिले. 1986 मध्ये भारत सरकारने ग्राहक संरक्षण कायदा मंजूर केला. हा कायदा अनेक अर्थाने क्रांतिकारक आहे. इंग्रजीत या शब्दासाठी 'उपभोक्ता' हा देखील एक पर्यायी शब्द आहे. भांडवलशाही बाजारव्यवस्था उपभोगावर भर देते. उपभोग म्हटला की त्याला काही मर्यादा नसते. त्यात योग्य–अयोग्यतेचे भान सुटण्याची शक्यताच अधिक असते. उपभोगात साधन सुचितेलाही स्थान नसते. उपभोगातून शोषण प्रवृत्तीचा विकास होतो. मग इतरांचे शोषण आणि प्रसंगी निसर्गाचे शोषण करून उपभोग घेण्याची प्रवृत्ती विकसीत होते. हा सर्व इतरांचे शोषण आणि प्रसंगी निसर्गाचे शोषण करून उपभोग घेण्याची प्रवृत्ती विकसित होते. हा सर्व धोका लक्षात घेऊन इंग्रजीतील कंझ्युमर या शब्दाकरिता ग्राहक हा शब्द चळवळीच्या समर्थकांनी योजला. पुढे शासकीय व्यवहारात देखील हाच शब्द प्रचलित झाला आहे. उपभोक्ता या शब्दातून खरेदीदाराच्या व्यथा, तक्रारी, अडीअडचणी व्यक्त होत नाहीत. म्हणुन हे सर्व व्यक्त करण्यासाठी ग्राहक हाच सर्वात समर्पक शब्द आहे हे सर्वानीच मान्य केले असे म्हणता येईल.

'मतदार सार्वभौम आहे' असे लोकशाहीत म्हटले जाते. तसेच तात्विक किंवा वैचारिक पातळीवर 'ग्राहक सार्वभौम आहे' असे म्हटले जाते. म्हणजे वस्तु खरेदी

करावयाची की नाही ? केव्हा व कोठे खरेदी करावयाची? याबाबतचे पूर्ण निर्णयस्वातंत्र्य ग्राहकाला असते. हे तत्व वैचारीक पातळीवर अगदी 100 टक्के सत्य आहे. परंतु व्यवहाराच्या पातळीवर काय घडते ? अनेकदा वस्तु सदोष आहे हे माहित असुनही ती खरेदी करण्याची पाळी त्याच्यावर येते किंवा सदोष वस्तू युक्ती–प्रयुक्तीने त्याच्या माथ्यावर लादली जाते. बाजारपेठेतील अवाढव्य यंत्रणेविरूध्द संघर्ष करण्यास ग्राहक हतबल ठरतो. व्यावहारिक पातळीवर ग्राहक सार्वभौम नसून हतबल आहे, म्हणूनच ग्राहकवादाचा उदय झाला असे म्हणता येईल.

ग्राहकवाद या सामाजिक आंदोलनाचा संबंध संपूर्ण समाजाशी आहे. कारण प्रत्येक समाज घटक हा सतत ग्राहकाच्या भूमिकेत असतो. या आंदोलनात ग्राहक उत्पादक किंवा विक्रेता यांच्याविरूध्द आपल्या अधिकार व हक्कांसाठी एकजूट होऊन लढण्याचा प्रयत्न करतो. ग्राहकाचा संघर्ष कोणतीही एखादी विशिष्ट व्यक्ती वा व्यापारी संस्था यांच्याविरूध्द नाही. जो कोणी त्याची फसवणुक करेल त्यांच्याविरूध्द ग्रहकाचा संघर्ष आहे. म्हणजे ग्राहकाचा लढा व संघर्ष व्यापारामधील दृष्ट प्रवृत्तीविरूध्द आहे असे म्हणता येईल. हा ग्राहकवाद या संज्ञेचा अर्थ आहे. फिलिप्स कोटलरच्या मते ''ग्राहकवाद हे एक असे सामाजिक आंदोलन आहे की ज्याद्वारे खरेदीदार विक्रेत्याविरूध्दचे आपले हक्क आणि स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करतो.'' वेबस्टर ज्ञानकोषात ग्राहकवादाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे, ''ग्राहकवाद हे एक आधुनिक आंदोलन आहे. ग्राहकाला हीन दर्जाच्या आणि अपायकारक व धोकादायक वस्तु, दिशाभुल करणाऱ्या जाहिराती, वस्तुच्या अनुचित किमती या सर्वांविरूध्द सुरक्षा प्रदान करणारे हे आधुनिक आंदोलन आहे.''

ग्राहक आणि विक्रेता यांच्यामध्ये उचित असे संतूलन निर्माण करून ग्राहकाच्या हिताचे रक्षण व संवर्धन करणे हे ग्राहकवादाचे ध्येय आहे. व्यापारातील अनुचित व फसवणुकीच्या व्यवहाराविरूध्द ग्रहकाचा विरोध संघटीत करून व्यक्त करण्याचे कार्य ग्राहकवादाद्वारे केले जाते वस्तुची खरेदी करताना ग्राहकाने मोजलेल्या किंमतीच्या बदल्यात योग्य व उचित स्वरूपाची म्हणजे सदोष नसणारी वस्तू त्याच्या पदरात पडेल अशी सुरक्षितता निर्माण करण्याचा प्रयत्न ग्राहकवादात केला जातो. अपायकारक आणि धोकादायक वस्तूंपासून ग्राहकांचे संरक्षण करणे. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींपासुन ग्राहकाला वाचविण्याचा प्रयत्न करणे. वस्तू व सेवा यांची निवड करताना एकापेक्षा जास्त आणि उचित असे पर्याय ग्राहकाला उपलब्ध होतील असा प्रयत्न करणे आणि अर्थव्यवस्थेच्या उत्तरोत्तर प्रगतीचा मार्ग मोकळा करणे.

ग्राहकवाद ही केवळ भारताची गरज नाही. ग्राहकवाद ही विकसीत, विकसनशील आणि अल्पविकसित अशा कोणत्याही स्थितीत आसणाऱ्या सर्वच राष्ट्रांची गरज आहे. अमेरिका, इंग्लंड, जपान यांच्याप्रमाणेच मलेशिया, इजिप्त इत्यादी देशांमध्येही ग्राहकवाद विकसीत झाला आहे, निवेदन, चळवळी किंवा आंदोलने, बंद यासारख्या विभिन्न मार्गांचा अवलंब करून सर्वच देशांमधील ग्राहकांनी आपले अधिकार व हक्क पदरात पाडून घेतले आहेत. 15 मार्च हा ग्राहक दिवस म्हणुन संपूर्ण जगभर साजरा केला जातो. एवढेच नव्हे तर संयुक्त राष्ट्र या आंतरराष्ट्रीय संघटनेने देखील सुरक्षितता, निवड, माहिती आणि सुनावणी या चार न्याय अधिकारांशिवाय ग्राहकशिक्षण, स्वस्थ वातावरण, जीवनावश्यक गरजांची पूर्ती हे देखील ग्राहकाचे हक्क असल्याची घोषणा केली आहे. यावरून ग्राहकवाद ही संपूर्ण जगाची गरज आहे हे स्पष्ट होते.

पूर्वी वस्तुचे उत्पादन हे प्रामुख्याने लघुद्योग आणि कुटिरोद्योगाद्वारे व्हायचे. लोकांच्या गरजा लक्षात घेऊन तेवढयाच प्रमाणात वस्तूंचे उत्पादन केले जायचे. त्यामुळे ग्राहकांना त्या वस्तुबाबत माहिती असायची. वस्तूची प्रतवारी कोणती आहे. हे सहजतेने ते ओळखायचे. उत्पादक आणि ग्राहक यांचा प्रत्यक्ष संबंध असायचा. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक होत नव्हती.

आधूनिक अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदु ग्राहक आहे. बाजारपेठेत ग्राहक हा महत्वाचा असतो. कितीही चांगले उत्पादन असेल, ते आकर्षक असेल, वितरण व्यवस्था चांगली असेल परंतु ते उत्पादन खरेदी करणारा ग्राहक नसेल तर त्या उत्पादनाचा काहिहि उपयोग होणार नाही. ग्राहकाअभावी उद्योग आणि बाजारपेठा ठप्प होऊन आर्थिक विकासाची प्रक्रिया विस्कळीत होऊ शकते. म्हणून बाजारपेठेत ग्राहकांचे अतिशय महत्वाचे स्थान आहे. विपणनाचे सगळे संकेत, संकल्पना, अनूमान हे ग्राहकांवर आणि त्यांच्या आवडीनिवडीवर अवलंबुन असतात. विपणनाची सुरूवात उत्पादकापासुन होत असून त्याचा शेवट ग्राहकांजवळ होतो. त्यामुळे विपणनात अर्थात अर्थव्यवस्थेत ग्राहक हा महत्वाचा आहे. औद्योगिक क्रांतीमुळे यंत्राच्या सहाय्याने मोठया प्रमाणात उत्पादन होऊ लागले. बाजारपेठांवर उत्पादकांचे नियंत्रण प्रस्थापित झाले. उत्पादक अधिकाधिक फायदा मिळावा म्हणुन आपल्या मर्जीनुसार उत्पादन घेऊ लागलेत. ग्राहकांच्या आवडी–निवडीचा

विचार न करतो ते स्वतःच्या फायद्याचाच विचार करू लागले. उत्पादकांचा बाजारपेठेत मनमानी कारभार सुरू झाला. यंत्राच्या सहाय्याने मोठया प्रमाणात उत्पादन होऊ लागले. परंतु त्याचबरोबर एकाच वस्तूंचे उत्पादन करणारे अनेक उत्पादक निर्माण झालेत. परिणामतः बाजारपेठेत स्पर्धा निर्माण झाली. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रत्येक उत्पादक प्रयत्न करू लागला. या जीवघेण्या स्पर्धेमुळे ग्राहकांच्या हिताकडे लक्ष न देता उत्पादक जास्तीत जास्त नफा मिळण्यासाठी वस्तूंचा दर्जा, उपयोगिता आणि गुणवत्तेकडे दुर्लक्ष करू लागले. भांडवलदार आणि उत्पादकांच्या नफा कमविण्याच्या प्रवृत्तीचा अतिरेक ग्राहकांच्या हितांवर आणि त्यांच्या जीवितांवर होऊ लागला. मेहनतीने आणि कष्टाने पैसा मिळवून वस्तू खरेदी करणाऱ्या ग्राहकांची बाजारपेठेत पिळवणूक होऊ लागली. त्यामुळे ग्राहकहित संरक्षणाची समस्या प्रकर्षाने जाणवू लागली.

वस्तू आणि सेवांची अवास्तव भावभाढ, भेसळ, वजनमापातील फसवणुक, टेलिफोन, बॅका, विमा, रेल्वे, एस.टी. यासारख्या आवश्यक सेवांचा असमाधानकारक दर्जा, ग्राहकांच्या ठेवी बुडविणाऱ्या कंपन्या इत्यादी ग्राहकावरील अन्यायाने विविध स्वरूप आहे. वस्तूंचा दर्जा किंवा गुण आश्वासनाप्रमाणे नसणे, सदोष वस्तुंचा पुरवठा करणे, ज्या उपयोगाकरिता वस्तू खरेदी करण्यांत आली असेल तर त्या उपयोगितेकरिता ती योग्य नसणे, नकली कृत्रिम टंचाई निर्माण करणे इत्यादी विविध मार्गाने ग्राहकांचे शोषण केले जाते. भांडवलदार, उत्पादक, विक्रेते यांच्याकडून ग्राहक वस्तू विकत घेतो तेव्हा आपली फसवणूक होत आहे, याची त्याला जाणीव नसते. परंतु काही दिवसानंतर आपल्याला फसविल्याचे त्याच्या लक्षात येते. परंतु तो एकटा काही करू शकत नाही.

आज आपल्या देशात काळा बाजार आणि भ्रष्टाचार या महत्वाच्या सामाजिक समस्या आहेत. या समस्या देखील ग्राहकहित संरक्षणाच्या समस्येशी संबंधीत आहेत. ग्राहकहित संरक्षणाची समस्या सोडविल्यास काळा बाजार आणि भ्रष्टाचाराच्या समस्यांवर देखील आळा बसू शकेल. यावरून हे स्पष्ट होते की ग्राहकहित संरक्षणाची समस्या ही एक महत्वाची समस्या असून ही समस्या सोडविणे अनिवार्य झाले आहे.

ग्राहकहित संरक्षणाची समस्या ही एक फार मोठी सामाजिक समस्या आहे. ग्राहक हा एका विशिष्ट समूहातील नसतो. तर संपूर्ण समाज हा ग्राहक असतो. म्हणजेच प्रत्येक व्यक्ती ग्राहक आहे. ग्राहकांची फसवणुक आणि शोषण संपूर्ण जगात होत आहे. म्हणुन ग्राहकांच्या संरक्षणाची समस्या ही जागतिक स्वरूपाची आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशातील ग्राहकांचे देखील शोषण केले जाते. म्हणून 1962 मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष मा. केनेडी यांनी अमेरिकन कॉग्रेसला उद्देशून केलेल्या भाषणात ग्राहकांच्या चार मुलभुत हक्कांचा उल्लेख केला होता. संयुक्त राष्ट्र संघाने देखील ग्राहकहित संरक्षणाची समस्या लक्षात घेऊन ग्राहकांच्या हक्कांना मान्यता दिली. 1985 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने ग्राहकहित संरक्षणाची मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द केलीत.

समाजव्यवस्थेत प्रथम एखाद्या विशिष्ट बाबतीत लोकांचा असंतोष व्यक्त होतो. त्यामधुन मागण्या समोर येतात वा स्पष्ट होतात. त्यानंतर मग सुधारणा होतात. ग्राहकवाद हे सामाजिक आंदोलन आहे. या आंदोलनातून ग्राहकांचा असंतोष व्यक्त होत असतो. त्या असंतोषाकडे सरकार तसेच उद्योग–व्यापारी प्रतिष्ठाने फार दुर्लक्ष करू शकत नाही. ग्राहकवादाच्या वाढत्या प्रभावातून ग्राहकांच्या नव्या स्वयंसेवी संस्था वा संघटनांची भर पडते. तसेच शासनाव्दारे ग्राहकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी नव्याने शासकीय यंत्रणा निर्माण केल्या जातात. ग्राहकांच्या सामान्य अडीअडचणी, अनुचित व्यापार व्यवहार, वितरण व्यवस्थेतील दोष, ग्राहकांबाबत शासनाचे उत्तरदायित्व, उद्योगव्यवसायांसाठी फिडबॅक, लोकशाही व्यवस्था व ग्राहक ई. सामाजिक समस्या आहेत. काही व्यापारी आणि औद्योगिक प्रतिष्ठाने देशभर नियमितपणे किंवा अधूनमधून किंवा प्रदर्षनातून विक्री केंद्र उघडून अवैध मालाची विक्री करित असतात. त्यामुळे त्याचे मुळ ठिकाण जरी वेगळे असले तरी व्यापार क्षेत्र मात्र सर्वत्र असते. अशावेळी जा क्षेत्रात या व्यापारी प्रतिष्ठानाचे मुळ कार्यालय आहे. तेथे जाऊन ग्राहक तक्रार दाखल करू शकत नाही किंवा तसे करणे हे अडचणीचे ठरते. त्यामुळे ग्राहकवाद ही एक सामाजिक समस्या ठरते. ग्राहकवाद सोडविण्याचे न्यायदान भारतात कमी प्रमाणात आहे. त्यामुळे ग्राहकवादाच्या समस्या सोडविल्या जात नाही.

.................................................................................................

**संदर्भसूचीः–**

डॉ. प्रदीप आगलावे – भारतीय समाज प्रश्न आणि समस्या

रा. ज. लोटे – भारतीय समाज आव्हाने आणि समस्या

महाराष्ट्र शासन – माहितीपत्रिका,

भारत सरकार – माहितीपत्रिका

.................................................................................................

# भारतातील स्त्रीभ्रूण हत्या : सामाजिक आणि कायदेशीर दुष्परिणाम

**प्रा. प्रमिला हरीदासजी भुजाडे,** समाजशास्त्र विभाग, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

भारतीय धार्मिक ग्रंथात स्त्रीचे कितीही गुणगौरव झाले की, समाजात तिचे उच्च सामाजिक स्थान होते, ते सर्व कल्पना मात्र आहे. भारतीय समाजात आणि त्यातही विशेषतः हिन्दु समाजात अपत्यांची आशा सर्वाधिक आहे, कारण याचे अनेक धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक कारणे आहे. उदा. मोक्षप्राप्ती, वृध्दावस्था, हुंडा पध्दती या वस्तुस्थितीमुळे भारतीय समाजव्यवस्थेत आजही मुलीला एक समस्येच्या स्वरुपातच बघितले जाते.

**प्रस्तावना :** 21 व्या शतकाकडे वाटचाल करतांना एकीकडे भारत महासत्ताक होणार आहे, असे भाकीत केले जात आहे. तर दुसरीकडे भारतात स्त्रीयांशी संबंधित विविध समस्या उत्तरोत्तर वाढतच जात आहे. आज ज्या समस्याकडे प्रकर्षाने लक्ष वेधल्या जात आहे, ती स्त्रियांशी निगडीत समस्या म्हणजे, स्त्री–भ्रूण–हत्या होय, स्त्री–भ्रूण–हत्या आपल्या देशाला लागलेली फार मोठी कीड आहे. जी कीड भारतीय समाज व्यवस्थता पोखरण टाकेल की काय अशी भीती समाजापुढे आव्हाण म्हणून उभी आहे. स्त्रीच्या अस्तित्वावर कुऱ्हाड चालवणारी प्रक्रिया 'भ्रूण हत्या' होय.

**पार्श्वभूमी :** मुलीचा जन्म आणि त्यानंतर लगेच मारुन टाकण्याची अधोरी प्रथा एकोविसाव्या शतकात राजस्थान व गुजरातमधील काही विशिष्ट जाती व जमातीमध्ये प्रचलित होती. ब्रिटीशांनी 1870 मध्ये स्त्री अर्भक हत्येच्या प्रथेला पायबंद बसावा म्हणून कायदा केला. अठराव्या शतकात उत्तर व पश्चिम भारतातील मध्यम जातीमध्ये मुलींना जन्मतःच मारुन टाकण्याची प्रथा होती, ज्यात नवजात बालिकेला दुधाच्या भांड्यात बुडविणे, खाटेच्या पायाखाली चिरडणे, विषारी फळांचा रस पाजणे अशा क्रुर पध्दतीचा अवलंब त्यासाठी केला जात असे. आज ही प्रथा बऱ्याच प्रमाणात नष्ट जरी झाली असली तरी बदलत्या काळाच्या प्रवाहात ही क्रुप्रथा तुरडक प्रमाणात टिकून राहिली. राजस्थानमधील इटावा ग्रामीण भागातील राजपुत व तामिलनायडूतील कल्लार जातींमध्ये ही क्रुप्रथा आजही टिकून असल्याचे दिसून येते. कल्लार जातीत 10 वर्षाखालील बालकांमध्ये मुलींचे प्रमाण फक्त 30ः आहे. भारतीय संस्कृतीत महिलांना सर्वोकृष्ट स्थान असतांना आज मात्र गर्भातच मुलींची हत्या केली जाते. या सारखी देशात दुसरी कुठलीही दुर्दैवाची गोष्ट नाही. महिलांचे प्रमाण असेच कमी होत राहिले तर देशात अनेक सामाजिक समस्या आढळून येतील. मुलींचा जन्म म्हणजे संकट मानणाऱ्या मनोवृत्तीतून तिची गर्भातच हत्या करण्याची क्रुर पध्दत रुढ झाली आहे.

**स्त्रीभ्रुण हत्या संकल्पना :** स्त्रीच्या गर्भधारणेच्या अवस्थेतच जर स्त्री गर्भाचा मृत्यू झाला तर त्यास 'गर्भमृत्यू' असे संबोधिले जाते. सर्वसाधारणपणे गर्भपात व मृत–जन्म यांचा यामध्ये समावेश केला जातो. गर्भजल परीक्षेसाठी (ॲग्निओसेटेसीस) कोरियॉ निक आणि व्हिलाय बायॉप्सी (सी.व्ही.बी. टेस्ट) या दोन तंत्राचा उपयोग गर्भातील जन्मजात विकृतीचा छडा लावण्यासाठी गर्भजल परीक्षा केली जाते. परंतु भारतात त्यांचा उपयोग प्रामुख्याने गर्भलिंग परीक्षेसाठी केला जातो. गर्भ मुलींचा असल्यास गर्भपात केला जातो. दरवर्षी लाखो बालिकांना जन्मा आधीच मारले जाते.

2001 साली झालेल्या जनगणने नुसार भारतामध्ये दर हजार पुरुषां मागे 933 स्त्रिया आहेत. 0–6 वयोगटासाठी हेच प्रमाण दर हजार मुलांमध्ये 927 मुली असे आहे. 2001 च्या जनगणनेने या वास्तवाची जाणीव करन दिली. संपूर्ण देशामध्ये बहुतेक राज्यांमध्ये मुलांच्या तुलनेत मुलींचं जन्माला येण्याचे प्रमाण गेल्या काही दशकात सातत्याने कमी होत आहे.

**स्त्री–भ्रुण हत्या होण्याची कारणे मुख्यतः तीन आहे :** **1.** मुलगा वंशाचा दिवा मानणे. 2. वैधकीय तंत्रज्ञानाचा गैर वापर 3. मुलगी परक्याचे धन इतकेच नाही तर मुलींच्या लग्नाचा खर्च, हुंडा, मेल्यावर क्रियाकर्म, म्हातारपणाची काठी इत्यादी.

**सारणी क्रमांक 01**

**स्त्री–पुरुष** (दर 1000 पुरुषांमागे स्त्री प्रमाणे)

| जनगणना वर्ष | 1000 पुरुषांमध्ये स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|
| 1901 | 972 |
| 1911 | 964 |
| 1921 | 955 |
| 1931 | 950 |
| 1941 | 945 |
| 1951 | 946 |

| | |
|---|---|
| 1961 | 941 |
| 1971 | 930 |
| 1981 | 935 |
| 1991 | 927 |
| 2001 | 933 |

Source: Census of India, 2001

भारतातील स्त्री पुरुष प्रमाण हे प्राचीन काळापासून अस्थिर असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजपर्यंत स्त्री प्रमाण प्रमाणापेक्षा अधिक घटत असल्याचे दिसते. 1901 पासून सतत स्त्रियांचे प्रमाण घटत गेले आहे. शंभर वर्षात सुरुवात 972 ते 933 अशी अवस्था दिसते. यामुळे नैसर्गिक असमतोल निर्मा. ण झाल्याचे आढळतं. स्त्री–पुरुष प्रमाणात विषमता निर्माण झाल्यामुळे विविध सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. उदा. विजोड विवाह, बलात्कार, गुंडागर्दी, मुलींना अविवाहीत राहण्याची वेळ, इत्यादी सामाजिक असमतोल निर्माण करणाऱ्या घटना घडत आहेत.

**सारणी क्रमांक 02**

**भारतातील काही प्रमुख राज्यांमधील 0.6 वयोगटातील दर हजारमुलांमागे मुलींचे प्रमाण**

| **राज्य** | **प्रमाण मुलींचे** (1000 मुलांमध्ये) |
|---|---|
| पंजाब | 798 |
| हरियाणा | 819 |
| दिल्ली | 865 |
| गुजरात | 883 |
| हिमाचल प्रदेश | 897 |
| उत्तरांचल | 906 |
| राजस्थान | 909 |
| महाराष्ट्र | 913 |
| Source: Census of India, 2001 | |

देशातील आर्थिक दृष्ट्या विकसित मानल्या जाणाऱ्या पंजाब, हरियाणा, दिल्ली, गुजरात आणि महाराष्ट्र सारख्या राज्यामध्ये मुलींची संख्या झपाट्याने कमी होत आहे. त्यातही आर्थिक सुबत्ता असणाऱ्या शहरी भागांमध्ये मुला–मुलींचे लिंग गुणोत्तर जास्तच विषम होत चालले आहे. पूर्वी गर्भजलपरीक्षा आणि आता अल्ट्रासाऊंड सोनोग्राफीच्या तंत्रज्ञानाचा गर्भाचं लिंग जाणून घेण्यासाठी मोठ्य प्रमाणावर होणारा गैरवापर आणि त्यानंतर मुलींचा गर्भ असल्यास मुलगी म्हणुन केला जाणार दुर्लक्षचा सर्व कारणांमुळे मुलींची संख्या वेगाने कमी होत चालली आहे.

**सारणी क्रमांक .3**

**भारतातील लिंग गुणोत्तरावरुन मुलींचे घटते प्रमाण**

| **वर्ष** | **लिंग गुणोत्तरे** | **मुली दर हजारी मुलांमध्ये (150)** |
|---|---|---|
| 2011 | 1) मुलांची संख्या<br>2) मुलींची संख्या | 623,700,000<br>586,500,000 |
| 2012 | 1) मुलांची संख्या<br>2) मुलींची संख्या | 628,800,000<br>(628,8 Million)<br>591,400,000<br>(591,4 Million) |

**सारणी कमांक 04**

**राज्यात होणारे स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण**

| अ. क्र. | राज्य States | गर्भ मृत्यू | | अर्भक मृत्यू | |
|---|---|---|---|---|---|
| | | **I** | **P** | **I** | **P** |
| 1. | Andhra Pradesh | 8 | 8.8 | 8 | 7.7 |
| 2. | Assam | 0. | 0.0 | 4 | 3.8 |
| 3. | Bihar | 1 | 1.1 | 4 | 3.8 |
| 4. | Gujrat | 0 | 0.0 | 4 | 3.8 |
| 5. | Haryana | 13 | 14.3 | 4 | 3.8 |
| 6. | Jharkhand | 0 | 0.0 | 1 | 1.0 |
| 7. | Karnatak | 1 | 1.1 | 1 | 1.0 |
| 8. | Kerala | 0 | 0.0 | 1 | 1.0 |
| 9. | Madhya Pradesh | 14 | 15.4 | 31 | 29.8 |
| 10. | Maharashtra | 41 | 45.1 | 20 | 19.2 |
| 11. | Orissa | 1 | 1.1 | 0 | 0.0 |
| 12. | Punjab | 0 | 0.0 | 6 | 5.8 |
| 13. | Rajasthan | 9 | 9.9 | 5 | 4.8 |
| 14. | Sikkim | 0 | 0.0 | 3 | 2.9 |
| 15. | Tamil Naidu | 0 | 0.0 | 8 | 7.7 |
| 16. | West Bengal | 0 | 0.0 | 2 | 1.9 |
| **Source: वर्तमानपत्र** | | | | | |

देशामध्ये दरवर्षी 12 लाख स्त्री–भ्रुण हत्या होत असल्याकडे ही लोकांचे लक्ष वेधले गेले आहे. 0 ते 6 वयोगटातील मुलींची हत्या होण्याचे प्रमाण जास्त आहे. या अहवालात 2001 पर्यतची आकडेवारी आहे. या आकडेवारी नुसार पंजाबमध्ये 1991 पर्यत दर हजार मुलांमागे 798 मुली एवढे प्रमाण कमी झाले आहे. पंजाबच्या शेजारी असलेल्या हरियाणातही चित्र काही फारसे वेगळे नाही. तेथे 1991 मध्ये दर एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण 819 असे आहे. मुली वाचविण्यासाठी आता मोहीम सुरु केलेल्या आहे. गुजरातमध्ये 1991 मध्ये दर एक हजार मुलांमागे 928 मुली होत्या आणि 2001 मध्ये हे प्रमाण 833 मुलींवर आले आहे.

राजधानी नवी दिल्लीत ही चित्र निरशाजनक आहे. तेथे 1991 मध्ये दर एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण 915 होते ते 2001 मध्ये 838 मुलींवर आले आहे. स्त्री–गर्भ नकोश्या मानसिकतेतून राजस्थानात मुलींचे प्रमाण घटत झालेले असून 2011 च्या जगणनेनुसार अल्वर जिल्ह्यात प्रति एक हजार मुलांमागे मुलींची 888 होती. हेच प्रमाण राज्यपातळीवर 909, तर देश पातळीवर 927 आहे. दिल्ली, पंजाब व हरियाणा या राज्यांशी तुलना करता राजस्थान, महाराष्ट्र व तमिलनाडू या राज्यात मुलींची संख्या चांगली आहे. परंतु महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात स्त्री–भ्रूण हत्येचे प्रमाण जास्त आहे. सरकारने गर्भ लिंग चाचणीला कायदेशीर बंदी घालूनही मानवतेचे हत्यारे असलेले अनेक वैद्यकीय व्यावसायीक आडमार्गाने लिंग चाचणी करत आहे.

स्त्री भ्रूण हत्येमुळे सामाजिक असंतोष निर्माण होउन गुन्हेगारी वाढली आहे. पत्नी बनु शकणाऱ्या महिलांचा तुटवडा निर्माण होतो. तेव्हा अकुशल आणि शिक्षित डावलले जातात. उत्तर भारतातील पठारी प्रदेशातील खेडेगावातून मोठ्या प्रमाणावर गर्भपाताचा परिणाम प्रकर्षाने जाणवू लागला आहे. अनेक कुटूंबांना त्यांच्या मुलांसाठी बायकाच मिळत नाही. हरियाणाच्या एक स्थानिक पुढाऱ्याच्या मते लग्नासाठी बायको न मिळणे म्हणजे जणू धान्याचा भीषण दुष्काळ! परिणामतः या संकटाला तोंड देण्याच्या प्रयत्नात दरिद्र राज्यातील महिलांचा पत्नी म्हणुन व्यापार सुरु झाला आहे. आणि श्रीमंत राज्यातील कुंटूबामध्ये लग्न करण्याची सक्ती तिच्यावर करण्यात येते. लग्नासाठी मुलीची हरियाणामध्ये इतकी गंभीर समस्या बनली आहे की, राजकारणातही तिचा प्रवेश सुरु झाला आहे.

**समस्यांचे समाजशास्त्रीय पक्ष :** भारतीय धार्मिक ग्रंथात स्त्रीचे कितीही गुणगौरव झाले की, समाजात तिचे उच्च सामाजिक स्थान होते, ते सर्व कल्पना मात्र आहे. भारतीय समाजात आणि त्यातही विशेषतः हिन्दु समाजात अपत्यांची आशा सर्वाधिक आहे, कारण याचे अनेक धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक कारण आहे. उदा. मोक्षप्राप्ती, वृध्दावस्था, हुंडा पध्दती य वस्तुस्थितीमुळे मुलीला एक समस्येच्या स्वरुपात बघितले जाते.

**कन्या भ्रूण हत्याची कारणे :** 21 व्या शतकातही राहात असतांना लोकांच्या मानसिकतेत अजून परिवर्तन झाले नाही. आज ही मुला मुली मध्ये अंतर केले जाते. 2001 च्या जणगणना आकडे दर्शवितात की 1000 पुरुषात 927 स्त्रिया आहे. 2001 मध्ये या स्थितीमध्ये वाढ झाली आहे.

भ्रूण हत्येची प्रथा संभ्रात आणि संपन्न कुटूंबात अधिक आहे. मुलींच्या प्रती उपेक्षात्मक दृष्टीकोण स्त्रीभ्रूण हत्याचे मुख्य कारण आहे. त्यात : अ) समाजात स्त्रीयांची दुय्यम स्थिती, ब) हुंडा प्रथा, क) पुरुष प्रधान मानसिकता.

**कन्या भ्रूण हत्याची अन्य कारणे :** 1) पुत्र प्राप्तिची मानसिकता, 2) विवाह बोझिल बाब समजणे, 3) शारीरिक असुरक्षितता, 4) मुलीला ओझे समजणे, 5) कुटुंब नियोजनाची इच्छा, 6) दारिद्रय, 7) लिंग भेदाचे शिकार कन्या भ्रूण, 8) प्राचीन मनोवृत्ती आणि अंधविश्वास, 9) अशिक्षितपणा कन्या भ्रूण हत्या मध्ये सहायक, 10) सामाजिक उपेक्षा

**कन्या भ्रूण हत्याचे समाज आणि राष्ट्रावर अप्रत्यक्ष दुष्प्रभाव :** गाडीच्या दोन चाका सारखे स्त्री पुरुषात समुचित संतुलन अपेक्षित आहें. कारण कोणत्याही स्वस्थ आणि विकसित समाजाच्या निर्मितीकरिता स्त्री पुरुष सारखे असतात. जेव्हा दोन्ही घटकात असंतुलन निर्माण होते तेव्हा सामाजिक व्यवस्थामध्ये अराजकता उत्पन्न होते. मुलांची अपेक्षा मानवाच्या मन, मेंदू आणि मनोवृत्तीला असे कुंठित करतात. ज्यामुळे कन्या अपत्यांची कामना आणि जन्म समाजात नाकारत आहे. कन्या जन्म अभिशाप समजल्यामुळे कन्या भ्रूण हत्या प्रचलन वाढले आहे. स्त्री– पुरुषाचे अवरोही टक्केवारी क्रम निरंतर वाढले गेले तर भारतीय समाजात वेगवेळ्या सामाजिक समस्याचे सूत्रपात होवू शकेल.

**कन्या भ्रूण हत्यानी उत्पन्न दुष्परिणाम याप्रमाणे आहे :** 1) असंतुलीत लिंगानुपात, 2) सामाजिक संतुलनाच्या बिघाडामुळे हजारो मुल अविवाहित राहणार, 3) बहुपती विवाहाचे प्रचलत वाढले, 4) अपहरण विवाह, सेवा विवाहाचे प्रचलन वाढेल. 5) अनेक यौन विसंगती उत्पन्न होणार. 6) वेश्यावृत्तीला प्रोत्साहन. 7) समलैगिकता वाढेल. 8) मातृसत्ताक कुटूंबाचा सभ्य समाजात पुनः प्रभाव वाढेल. 9) हुंडा प्रथाच्या ऐवजी वधू मूल्याचे सभ्य समाजात पुन; प्रचलन. 10) एड्स सारख्या आजारात वाढ. 11) लैगिकता सम्बन्धी आजारात वाढ.

**भ्रूण लिंग – परीक्षण वैधानिक बाजू :** सन 1972 मध्ये MTP Act पारित झाला. या कायद्याचा उद्देश अवांछित गर्भपात करण्याची स्वतंत्रता देणे होय. परंतु या कायद्याचा दुरुपयोग झाला. केन्द्रीय सरकारनी या दुरुपयोगाच्या वाढत्या प्रभावामुळे या कायद्याला अवैध घोषित केले.

**भारतीय दंड संहिता मध्ये भ्रूण लिंग परीक्षण कायदा : धारा 4 –** लिंग भ्रूण परीक्षणाच्या दुरुपयोग संबंधी विधेयकाच्या या धारामध्ये लिंग निर्धारण ऐवजी

अन्य परीक्षण करु शकतो मात्र स्त्रीचे वय 35 असावे. दोन पेक्षा जास्त वेळेस गर्भपात झाले असेल तर. **धारा 5 –** गर्भवती स्त्रीची लिखित सहमती घेणे आवश्यक आहे. **धारा 22** – लिंग परिक्षणाकरिता कोणत्याही प्रकारचे विज्ञापन (नोटीस, परिचय पत्र प्रचार–प्रसार) देवू शकत नाही यावर पूर्ण प्रतिबंध लावले गेले आहे. **धारा 25** – पति किंवा अन्य व्यक्ति जे लिंग परिक्षणाकरिता विवश करतील त्यांना दंडित केले जाईल.

या कायद्याचे उल्लंघन केल्यास प्रसवपूर्व निदान तकनीक अधिनियम, 1996 अनुसार दंडाचे प्रावधान केले आहे. त्यांना 1000 ते 5000 रुपये दंड आणि ते 1 ते 5 वर्ष कारागृहाचे प्रावधान आहे. लाइसेंस निरस्त करण्याचे प्रावधान आहे. शासनाने खालील अवस्था मध्ये भ्रूण परीक्षणाची सूट दिली आहे.

– क्रोमोसोम संबंधी विकृती
– वंशानुगत आजार
– पिढ्यानुपिढ्या चालणारे यौन आजार
– हिमोग्लोबिनौपैथीज
– जन्मजात विकृती

**5 एप्रिल 2001 च्या निर्देशानुसार पुढील निर्देश दिले गेले :** 1) अल्ट्रासाऊण्ड क्लिनिक, गर्भपात केंद्रावर नजर ठेवणे. 2) अल्ट्रासाऊण्ड क्लिनिक मालकांचे पंजीयन करणे. 3) गर्भपात विषयक Advertisement छापू शकत नाही. 4) गर्भपात करणे अपराध घोषित केले गेले. पाच वर्ष कारावास आणि दण्डांचे प्रावधान लागू केले गेले.

**मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेगनेंसी एक्ट 1971 :** सन. 1860 मध्ये अनुच्छेद 312 ते 316 अनुसार गर्भपात दंण्डनीय अपराध होता. यात दोन्ही पक्षाला 3 वर्षापासून आजीव कारागृह अशी दंण्ड व्यवस्था होती.

**स्त्री भ्रूण हत्येवरील दीर्घ कालीन सामाजिक उपाय योजनाः–**

1. लोकांच्या विचार सरणीची पध्दतच बदलविणे. 2. लैगिक बाबतीतील सर्व गैर कल्पना दूर करण्याचा समावेश शिक्षण पध्दतीत केला पाहिजे. 3. सामाजीकरणाची पध्दत बदलविणे. आई वडिलांनी मुला–मुलींचे संगोपन करतांना दोघांनाही समान स्वरुपाची संधी व सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच ृमुलगा–मुलगी समान तत्वश अंगीकारणे. 4. स्त्री चळवळीच्या विशेष दबावामुळे पुरुषांची मते बदलविणे व स्वतःचे विचार बदलण्यासाठी उत्तेजन देणे. तसेच प्रसिध्दी माध्यमा मार्फत जनजागृती करणे. 5. वैदू, भरट्या–भामट्या बाबा मार्फत जे वनौषधी देऊन गर्भपात करतात त्यावर प्रतिबंध लावणे. 6. स्त्री विषयक नकारात्मक दृष्टीकोण कमी करुन आर्थिक स्वरुपाने आत्मनिर्भर बनविणे. 7. अग्निहोत्री : जिथे–जिथे स्त्री आर्थिक सहकार्य आहे तिथे ही समस्या कमी आहे, तेव्हा मुलींना अवांछनिय बनविणाऱ्या सामाजिक परिवेशाला बदलविले पाहिजे. 8. कल्याणी मेनन : आंध्रप्रदेश राजस्थान मध्यप्रदेश या राज्यात दोन पेक्षा जास्त अपत्य असणाऱ्या अभिभावकांना काही अधिकारातून जसे–प्रसूती रजा, मुक्त शिक्षण, आरोग्य सुविधा वंचित करणाऱ्या नितीचा अवलंब केला पाहिजे. 9. स्वंयसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ता मिडिया यांनी या विरोधी आंदोलन चालविले पाहिजे. 10. महिला संघटना, महिला मंडळे, भीषी मंडळे, महिलांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वंयसेवी संस्था यांच्यात जागरुकता निर्माण करणे. स्त्रीच्या अस्तित्वावर कुऱ्हाड घालणाऱ्या या प्रक्रियेचा विचार व माहिती महिला बचत गटाच्या मासिक बैठकीत देण्यात यावी. 11. गरजू महिलांना सर्व प्रकारची मदत व सहाय्य करण्यासाठी स्त्री संस्थाध्संघटनांनी अधिकाधिक संख्येने ृआधार गटश निर्माण करुन स्त्रियांना मानाचे जिवन जगण्यास व पर्यायी उपाय करणे. 12. मुलींच्या सशक्ति करणाचे संभाव्य प्रयत्न करणे आणि त्यांची सुरुवात कुटूंबापासून होणे आवश्यक आहे. 13. चित्रपट कथा, कांदबऱ्यातून मुलींच्या अस्तित्वाचे महत्व पटवून दिले पाहिजे. 14. राजस्थानमध्ये अल्वर जिल्ह्यात विवाहाच्या वेळेसचा आठवा फेरा जो स्त्री गर्भाच्या रक्षणासाठी आहे ती प्रथा प्रत्येक जिल्ह्यात रुढ व्हायला पाहिजे. 15. ही ज्वलंत समस्या थांबविण्यासाठी जी पिढी पूर्वग्रह दूषित आहे. त्यांचे मतपरिवर्तन करुन तरुण पिढीस प्रबोधन करणे आवश्यक आहे.

**स्त्री भ्रूण हत्येवरील कायदेशीर (तरतुदी):–**

1. गर्भजल परीक्षणा संबंधीच्या नियमांची व कायद्याची प्रभावी पध्दतीने अंमल बजावणी करणे. 2. समाजात दबाव व गुन्हेगारी प्रवृत्तीचे खच्चीकरण करण्यासंबंधीचे कायदे कठोर करणे. 3. शालेय व अन्य सर्व स्तरावरील शिक्षणसंबंधीच्या प्रमाणपत्रात आईचे ही नाव नमूद करण्यास सक्ति करणारे कायदे बनविणे. 4. मालकी हक्कात पती बरोबरच पत्नीलाही हक्क असल्याची नोंद करणारे कायदे करणे. 5. या समस्या करीता जलदगतीने व कडक शिक्षा करणारे, कायद्याचा धाक निर्माण व्हावा संबंधीत खटल्यांचा निकाल लवकर लागावा म्हणुन **'फास्ट ट्रॅक'** न्यायालय आवश्यक आहे. इतकेच नाहीत तर औपचारीक न्यायालयाची स्थापना करणे. 6. प्रसुतीपूर्व परीक्षण ।बज 1994 योग्य रित्या

लागू करण्याची गरज आहे. कारण महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेउन हा जो कायदा केला नंतर केंद्र सरकारने 2002 मध्ये तो संपूर्ण भारतात लागू केला. या कायद्यान्वये गुन्हेगारांना ठोस शासन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र ज्वलंत आकडेवारीनुसार या कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्रातच प्रभवी पणे होत काद्द हा प्रश्न उपस्थित झाला आहे. सोनोग्राफी मशिनच्या या माध्यमातून अनेक ठिकाणी असे प्रकार घडत आहेत. लोकांमध्ये कायद्यांची भीतीच उरली नसल्याचे दिसत आहे. सध्या केवळ कायद्याने किंवा सोनोग्राफी सेंटरवर धाडी टाकून सुटणार नसून त्यासाठी मोठ्य प्रमाणावर सामाजिक प्रबोधन होणे आवश्यक आहे. 7. डॉक्टर व सोनोग्राफी केंद्राची भूमिका निश्चित व्हावी. जे डॉक्टर गर्भजल परीक्षेचा गैर वापर करतील त्यांना शोधून कायद्यान्वये कठोर शिक्षा व्हायला हवी.

**स्त्री भ्रूण हत्येवरील प्रशासकीय उपाययोजनाः—** 1. भारतीय शासनाने लोकसंख्या नियंत्रण प्रक्रियेचा पुर्नविचार केला पाहिजे. 2. केंद्र व राज्य सरकार ने शालेय अभ्यासक्रमात लैंगिक शिक्षणाचा समावेश केला पाहिजे. 3. गर्भ निरोधक साधने व औषधी या बाबतचा सरकारी दृष्टी धोरणावर प्रतिबंध लावणे. 4. डॉक्टर व प्रशासन यांनी एकत्र येवून या विषयावर चर्चा करुन उपाय करुन अंमलबजावणी करणे. 5. प्रत्येक प्रदेशाच्या आरोग्य विभागाने सकारात्मक पाऊल उचलणे आवश्यक आहे. 6. **'इंदिरा गांधी बालिका सुरक्षा योजना'** प्रभावी करण्याकरिता दिल्या जाणाऱ्या शिक्षेला वाढविणे. 7. महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने ज्या प्रकारे www.savethebabygirl. com नावाची वेबसाईट सुरु केली. 'नॅस कॉम' संस्थेतर्फे देशातील उत्कृष्ट वेबसाईटचे नामांकण मिळविली अशा वेबसाईट सुरु व्हायला हव्यात.

**स्त्री भ्रूण हत्या कमी करण्याचे अन्य उपाय :—** 1) जेव्हा समाजातील शिक्षित वर्ग, अधिकारी वर्ग, कायदे आणि नियंत्रण व्यवस्थाचे परिचालन, मिडीया संबंधी, सामाजिक संघटन या समस्यांचा विरोध करतील. 2) नगरातील स्थानीय पोलीसांची भूमिका सक्रिय बनविणे. 3) स्वयंसेवी संस्था, संघटना, जनजागृतीच्या कार्यक्रमाद्वारे ही समस्या कमी होवू शकते. 4) कुटूंब नियोजनाच्या साधनांचा योग्य वापर करणे. 5) शासनामार्फत जसे अभियान चालविले गेले पाहिजे ज्यामुळे स्त्रीवर्ग गर्भपातच्या दुष्परिणामाने अवगत होतील. 6) लैंगिक शिक्षणाबरोबर सामाजिक मर्यादा आणि कायद्याचे ज्ञान तरुण पिढीला देणे. 7) कुटूंब नियोजन समिती द्वारा लेख, निर्देश, उपाय इत्यादी पत्रिका आणि वर्तमानपत्रात छापले पाहिजे. 8) स्त्रीयांकरिता यौन शिक्षणापासून तर प्रसूती शिक्षणाची व्यवस्था करणे. 9) बालविवाह पूर्णतः बंद कणे जेणेकरुन व्यस्क विवाह होतील. परिणामतः गर्भपात करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी होईल.

**स्त्रीभ्रूण हत्या विरुध्द देशव्यापी अभियान :—** 1) सात वर्षा पासून भ्रूण हत्या विरुध्द अभियान चालविले गेले. 2) 25 जून 2001 ला दिल्लीत सर्वपंथ सम्मेलन चालविले गेले. 3) सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वात 25 ऑगस्टला जनजागृती रॅली काढली गेली. 4) नाचगाव येथे 68 किलोमीटरची जनजागृती पदयात्रा काढली गेली, ज्यात राज्यातील 5 हजार तरुणींनी सहभाग घेतला.

स्त्री भ्रूण हत्या करुन आपण आपली जातच नष्ट करायला निघालो आहोत याची जाणीव स्त्रीमध्ये निर्माण व्हायला हवी कारण स्त्री असो किंवा मुलगी जन्मतर स्त्रीच्याच पोटी घ्यावा लागतो म्हणुनच,

वेळ आली आहे विचाराची।
वंशाचा दिवा ठरवायची ।।
पणतीने पणती लावायची।
स्त्री—भ्रूण हत्या थांबवायची।।

———————————————————

***संदर्भ ग्रंथ सूचीः—***

1. डॉ. खैरनार दिलीप, लोकसंख्या आणि समाज, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद जून 2001.

2. प्रा. लोटे रा.ज. भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर जून 2007.

3. डॉ. भांगे कालिदास, लोकसंख्या समाज आणि समस्या, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद जानेवारी 2011.

**नियतकालिकेः— 1.** लोकप्रभा — 17 ऑगस्ट, 2001, 2. धर्माधिकारी अविनाश, सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र विशेषांक भाग — 3, जानेवारी 2011

**वर्तमानपत्रः— 1.** लोकमत — नोव्हेंबर 2010, 2. वर्धा न्यूजलार्डन, 20 ऑगस्ट 2011, 3. लोकमत — 15 फेब्रुवारी 2012, 4. लोकमत — 20 फेब्रुवारी 2012, 5. जनतेचा महानायक — गुरुवार 21 जून 2012

**Website:-** LHP: www.ibnlokmat.tv/show story., www.taptilok.com, http://www.bbc.co.uk, BBC Chanel news.

-------------------------------------------------------------------

# नागपूर विभागातील शैक्षणिक आणि आरोग्य विषयक घटकांचा शहरीकरणावर परिणाम

**प्रा. जयंतकुमार मस्के,** अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर

शहरीकरणामुळे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा चेहरा मोहराच बदलून जातो. संपन्न देशात शहरीकरणाचे प्रमाण 80 टक्केपेक्षा जास्त झालेले आहे. तर भारताचे शहरीकरण 31.16 टक्के झालेले आहे. आज अमेरिका, जपान, इंग्लंड, स्वित्झरलॅन्ड या देशामध्ये साक्षरतेचे प्रमाण, शिक्षण सुविधा, आरोग्य सुविधा, शुद्ध पिण्याचे पाणी, राहण्याची सुविधा जास्त आहे. म्हणून वर्तमानकाळात शहरीकरणाला मानवी जीवनातील एक आवश्यक अंग, समाजामध्ये शहरीकरणाला मानवी जीवनाचा एक आवश्यक घटक, सहयोगी पर्याय तसेच क्षेत्राच्या उन्नतीचा व संपन्नतेचा एक महत्वपूर्ण निर्देशक मानण्यात येऊ लागले आहे.

देशाच्या किंवा एखाद्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये शहरात राहणा—या लोकांचे प्रमाण म्हणजे शहरीकरण होय. शहरीकरण ही सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची अशी प्रक्रिया आहे की, ज्याचा परिणाम म्हणजे ग्रामीण जीवनपद्धती ही शहरी जीवनपद्धतीमध्ये बदलत जाते.[1] सामान्यतः असे दिसून येते की, एखाद्या देशाचा जसा—जसा आर्थिक विकास होत जातो तस—तसा त्या देशाच्या शहरी क्षेत्रामध्ये लोकसंख्येचा अनुपात वाढत जातो. संपन्न देशात औद्योगिकरण, आर्थिक विकास व शहरीकरण हया प्रक्रिया एकाच वेळी घडून येतांना दिसतात. म्हणून शहरीकरणाला आर्थिक विकासाचे सुचक मानले आहे.[2]

शहरीकरणामुळे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा चेहरा मोहराच बदलून जातो. संपन्न देशात शहरीकरणाचे प्रमाण 80 टक्केपेक्षा जास्त झालेले आहे. तर भारताचे शहरीकरण 31.16 टक्के झालेले आहे.[3] आज अमेरिका, जपान, इंग्लंड, स्वित्झरलॅन्ड या देशामध्ये साक्षरतेचे प्रमाण, शिक्षण सुविधा, आरोग्य सुविधा, शुद्ध पिण्याचे पाणी, राहण्याची सुविधा जास्त आहे. म्हणून वर्तमानकाळात शहरीकरणाला मानवी जीवनातील एक आवश्यक अंग, समाजामध्ये शहरीकरणाला मानवी जीवनाचा एक आवश्यक घटक, सहयोगी पर्याय तसेच क्षेत्राच्या उन्नतीचा व संपन्नतेचा एक महत्वपूर्ण निर्देशक मानण्यात येऊ लागले आहे.[4]

शहरे ही आर्थिक व इतर सेवा पुरविणारी केंद्रे असतात. आजुबाजुच्या सर्व वस्त्यांना ही केंद्रे सेवा पुरवितात. या सेवांसाठी जशी मागणी वाढत जाईल तशी ही केंद्रे वाढत जातात. म्हणजे शहरीकरणाचा विकास होतो. या केंद्राची वाढ किंवा शहरीकरणाचा विकास एकूण आर्थिक क्रियांच्या विकासाचा व लोकांचे जीवनमान उंचावण्याचा निर्देशक आहे.[5] थोडक्यात शहरीकरणामुळे जीवनाची पातळी उंचावते, व्यक्ती आणि कुटुंब यांच्या आरोग्याची तसेच शिक्षण आणि रोजगाराची पातळी उंचावते. त्यामुळेच प्रजनन तसेच मृत्यूच्या दरात झपाटयाने घट होऊ शकते.[6] थोडक्यात शहरीकरण म्हणजे संस्कृतीच्या अधिक वरच्या टप्प्यावर जाण्यासाठी लोकांनी केलेल्या चळवळीचे फळ असते.

शहरीकरणाच्या वाढीला अनेक विविध घटक जबाबदार आहेत. प्राचीन काळात शहरीकरणाची प्रक्रिया ही आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी घटकावर अवलंबून होती. परंतु आधुनिक युगात शहरीकरणास आर्थिक, औद्योगिक, व्यापार व इतर अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत.[7] सध्याच्या आधुनिक काळात शहरीकरणावर आर्थिक, सामाजिक व लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा परिणाम झालेला आढळून येतो. विकसित देशाच्या मानाने भारतीय शहरीकरणाचा वेग कमी आहे. परंतू अलीकडे तंत्रज्ञान, औद्योगिकरण, दळणवळण, शिक्षण सेवा यामुळे शहरीकरणाचा वेग वाढत आहे.[8] म्हणजे एखाद्या प्रदेशातील शहरीकरण विविध आंतर संबंधित घटकांवर अवलंबून असते.

अलिकडच्या काळात ग्रामीण भागातील समाजात सामाजिक व आर्थिक जागृती फार मोठया प्रमाणात झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील बरेच लोक नागरी भागातील जीवनाकडे आकर्षित होतात. यातून नागरी भागाकडे स्थलांतर होते. त्यामुळे शहरीकरणाचा विस्तार वाढू लागतो. हया सामाजिक व आर्थिक जागृतीचा परिणाम शिक्षण व आरोग्य क्षेत्रावर मोठया प्रमाणात झाला आहे. विशेषतः ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात शैक्षणिक व आरोग्य विषयक सुविधा मोठया प्रमाणावर उपलब्ध असतात. त्यामुळे अशा सामाजिकदृष्टया विकसित भागाकडे लोकसंख्येचे स्थलांतरण होऊन शहरीकरणाचा वेग वाढण्यास मदत होते. शहरीकरणामुळे जीवनाची पातळी उंचावते म्हणजे लोकांच्या आरोग्याची, शिक्षणाची, राहणीमाणाची पातळी

उंचावते. म्हणून शहरीकरणावर परिणाम करण्या—या सामाजिक घटकांपैकी शिक्षण व आरोग्य हे दोन महत्वाचे घटक आहेत.

**नागपूर विभागातील शहरीकरणाची प्रवृत्ती :** महाराष्ट्राचे व नागपूर विभागाचे शहरीकरण 2011 च्या जनगणनेनुसार अनुक्रमे 45.23 टक्के व 42.17 टक्के झालेले आहे. नागपूर जिल्हयाचे शहरीकरण 2011 च्या जनगणनेनुसार 68.30 टक्के झालेले आहे. तर नागपूर विभागातील चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोदिया व गडचिरोली जिल्हयातील शहरीकरण अनुक्रमे 35.08, 32.47, 19.50, 17.07 व 11.00 टक्के झालेले आहे.[9] थोडक्यात नागपूर विभागातील जिल्हयामध्ये शहरीकरणाच्या विविध पातळया आहेत. यावरून नागपूर विभागातील नागपूर जिल्हा जास्त शहरीकरण गटात (40.00 टक्केहून अधिक शहरीकरण) येतो. तसेच चंद्रपूर, वर्धा हे दोन जिल्हे मध्यम शहरीकरण गटात (21 ते 40 टक्के शहरीकरण) मोडतात. तर भंडारा, गोदिया व गडचिरोली हे तीन जिल्हे अल्प शहरीकरण गटात (20 टक्क्याहून कमी शहरीकरण) मोडतात.

नागपूर जिल्हयाचे शहरीकरणाचे प्रमाण हे महाराष्ट्राच्या व नागपूर विभागाच्या तत्सम प्रमाणापेक्षा जास्त आहे. कारण या जिल्हयाचा महाराष्ट्राच्या व नागपूर विभागाच्या तुलनेत आर्थिक व सामाजिक विकास जास्त झालेला आहे. मात्र इतर नागपूर विभागातील जिल्हयांचे शहरीकरणाचे प्रमाण हे महाराष्ट्राच्या व नागपूर विभागाच्या तत्सम प्रमाणापेक्षा बरेच कमी आहे. यावरून महाराष्ट्राशी व नागपूर विभागाशी तुलना करता या जिल्हयांचा आर्थिक व सामाजिक विकास कमी झालेला आहे. या जिल्हयांमध्ये फारसे औद्योगिकरण झालेले नाही. त्यामुळे बेकारीचे प्रमाण, दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे. पर्यायाने दरडोई उत्पन्न सुद्धा कमी आहे. त्यामुळे राहणीमान खालावलेले आहे. पर्यायाने शैक्षणिक, आरोग्यविषयक पायाभूत विकास कमी झाला आहे. म्हणजेच या जिल्हयातील आर्थिक – सामाजिक विकास कमी असल्यामुळे शहरीकरणाचे प्रमाण कमी आहे. थोडक्यात नागपूर विभागातील जिल्हयांच्या विकासामध्ये भिन्नता आहे व त्यामुळे शहरीकरणाच्या विविध पातळया आढळतात. महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 नुसार विदर्भातील जिल्हयांमध्ये मागासलेपणाचे प्रमाण खूप जास्त आहे. विदर्भातील नागपूर जिल्हा सोडल्यास अन्य कोणताही जिल्हा मानव विकासाच्या संदर्भात राज्य सरासरीच्या बरोबरीला वा त्यापेक्षा अधिक निर्देशांक असलेला नाही.[10] या मागासलेल्या विदर्भात नागपूर विभागाचा समावेश होतो. या विभागात नागपूर जिल्हा प्रगत आहे. तर बाकी सर्व जिल्हे अप्रगत आहेत.

**नागपूर विभागातील शैक्षणिक सुविधा :** सामाजिक प्रगतीकडे नेणारी 'शिक्षण' एक सक्षमीकरणाची प्रक्रिया आहे. मानवी भांडवलाच्या उभारणीमध्ये शिक्षणाची भूमिका महत्वाची आहे. शिक्षणामुळे जाणीवा रूंदावतात आणि व्यक्तीचा नागरी जीवनातला सहभाग वाढतो. त्यामुळे शहरीकरणाचा वेग वाढल्यास मदत होते. तसेच ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात शैक्षणिक सुविधा मोठया प्रमाणावर व गुणवत्तापूर्ण असतात. शहरी क्षेत्रात प्रामुख्याने विद्यापीठ, महाविद्यालय, अभियांत्रिकी, वैद्यकीय कॉलेज, इतर तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था इत्यादी शैक्षणिक संस्था केंद्रीत झालेल्या आहेत. एकूण शैक्षणिक प्रगतीमुळे ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात साक्षरतेचे प्रमाण सुद्धा जास्त असते. नागपूर विभागातील जिल्हानिहाय शैक्षणिक प्रसाराचा अभ्यास करण्यासाठी जिल्हयातील उपलब्ध प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण संख्यांची संख्या व त्यातील विद्यार्थी संख्या यांचे नागपूर विभागामध्ये प्रमाण तसेच साक्षरता दर हा निकष घेण्यात आला आहे.

**<u>जिल्हानिहाय शिक्षण सुविधा (वर्ष 2009 – 2010)</u>**

| जिल्हा | प्राथमिक शिक्षण संस्था (संख्या) | प्राथमिक शालेय विद्यार्थी (हजार) | माध्यमिक शिक्षण संस्था (संख्या) | माध्यमिक शालेय विद्यार्थी (हजार) | उच्च शिक्षण संस्था (संख्या) | उच्च शैक्षणिक विद्यार्थी (हजार) | साक्षरता दर (जनगणना 2011) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | एकूण | ग्रामीण | नागरी |
| भंडारा | 923 (10.6) | 108 (10.25) | 356 (13.45) | 202 (15.67) | 85 (11.27) | 28 (11.48) | 85. 14 | 83.41 | 92.20 |
| गोंदिया | 172 (12.78) | 143 (13.57) | 321 (12.13) | 186 (14.43) | 43 (5.70) | 15 (6.15) | 85. 41 | 84.01 | 92.17 |
| नागपूर | 2511 (27.38) | 400 (37.95) | 826 (31.22) | 438 (33.98) | 368 (48.81) | 113 (46.31) | 89. 52 | 82.81 | 92.61 |
| वर्धा | 1094 (11.93) | 105 (9.96) | 276 (10.43) | 144 (11.17) | 93 (12.33) | 46 (18.85) | 87. 22 | 84.36 | 93.14 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चंद्रपूर | 1839 (20.05) | 189 (17.93) | 546 (20.63) | 210 (16.29) | 108 (14.32) | 32 (13.11) | 81.35 | 76.77 | 89.73 |
| गडचिरोली | 1632 (17.80) | 109 (10.34) | 321 (12.13) | 109 (8.46) | 57 (7.56) | 10 (4.10) | 70.55 | 68.33 | 88.34 |
| नागपूर विभाग | 9171 (100.00) | 1054 (100.00) | 2646 (100.00) | 1289 (100.00) | 754 (100.00) | 244 (100.00) | | | |

**<u>आधार</u>** : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – भंडारा, गोंदिया, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, मार्च 2010,
**<u>टिप</u>** : प्रत्येक जिल्हयाचे नागपूर विभागामध्ये असलेले प्रमाण कंसामध्ये दर्शविले आहे.

नागपूर विभागातील शैक्षणिक स्थितीचा विचार करता वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, ग्रामीण क्षेत्रापेक्षा नागरी क्षेत्र शैक्षणिकदृष्टया सक्षम आहे. नागपूर विभागातील सर्व जिल्हयात ग्रामीण क्षेत्राच्या तुलनेत नागरी क्षेत्रात साक्षरता दर अधिक आहे. हा नागरी भागाचा एक फायदा आहे. नागपूर जिल्हयात प्राथमिक शिक्षण संस्था व त्यातील विद्यार्थी संख्या यांचे प्रमाण नागपूर विभागात अनुक्रमे 27.38 टक्के व 37.95 टक्के आहे. माध्यमिक शिक्षण संस्था व त्यातील विद्यार्थी संख्येचे प्रमाण अनुक्रमे 31.22 व 33.98 टक्के आहे आणि उच्च शिक्षण संस्था व त्यातील विद्यार्थी संख्या यांचे प्रमाण अनुक्रमे 48.81 टक्के व 46.31 टक्के आहे. हे प्रमाण नागपूर विभागात चंद्रपुर, वर्धा, भंडारा, गोंदिया व गडचिरोली जिल्हयापेक्षा अधिक आहे. शिवाय या जिल्हयाचा साक्षरता दर नागपूर विभागात सर्वाधीक म्हणजे 81.52 टक्के आहे. थोडक्यात नागपूर विभागात नागपूर जिल्हा शैक्षणिकदृष्टया विकसित आहे. तर बाकी जिल्हे नागपूर जिल्हयाच्या तुलनेत शैक्षणिकदृष्टया कमी सक्षम आहेत.

**नागपूर विभागातील आरोग्य सुविधा** : आरोग्य सेवा क्षेत्रात जागतिक स्तरावर ग्रामीण – शहरी अशी तफावत दिसून येते. तशीच ती महाराष्ट्रातही आहे. शहरी भागात आरोग्य सुविधा ग्रामीण भागापेक्षा जास्त असतात. त्यामुळे शहरी भागात ग्रामीण भागापेक्षा बालमृत्युचे प्रमाण व जननदराचे प्रमाण कमी असते. आरोग्य सेवेमध्ये रूग्णालये, दवाखाने, आरोग्य केंद्रे, कुटुंबकल्याण केंद्रे, डॉक्टर्स, नर्सेस, औषधांची निर्मिती व वितरण इत्यादी सर्व गोष्टी येतात. अशा आरोग्य विषयक अत्याधुनिक सेवा ज्या नागरी क्षेत्रात अधिक असतात, त्या नागरी भागाकडे लोक आकर्षिले जातात. जिल्हानिहाय आरोग्य सेवेचा अभ्यास करण्यासाठी जिल्हयातील एकूण रूग्णालये, दवाखाने व प्राथमिक आरोग्य केंद्रे यांचे नागपूर विभागामध्ये प्रमाण तसेच ग्रामीण व नागरी भागातील बालमृत्युदर हे निकष घेण्यात आले आहेत.

| जिल्हा | रूग्णालये (संख्या) | दवाखाने (संख्या) | प्राथमिक आरोग्य केंद्रे (संख्या) | नोंदणी केलेल्या जिवंत बालकांची जन्मसंख्या | | | बालमृत्युची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण |
| भंडारा | 11 (10.68) | 41 (13.27) | 33 (12.99) | 11515 | 10406 | 21921 | 246 (21.36) | 226 (21.72) | 472 (21.5) |
| गोंदिया | 14 (13.59) | 39 (12.62) | 39 (15.35) | 15090 | 5096 | 20186 | 427 (28.30) | 162 (31.79) | 589 (29.1) |
| नागपूर | 37 (35.92) | 164 (53.07) | 52 (20.47) | 15773 | 58695 | 74468 | 458 (29.04) | 75 (1.27) | 533 (7.15) |
| वर्धा | 11 (10.68) | 41 (13.27) | 27 (10.63) | 10350 | 5539 | 15889 | 63 (6.09) | 61 (11.01) | 124 (7.8) |
| चंद्रपूर | 17 (16.50) | 19 (6.15) | 58 (22.83) | 19571 | 18647 | 38218 | 11 (0.56) | 391 (20.97) | 402 (10.5) |
| गडचिरोली | 13 (12.62) | 05 (1.62) | 45 (17.72) | 14269 | 2496 | 16765 | 130 (9.11) | 0 (0.00) | 130 (7.7) |
| नागपूर विभाग | 103 (100.00) | 309 (100.00) | 254 (100.00) | | | | | | |

**<u>आधार</u>**: जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – भंडारा, गोंदिया, नागपूर, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा, मार्च 2010
**टिप** : 1) प्रत्येक जिल्हयातील रूग्णालये, दवाखाने व प्राथमिक आरोग्य केंद्रे यांचे नागपूर विभागामध्ये असलेले प्रमाण कंसामध्ये दर्शविलेले आहे.

खालील सुत्राचा अवलंब करून जिल्हानिहाय ग्रामीण, नागरी व एकूण बालमृत्युदर काढण्यात आला आहे. बालमृत्युदर कंसामध्ये दर्शविलेले आहे.

$$\text{बालमृत्युदर} = \frac{\text{दिलेल्या भौगोलिक क्षेत्रातील एक वर्षाखालील बालकांच्या मृत्युची संख्या}}{\text{त्याच क्षेत्रातील लोकसंख्येत जिवंत जन्मलेल्या बालकांची संख्या}} \times 1000$$

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, नागपूर विभागात नागपूर जिल्हयाची इतर जिल्हयांशी तुलना करता या जिल्हयात आरोग्य सेवेची उपलब्धता अधिक आहे. नागपूर विभागात 103 रूग्णालयाची संख्या आहे. यामध्ये नागपूर जिल्हयातील रूग्णालयाचे प्रमाण 35.92 टक्के आहे व बाकी भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयातील रूग्णालयाचे प्रमाण अनुक्रमे 10.68, 13.59, 10.68, 16.50 व 12.62 टक्के आहे. दवाखान्याच्या संख्येचा विचार करता नागपूर विभागातील 309 दवाखान्यापैकी 53.07 टक्के दवाखाने एकटया नागपूर जिल्हयात आहेत. बाकी उर्वरित सर्व जिल्हे मिळून दवाखान्याचे प्रमाण 46.93 टक्के आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राची नागपूर विभागामध्ये एकूण संख्या 254 आहे. यामध्ये नागपूर व चंद्रपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमाण अनुक्रमे 20.47 व 22.83 टक्के आहे. उर्वरित गडचिरोली, गोंदिया, भंडारा व वर्धा जिल्हयाचे प्रमाण अनुक्रमे 17.72, 12.99, 15.35 व 10.63 टक्के आहे.

ग्रामीण भागाच्या तुलनेत नागरी भागात आरोग्य सेवा अधिक उपलब्ध असल्यामुळे नागरी भागात बालमृत्युदर कमी असतो. नागपूर जिल्हयामध्ये ग्रामीण भागात 29.04 टक्के व शहरी भागात 1.27 टक्के बालमृत्युदर आहे. याचा अर्थ नागपूर जिल्हयाच्या नागरी भागात आरोग्य सेवा सक्षम आहेत. मात्र नागपूर विभागातील गडचिरोली जिल्हयाचा अपवाद सोडता गोंदिया, वर्धा, चंद्रपूर जिल्हयात ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात बालमृत्युदर अधिक आहे. भंडारा जिल्हयात नागरी व ग्रामीण भागातील बालमृत्युदर जवळपास सारखे आहे. यावरून या जिल्हयाचा नागरी भागात आरोग्य सेवा सक्षम नाहीत. तसेच प्रत्येक जिल्हयाच्या एकूण बालमृत्युदराचा विचार करता (नागरी व ग्रामीण मिळून) नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्हयात अनुक्रमे 7.15, 7.80, 10. 50, 7.75, 25.53 व 29.17 टक्के बालमृत्युदर आहे. यावरून नागपूर विभागामध्ये नागपूर जिल्हयाचे बालमृत्युदर इतर जिल्हयापेक्षा कमी आहे.

**निष्कर्ष** : नागपूर विभागात जिल्हयाच्या नागरी लोकसंख्येपैकी सर्वात जास्त लोकसंख्या नागपूर, चंद्रपूर, वर्धा भंडारा, गोंदिया व गडचिरोली या शहरात वास्तव्य करते. हे शहर जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण असल्यामुळे या ठिकाणी विविध कार्यालयाची संख्या वाढून कर्मचारी संख्या वाढली आहे. त्यामुळे या शहरात द्वितीय व तृतीय क्षेत्राचा विकास झालेला आहे. यावरून नागपूर विभागामध्ये लहान शहरापेक्षा मोठया शहराचा विकास अधिक झाला आहे. तसेच जिल्हानिहाय विचार करता नागपूर विभागात नागपूर जिल्हा इतर जिल्हयाच्या तुलनेत शैक्षणिक व आरोग्य विषयक सामाजिक विकासाच्या संदर्भात सक्षम आहे. म्हणून नागपूर जिल्हयातील उपलब्ध शैक्षणिक व आरोग्य विषयक सुविधा लोकांना आपल्याकडे आकर्षित करतात. त्यामुळे या जिल्हयातील शहरीकरणाचे प्रमाण इतर जिल्हयाच्या तुलनेत अधिक वेगाने वाढन्यास हातभार लागत आहे.

.......................................................................................

**संदर्भ** :–

1. मिश्र जयप्रकाश, (2004), 'जनांकिकी', साहित्य भवन पब्लिकेशन्स, पृ. 323.

2. मिश्रा एस. के. व पुरी पी. के., (2003), 'भारतीय अर्थव्यवस्था', पब्लिशिंग हाऊस, मुंबई, पृ. 113.

3. United Nations, Department of Economics & Social Offairs, Population Division, World Urbanization Prospects, the 2011 Revision. (esa.un.org)

4. Verma S. S., (1979), 'Urbanization Qohilkhand Plain (U. P.)', Yuva Bhoogolvid Patrica, Vo. II & III, P. 53-

5. पंडीत बापट सुरेखा, (2004), 'भारताचा भौगोलिक अभ्यास', श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर, पृ. 178.

6. मानव विकास अहवाल, महाराष्ट्र 2002, पृ. 23.

7. खतीब के. ए., (1998), 'नागरी भूगोल', मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे, पृ. 34.

8. घारपुरे विठ्ठल, (1999), 'लोकसंख्या भूगोल', पिंपळापूरे ॲन्ड क. पब्लिशर्स, नागपूर, पृ. 66.

9.Census of India, 2011 (Censusindia.gov.in)

10. मानव विकास अहवाल, महाराष्ट्र 2002, पृ. 117.

.......................................................................................

# राजकारणातील महिलांच्या समस्या

**डॉ. सुषमा बागेश्वर, प्रा. वामन खोब्रागडे,** संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा

प्राचीन काळापासून आजपावेतो समाजव्यवस्थेत स्त्री स्वातंत्र्य व स्त्री नेतृत्वापुढे पुरुषांनी सदैव अडथळेच निर्माण केले आहेत. महिलांची कार्यक्षमता, बुद्धिमत्ता व नेतृत्व कौशल्याची जाणीव असूनही पुरुषांनी त्यांच्या राजकीय सहभागाविषयी नेहमीच विरोध केलेला आहे. पुरुषांची ही बुरसटलेली मनोवृत्तीच स्त्री नेतृत्वापुढचे खरे आव्हान आहे. स्त्रीवादी चळवळीचे अधिष्ठान समाजवादी, साम्यवादी किंवा उदारमतवादी असो त्यांना 'एकसमान राजकीय कार्यक्रम' मान्य करावा लागेल. सक्षमीकरणासाठी नेतृत्वाच्या पारंपारिक चौकटीतून बाहेर पडावे लागेल. त्यांना प्रथम प्रस्थापित संरचनेविरुद्ध बंड पुकारावे लागेल. 'स्त्री आरक्षणचा लढा ही भीक नसून तो त्यांचा मूलभूत हक्क आहे' अशा जाणीवा समस्त स्त्री समाजात निर्माण कराव्या लागतील.

राजकारण ही समस्या सोडविण्याची एक प्रक्रिया आहे. समाजात नाना प्रकारच्या समस्या निर्माण होतात. प्रत्येक काळात आणि युगात समस्यांचे स्वरूप वेगवेगळे असते. त्या सर्व समस्या सोडविण्यासाठी होणाऱ्या क्रियापकालांना राजकारण असे म्हण्तात. राजकारणचा हा अर्थ लक्षात घेतला की, मग राजकारणचा स्त्रियांशी कसा घनिष्ट संबंध असतो याची कल्पना येते. स्त्री हीच समाजाची आद्यनिर्मिती आहे. भारतात देवी पूजनाची परंपरा ही बाब स्पष्ट करते. मातृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्री ही कबिल्याची मुखिया होती. आजसुद्धा काही कबिल्यामध्ये स्त्रियांचे शासन आहे. उत्खननात प्राप्त झालेल्या स्त्री मूर्तीमध्ये बलशाली राणी–महाराणी आणि शासिका स्त्रीचे दर्शन होते. अज्ञेया? अनंता? अक्ष्या, अजन्या अशा अनेक संबोधनांनी संबोधल्या जाणाऱ्या स्त्रियांचा पुराण काळापासून राजकारणाशी संबंध दिसून येतो. ऐतिहासिक काळाचा विचार केला तर स्त्रिया ह्या राजनितीशी दुहेरी संबंधित होत्या. स्त्रियांमुळे राजकारण घडले. स्त्रियांनी राजकारण केले. पद्मिनीमुळे राजकारण घडले. संयोगितेमुळे भारतीय राजकारणाला अप्रिय वळण लागले. मुस्लिम सत्ताधिशांच्या काळात नूरजहांसारख्यांनी प्रत्यक्ष सत्तानिष्ठ–राजनिष्ठ राजनीतीत सहभाग घेतला. पुराण काळात व ऐतिहासिक काळात राजकारणाला पावित्र्याचे, न्यायाचे, नीतीमत्तेचे अनुबंध होते. पुराण काळ व ऐतिहासिक काळाचे हे सगळे अनुबंध आधुनिक राजकारणाने बदलवून टाकले.

राजकीय क्षेत्रात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने अधिकार असावेत. स्त्री पुरुषात सर्वच बाबतीत समानता असावी व स्त्री पुरुषांना एकाच प्रकारचे शिक्षण देण्यात यावे हे प्लेटोने त्याची आदर्श राज्याची कल्पना स्पष्ट करताना सांगितले होते. सुमारे अडीच हजार वर्षापूर्वी पाश्चिमात्त्य जगात मांडलेला स्त्री–पुरुष समानतेचा विचार प्लेटो ज्या ग्रीसमधील अथेन्स राज्याचा नागरिक होता त्या अथेन्सचा नगरराज्यातच व्यावसायिक पातळीवर त्याच्यानंतरही कितीतरी शतके अमलात येऊ शकला नाही. प्लेटोचा शिष्य असलेल्या ॲरिस्टाटलने तर स्त्रियांना राजकारणाचेच काय पण नागरीकत्वाचेही अधिकार असू शकत नाही असे म्हटले होते. स्त्रियांना राजकारणत पुरुषाच्या बरोबरीचे स्थान द्यायला वैचारिक दृष्टीने प्रगत अशा ग्रीक देशातील लोकही तयार नव्हते. मग त्यासाठी ते कोणतेही कारणे देवोत. प्लेटोच्या स्त्री–पुरुष समानतेचे व स्त्रीमुक्तीचे समर्थन पुढे अनेक शतके केवळ स्वप्नरंजनच ठरले ही वस्तुस्थिती होती.

बाराव्या शतकात स्त्रियांची परिस्थिती अतिशय दयनीय होती. स्त्री परमार्थ मार्गातील धोंड मोक्षप्राप्तीतील अडसर असे मानले जात होते. पती म्हणजेच तिचे दैवत पतीची सेवा केल्याने मोक्ष प्राप्त होतो असे विचार रूजविले गेले होते. भारतासारख्या प्राचीन संस्कृतीच्या देशातही समाज पुरुष प्रधानच होता. त्यातच 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' सारख्या शास्त्रवचनांनी तसेच 'ढोल गंवार शूद्र पशू नारी, ये सब ताडन के अधिकारी' यासारख्या मानसिकतेने स्त्री पुरुषात विषमतेची एक फार मोठी दरी निर्माण झालेली होती. भारतात 17 व्या व 18 व्या शतकात राजकारणातील स्त्रियांचा सहभाग नगण्यच होता. राजघराण्यातील काही मोजक्या स्त्रिया राज्यव्यवहाराच्या बाबतीत कर्तबगारी दाखवीत असत.

भारतामध्ये सामाजिक पुनर्जागरण आणि राजकीय चेतनाचा विकास सोबत सोबत झाला आहे. सामाजिक पुर्नजागरण आणि स्त्रीमुक्ती संघर्षाचा प्रारंभ 19 व्या शतकात झाला आहे. बंगालचे ब्राम्हो समाजाचे संस्थापक राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, म. ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ.

समाजसुधारकांनी स्त्रियांच्या उत्थानाच्या कार्याला प्रमुख स्थान दिले. 1857 मध्ये भारतात पहिले मोठे स्वातंत्र्य संग्राम आणि 1885 मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेसोबतच सामाजिक सुधारणा आणि राजकीय चेतना निर्माण झाली. स्त्रियांमध्ये राजकीय जागृती निर्माण करण्यासाठी सामाजिक संस्था व स्त्री संघटक याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. 1917 हे वर्ष भारतीय स्त्रीच्या वर्तमान राजकीय भूमिकेत पहिले महत्त्वपूर्ण वर्ष होते. श्रीमती बेझेंटच्या अध्यक्षतेत कॉंग्रेसने एक प्रस्ताव पास करून स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे मताधिकाराचा अधिकार द्यावा ही मागणी 1926 मध्ये भारत सरकारने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले. स्त्रियांना प्रांतीय विधानसभाची निवडणूक लढण्याचा अधिकार दिला.

स्त्रियांचा राजकारणातील सहभाग जरी वाढलेला असला तरी राजकीय प्रक्रियांवर त्या पाहिजे तसा प्रभाव पाडू शकला नाही. राजकीय पक्ष स्त्रियांना पुरुषाचे शेपूटच मानतो. राजकीय पक्षाचा पाठिंबा, निवडणुका लढविण्याचे प्रचार तंत्र, उमेदवाराचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी ह्या घटकावर स्त्री उमेदवाराचे यश अवलंबून असते. जगात सर्वत्र राजकीय सत्तेत स्त्रियांना कमी प्रतिनिधीत्व आहे. राजकीय प्रभावाखाली आवश्यक समजले जाणारे सर्व निकष एक जात पुरुषी आहेत. परिणमी राजकारणातल्या स्त्रियांकडे बघताना त्या चुकीच्या क्षेत्रात आलेल्या वा उपऱ्या म्हणून बघितले. जसे – पुरुषाच्या तुलनेत खूप कमी स्त्रिया निवडणूक लढवतात. स्त्रियांच्या राजकीय सहभाला आरक्षणाच्या कायद्यामुळे मोठी चालना मिळाली. 1992 मध्ये झालेल्या 73 व्या घटना दुरुस्तीत व त्या अंतर्गत स्त्रियांना स्थनिक स्वराज्य संरक्षण मिळाले तरी एक तृतीयांश असल्यामुळे हा विषय देशपातळीवर लक्ष वेधून घेणारा ठरला. या कायद्यामुळे आता आठ लाखाहून अधिक स्त्रिया राजकारणात येणार होत्या. महाराष्ट्रात स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थेत 33 टक्के जागा राखीव असल्यामुळे बहुतांश महिलांना राजकारणात येण्याची संधीच उपलब्ध झाली. त्यामुळे आता ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या तिन्ही संस्थेत स्त्रियांसाठी 33 टक्के वरून 50 टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद केली. पंचायत राज संस्थामधील नेतृत्वाची जबाबदारी सांभाळण्यासाठी स्त्रिया आत्मविश्वासाने पुढे येत असल्या तरी पंचायत राज संस्थात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने महत्त्व लाभले नाही. ज्या स्त्रियांना राजकीय पाठबळ किंवा घराण्याचे पाठबळ लाभलेले असते. अशाच स्त्रिया राजकारणात उतरत असतात. या स्त्रियांचे पती, वडील, भाऊ किंवा अन्य जवळचा नातेवाईक हा राजकारणातील प्रस्थापित नेता असतो. आरक्षणाच्या तरतुदीमुळे या पुरुष नेत्याला निवडणूक लढविता येत नाही. त्यामुळे त्याला नाईलाजाने आपल्या कुटुंबातील एखाद्या स्त्रीला पुढे केलेले असते. या नेत्याच्या पाठबळावर स्त्री उमेदवार निवडणुकीत उतरण्याचे धाडस करतात. पंचायत राज संस्थामधील महिला सदस्यांची सुरुवात काहीशी अडखळती होणे अपेक्षितच होती. भारतीय स्त्रिया, त्यातही ग्रामीण समाजातील व बहुजन समाजातील स्त्रिया वर्षानुवर्षे घराच्या चार भिंतीच्या आतच अडकून पडल्या होत्या. 'चूल आणि मूल' या पलीकडे स्त्रियांचे कार्यक्षेत्र नाही असा भारतीय समाजाचा दृष्टिकोन होता. त्यामुळे भारतीय स्त्रियांना सार्वजनिक जीवनाचा कसलाही पूर्वानुभव नव्हता. ग्रामीण समाजात शिक्षणाचा प्रसारही बऱ्याच उशीरा आणि अत्यंत मंद गतीने झाला.

पंचायत राज संस्थांमध्ये महिला सदस्यांनी अल्पावधीत असे कर्तृत्व सिद्ध केल्यामुळे पुरुषी अहंकाराला धक्का बसणे स्वाभाविक आहे अशा महिला सदस्यांची संख्या आज जरी मर्यादित असली तरी भविष्यकाळात त्यामध्ये निश्चितच वाढ होईल त्यामुळे आपल्या मक्तेदारीला धक्का बसेल ही भीती पुरुष नेत्यांना भेडसावत असते. आज पंचायत संख्यामधील काही जागा केवळ आरक्षणाच्या तरतुदीमुळे महिलांकडे गेल्या असल्या तरी त्यामुळे मागे स्वकर्तृत्वाच्या बळावरही या जागांवर आपला हक्क सांगू लागतील. त्यामुळे त्यांच्या मार्गात अडसर निर्माण करण्याचे प्रयत्न पुरुषी नेत्यांकडून केले जातात. त्यामुळे अशा स्त्रिया अधिकारपदावर आल्यास त्यांना पुरेसे सहकार्य न करणे, त्यांना केवळ विरोधासाठी विरोध करणे. निरनिराळ्या मार्गाचा अवलंब करून त्यांच्यापुढे अडचणी उभ्या करणे, त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणून त्यांना पदावरून घालवून देण्याचा प्रयत्न करणे अशा मार्गाचा अवलंब करण्यासही पुरुष नेतेमंडळी मागेपुढे पाहत नाहीत.

प्राचीन काळापासून आजपावेतो समाजव्यवस्थेत स्त्री स्वातंत्र्य व स्त्री नेतृत्वापुढे पुरुषांनी सदैव अडथळेच निर्माण केले आहेत. महिलांची कार्यक्षमता, बुद्धिमत्ता व नेतृत्व कौशल्याची जाणीव असूनही पुरुषांनी त्यांच्या राजकीय सहभागाविषयी नेहमीच विरोध केलेला आहे. पुरुषांची ही बुरसटलेली मनोवृत्तीच स्त्री नेतृत्वापुढेच खरे आव्हान आहे.

स्त्रीवादी चळवळीचे अधिष्ठान समाजवादी, साम्यवादी किंवा उदारमतवादी असो त्यांना 'एकसमान

राजकीय कार्यक्रम' मान्य करावा लागेल. सक्षमीकरणासाठी नेतृत्वाच्या पारंपारिक चौकटीतून बाहेर पडावे लागेल. त्यांना प्रथम प्रस्थापित संरचनेविरुद्ध बंड पुकारावे लागेल. 'स्त्री आरक्षणचा लढा ही भीक नसून ती त्यांचा मूलभूत हक्क आहे' अशा जाणीवा समस्त स्त्री समाजात निर्माण कराव्या लागतील.

स्त्री नेतृत्वाला त्यांच्या सामाजिक व राजकीय चळवळींना मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी लोकोपयोगी कामे करावी लागतील त्यासाठी स्वयंसिद्ध व कणखर नेतृत्व उभे करावे लागले. महिला सक्षम होऊन राजकीय नेतृत्वासाठी प्रखर संघर्ष करीत आहेत. तेव्हा पुरुषांनी त्यांचे पंख छाटण्याचा प्रयत्न करू नये यातच त्यांचे राजकीय शहाणपण सिद्ध होणार आहे.

एकूणच भारतीय समाजाला कणखर, स्वच्छ, धीरोदत्त स्त्री नेतृत्वाची अपेक्षा आहे. भारतीय समाज नवीन स्त्री आरक्षणाला उचलून धरेल अशी अपेक्षा आहे.

........................................................................................

संदर्भ सूची


1. डॉ. रायपूरकर वसंत, 'स्त्री नेतृत्वापुढील आव्हाने', लेख, विचारवेध
2. गीता साने, 'भारतीय स्त्री जीवन', मौज प्रकाशन मुंबई 1997,
3. भारतातील महिला विकासाची वाटचाल, ज. आपटे
4. महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, प्रा. व्ही.बी. पाटील, के. सागर पब्लिकेशन
5. शरयु अनंतराव, उमा वडसे, 'भारतातील समाजातील स्त्रियांचे स्थान', पॉप्युलर प्रकाशन, पं. मालवीय मार्ग ताडदेव मुंबई
6. विजय चोरमोरे 'स्त्री सत्तेची पहाट', एक्स्प्रेस पब्लिशिंग हाऊस कोल्हापूर


-----------------------------------------------

# पर्यावरण प्रदुषण : एक ज्वलंत जागतिक समस्या

**प्रा. रामु उईके,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, शरदचंद्र कला–वाणिज्य महाविद्यालय, बुटीबोरी.

पर्यावरण प्रदुषणाची अत्यंत ज्वलंत समस्या संपूर्ण जगामध्ये निर्माण झाली आहे. याला भारत देखील अपवाद नाही. आज प्रदुषणाची समस्या ही विकासाच्या प्रक्रियेमुळे निर्माण झाली आहे. पूर्वी पर्यावरण प्रदुषणाची समस्या नव्हती. अनियंत्रित लोकसंख्या वाढ, औद्योगिकरणाचा परिणाम जमीन, जंगल, नदी, हवा पाणी व मानव यांच्यातील समतोल केव्हा व कसा ढासळला हे मानवाच्या लक्षातही आले नाही.

**प्रस्तावना :–** जगामध्ये पर्यावरणाच्या अध्ययनास फार महत्व प्राप्त झाले आहे. पर्यावरण हा शब्द जगातील सर्वांच्या जिव्हाळयांचा शब्द झाला आहे. पर्यावरणाचे अध्ययन भूगोल विषयात केले जात होते आणि आहे. परंतु अलीकडे वैद्यकीयशास्त्रात पर्यावरणीय आरोग्य आणि अभियांत्रिकी शाखेत पर्यावरणीय अभियांत्रिकी, औद्योगिक क्षेत्रात पर्यावरणीय अध्ययन तर सद्याच्या स्थितीत आर्थिक पर्यावरण, सामाजिक पर्यावरण इत्यादी शाखांव्दारे पर्यावरणाचे अध्ययन केले जाते. अशाप्रकारे सद्या पर्यावरण ही संज्ञा बहुचर्चित झाली असून तो संशोधनाचा आणि चिंतेचा प्रमुख विषय बनला आहे.

**पर्यावरणाची संकल्पनाः–** सर्वसाधारणपणे पर्यावरण म्हणजे सभोवतालची परिस्थिती असली तरी उत्पत्तीशास्त्राच्या दृष्टिने पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील विशिष्ट भागाशी निगडीत असलेली सभोवतालची परिस्थिती होय. Environ म्हणजे to surround या मूळ फ्रेंच भाषेतील शब्दापासून "Environment" असा इंग्रजी शब्द प्रचलित झाला आहे. यालाच मराठी भाषेत ''पर्यावरण'' असे म्हणतात. संपूर्ण पृथ्वी ही एक परिसंस्था आहे. यामध्ये मानव, वनस्पती, प्राणी, सूक्ष्म जीव इ. कार्यरत असतात. निसर्गशक्तीचा, मानवनिर्मित शक्तींचा परिणाम जीवसृष्टीवर सतत होत असतो. अशा विविध क्रिया–प्रक्रियांतून एखादया घटकांत बदल झाल्यास संपूर्ण परिसंस्थेवर त्याचे विपरित परिणाम होतात आणि जीवघेण्या समस्या निर्माण होतात.

**प्रदुषणाची संकल्पना :–** पर्यावरण प्रदुषणाची अत्यंत ज्वलंत समस्या संपूर्ण जगामध्ये निर्माण झाली आहे. याला भारत देखील अपवाद नाही. आज प्रदुषणाची समस्या ही विकासाच्या प्रक्रियेमुळे निर्माण झाली आहे. पूर्वी पर्यावरण प्रदुषणाची समस्या नव्हती. अनियंत्रित लोकसंख्या वाढ, औद्योगिकरणाचा परिणाम, जमीन,

जंगल, नदी, हवा, पाणी व मानव यांच्यातील समतोल केव्हा व कसा ढासळला हे मानवाच्या लक्षातही आले नाही.

अतिवृष्टी, अवर्षण, वादळे, वणवे, त्सूनामी इत्यादी घडामोडींमुळे देखील हवेचे प्रदुषण होते. याला नैसर्गिक प्रदुषण असे म्हटले जाते. यावर निसर्गतःच उपाययोजना होत असतात. मानवाच्या अतिलोभापायी मोठया प्रमाणात पर्यावरण प्रदुषण होत आहे. अविचाराने मोठया प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्तीची नासधुस केली जाते. यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले. पर्यावरणाच्या अनुषंगाने ज्या परिसंस्था निर्माण झाल्या आहेत, त्यांचेही संतुलन बिघडते आणि पर्यावरण दुषित केले जाते. ज्या घटकांव्दारा पर्यावरण दुषित केले जाते त्यांना दुषितके असे म्हणतात. दुषितकांव्दारा जेव्हा पर्यावरण दुषित होऊन मानव व पर्यावरणाचा तोल ढासळतो. तेव्हा त्या क्रियेला प्रदुषण असे म्हणतात.

मानव आणि त्यांच्या सभोवती असणारे पर्यावरण यांचे अतुट नाते आहे. मानव आणि सर्व सजीव सृष्टी पर्यावरणाशी या ना त्या नात्याने घनिष्ठ संबंधित झालेली आहेत. निसर्गातील हवा, पाणी, वृक्ष—वनस्पती, जमिन, पशुपक्षी आणि मानवप्राणी यांच्या परस्पर नात्यात जेव्हा नैसर्गिक समतोल असतो, तेव्हा पर्यावरण संतुलित आहे असे म्हटले जाते. नैसर्गिक पर्यावरण हा सजीवांसाठी अनमोल ठेवा असतो. या ठेव्याच्या वारसां हक्कांचे संरक्षण, जतन करणे ही मानवी पिढयांची जबाबदारी आहे. या जबाबदारीत मानवाच्या हस्तक्षेपांमुळे तफावत निर्माण होते आणि पर्यावरणाचे संतुलन बिघडते.

**प्रदुषणाची व्याख्या :—** निसर्गाने आपल्याला निर्मळ आकाश दिले, सुंदर प्रकाश दिला, कोमल चंद्र दिला, विलनोभनिय वनस्पती दिली,खळखळते पाणी दिले, मात्र त्यात आपण विष कालवले असा प्रदुषणाचा साधा, सोपा आणि सरळ अर्थ आहे. प्रदुषणाच्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

1) ''हवा, पाणी आणि जमिन यांच्या भौतिक, जैविक किंवा रासायनिक द्रव्यांमध्ये झालेल्या ज्या अनिष्ठ परिवर्तनामुळे जीवमात्राचे आरोग्य सुरक्षा आणि कल्याण यांना हानी पोहोचते त्याला प्रदुषण म्हणतात.''

2) ''पर्यावरणातील काही घटकांच्या संचयामुळे मानवी जीवनांवर अपायकारक परिणाम होतो यालाच प्रदुषण असे म्हणतात.''

3) ''मानवाच्या हव्यासापोटी, आर्थिक, सांस्कृतिक उन्नतीसाठी साधनसंपत्तीचा वारेमाप उपयोग घेण्याच्या प्रयत्नात पर्यावरणाचा दर्जा खालावतो यालाच प्रदुषण असे म्हणतात.''

4) ''विश्वकोषानुसार :— मानवी जीवनाच्या दृष्टिकोनातून नैसर्गिक घटकांमध्ये होणारा अपायकारक बदल म्हणजे प्रदुषण होय.''

5) संयुक्त संस्थांच्या राष्ट्राध्यक्षांच्या वैज्ञानिक सल्लागार समितीनुसार '' मानवी क्रियांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने परिसरातील प्राकृतिक, रासायनिक व जैविक घटकांमध्ये मोठया प्रमाणावर होणारे अनिष्ठ बदल म्हणजे प्रदुषण होय.''

**पर्यावरणातील प्रदुषके :—** ज्या प्रकारे वस्तू किंवा त्यांच्या अस्तित्वामुळे पर्यावरणाचे अधःपतन होते. अशांना प्रदुषके असे म्हणतात. प्रदुषके ही नैसर्गिक व मानवनिर्मित असतात. नैसर्गिक प्रदुषके ही निसर्ग नियमानुसार कालातंराने नाहीशी होतात पण मानवनिर्मित प्रदुषके ही नाहीशी होत नसून ती घातक असतात. प्रदुषकाचे दृष्य आणि अदृष्य असे दोन प्रकार पडतात. दृष्य प्रदुषकांमध्ये धूर, वायू, धुळ, दुषित पाणी, मैलमिश्रित पाणी, कचरा, शेण, मानवी वापराच्या सडलेल्या वस्तू इत्यांदींचा समावेश होतो तर अदृष्य प्रदुषकांत विविध प्रकारचे जीवाणू तसेच पाण्यात, जमिनीत मुरलेली व विरघळलेली रसायने इत्यांदीचा समावेश होतो. तसेच स्वरूपानुसार प्रदुषकांचे खालील सहा प्रकार आहेत.

**1) घनः**—औद्योगिक कचरा, अस्वेस्टॉस, पारा, शिसे.

**2) द्रव** :—समुद्र, पाण्यातील गळलेला पेट्रोलियम, सांडलेले अमोनिया क्लोराईड वगैरे.

**3) वायू** :—क्लोरो—फ्लुरोकार्बन, कार्बनडाय ऑक्साईड, सल्फरडाय ऑक्साईड वगैरे.

**4) नैसर्गिक** :— विविध वायू, द्रव व घन प्रदुषके

**5) सांस्कृतिक :—** प्रचंड लोकसंख्या, गरिबी, गुन्हेगारी, श्रीमंती, मागासलेपणा.

**6) सजीव प्रदुषके** :— टोलधाड, तांबेरा, बुरशी, मावा इत्यादी.

**प्रदुषण समस्येचे स्वरूप** :— मानवाला जीवंत राहण्यासाठी अन्न, पाणी आणि हवा हया गोष्टी आवश्यक आहेत. म्हणून यांना मानवी जीवनाचे तीन प्रमुख आधार संबोधिले जाते. या तिन्ही आधारांना प्रदुषणाने ग्रासले आहे. उदा. पिकांवर फवारणी करण्यासाठी, मलेरिया पसरविणाऱ्या डासांचा नायनाट करण्यासाठी विविध प्रकारची रासायनिक द्रव्ये वापरली जातात. या रसायनामध्ये अत्यंत घातक पदार्थ वापरले जातात. हे हवा, पाणी यात मिसळतात. त्याचा रोगप्रतिकार शक्तीवर विपरीत परिणाम होतो.

शरीराच्या रोगप्रतिबंधक नैसर्गिक शक्तींवर आघात करणारे ताण–तणाव, निष्कृष्ट आहार, हवेमध्ये तरंगणारे घटक, कारखान्यामध्ये वापरली जाणारी रसायने इत्यादी कारणांमुळे N.H. L. ची सुरूवात होते. नॉन–हॉजकिन्स लिम्फोमा (NHL) वाढत जातो आणि नैसर्गिक वातावरणात विष कालविल्या जाते.

**प्रदुषणाचे प्रकार** :– पर्यावरण प्रदुषण हे सार्वत्रिक स्वरूपाचे आहे. विश्वातील असा एकही क्षेत्र नाही की जेथे प्रदुषण नाही प्रदुषणाचे विविध प्रकारे वर्गीकरण केले जाते. परंतु पर्यावरणात्मक प्रदुषणाने सर्वात महत्वाचे आणि सर्वसमावेशक वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहेत.

**1) वायू प्रदुषण** :– पृथ्वी भोवती पसरलेल्या वातावरणात विविध वायूंचे मिश्रण आहे. साधारणपणे नायट्रोजन, ऑक्सीजन, कार्बनडाय–ऑक्साईड,पाण्याची वाफ व इतर काही अल्प प्रमाणातील वायूंचे विशिष्ट प्रमाणात अस्तित्व असते. सजीवांसाठी हवेतील हे वायू घटक अत्यावश्यक असतात. म्हणूनच जीवसृष्टीचे संरक्षणक्षेत्र असाच वातावरणाचा उल्लेख करता येईल. परंतु नैसर्गिक कारणांमुळे व मानवी हस्तक्षेपामुळे वायू प्रदुषण सतत वाढत आहे. नैसर्गिक कारणांमुळे निर्माण झालेला वायू प्रदुषणाचे परिणाम त्या भागातच जाणवतात कालांतराने ते नाहीसे देखील होतात. परंतु मानवनिर्मित हया प्रदुषणाचे परिणाम हे सर्वदूर पसरत जातात आणि त्याचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत जातात. वायू प्रदुषणाची समस्या ही प्राचीन काळापासून आहे. इ. सन. 1306 साली इंग्लंडमध्ये लंडन या शहरात कोळसा वापरावर बंदी घातली आहे. वाहने आणि औद्योगिक उत्पादने यामुळे होणारे वायू प्रदुषण हे साधारणतः शहरे आणि औद्योगिक भागातील लोकांच्या आरोग्यावर परिणाम करते तर ग्रामीण भागातील वायू प्रदुषण हे बऱ्याच प्रमाणात स्त्रियांवर परिणाम करीत असते. कारण घरगुती वापरासाठी लाकुडफाटा, शेण्याच्या गोवऱ्या जळतांना जो धूर निर्माण होतो त्याचा प्रत्यक्ष संबध हा महिलांशी येत असतो.

पर्यावरण वैज्ञानिकांच्या मते, '' अमेरिकेच्या लॉस एंजिल्स शहराच्या संदर्भात म्हटले जाते की, तेथे इतक्या मोटारी चालतात की, त्याच्या धुरापासून कार्बनचा वातावरणात एक दाट पडदा निर्माण झाला म्हणून तेथे आकाश दिसत नाही. तसेच औद्योगिकीकरणामुळे वातावरणाच्या भोवती असणाऱ्या ''ओझोन'' च्या पडदयाला छिद्रे पडल आहेत. ग्रीन हाऊसचा प्रभाव वाढत आहे. हवा आणि पाणी दुषित होत आहे. प्रदुषण संपूर्ण वातावरणात पसरते त्यामुळे मानवी जीवनाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे.

**2) जलप्रदुषण** :– मानवाच्या मूलभूत गरजामध्ये पाण्याचा उल्लेख केला जातो. जल म्हणजे जीवन, मानवी जीवनात पाण्याला अत्यंत महत्व आहे. मानवास केवळ पिण्यासाठीच नाही तर स्वच्छता, जलसिंचन अनेक औद्योगिक प्रक्रिया इत्यादीसाठी पाण्यांची नितांत आवश्यकता आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार आणि उद्योगधंद्यानुसार गोडया पाण्याची मागणी वाढत आहे. भूपृष्ठावरील उपलब्ध असलेल्या पाण्याची टक्केवारी काढली असता असे दिसून येते की, एकूण पाण्यापैकी 97.2 टक्के पाणी महासागरात आहे. फक्त 2.8 टक्के पाणी गोड किंवा स्वच्छ आहे. ज्या पाण्यात कोणताही बाहय अपायकारक घटक मिसळलेला नसतो, त्या पाण्याला शुध्द पाणी म्हटले जाते. ते पाणी वापरासाठी उपयुक्त आणि सुरक्षित असते. ज्या पाण्यात सूक्ष्म जीवाणू किंवा मृत जैविक घटक मिसळलेले असतात. त्या पाण्याला दुषित पाणी म्हणतात. असे पाणी वापरण्यासाठी अयोग्य असते.

जगातील जवळपास 28 टक्के गावे आणि शहरे काठावर समुद्र, तळी, सरोवरे इत्यादी जलसाठयाच्या सान्निध्यात वसलेले आहेत. माणसांना पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा करण्यापासून तर त्यांनी केलेली सर्व प्रकारची घाण वाहून नेण्यापर्यंतची असंख्य कामे या पदांना करावी लागतात. तसेच अनेक प्रकारचे कारखाने आणि गिरण्या त्यांना नको असलेली निरूपयोगी पदार्थ व गाळ नद्यांच्या पात्रात सोडत असतात. अशाप्रकारे पाण्याचे प्रदुषण होत असते.

जलप्रदुषणाची प्रक्रिया ही नैसर्गिक आणि मानवनिर्मित अशा दोन्ही प्रकारची आहे. नैसर्गिक रित्या होणारे जलप्रदुषण कालांतराने नाहीशी होते पण मानवनिर्मित प्रदुषणाने इतके प्रचंड आहे की, त्यामुळे प्रचंड अशी आरोग्य विषयक समस्या निर्माण होत आहे. औद्योगिक सांडपाणी, रसायने,टाकाऊ पदार्थ, शहरी मैला व सांडपाणी, किटकनाशके व रासायनिक खते, तेलगळती, किरणोत्सारी कचरा, औष्णिक विद्युत केंद्रे आणि धार्मिक विधी अशा विविध मानवनिर्मित कारणांने जलप्रदुषण जलद गतीने होत आहे.

**3) ध्वनीप्रदुषण** :– ध्वनी प्रदुषण ही मानवनिर्मित समस्या आहे. पूर्वी ध्वनी प्रदुषणाची समस्या नव्हती. परंतु आधुनिक काळात ध्वनी प्रदुषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

मानवाची कर्णेद्रिये विविध क्षमतेपर्यत ध्वनीचा आघात सहन करू शकतात. ज्या तीव्र आवाजाने

मानवाच्या शारीरिक, मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होते आणि जो कर्कश आवाज मानवी श्रवणाच्या सहनशीलतेच्या पलीकडे जातो.

तसेच पर्यावरणात कर्णेंद्रियांच्या क्षमतेपेक्षा मोठा ध्वनी किंवा गोंगाटा निर्माण होतो. त्याला ध्वनी प्रदुषण असे म्हणतात. अशाप्रकारे नकोसा वाटणारा आवाज म्हणजे गोंगाट, त्यात नादमाधुर्य नसते तो कर्णकठोर व विसंवादी आवाज असतो. गोंगाट त्रासदायक, संतापजनक, दुःखजनक, निद्रानाशक असतो. गोंगाटामुळे चित्त विचलित होते. एकाग्रता भंग पावते व कार्यात अडथळा येतो. मोठया आवाजातील मानवी संभाषण, सांस्कृतिक कार्यक्रमातील वाढवलेला आवाज, टेप रेकॉर्ड, नाचण्याचे कार्यक्रम, वाहनांचा आवाज,भोंगे, कारखान्याचा आवाज, रेल्वेगाडयांचा सतत आवाज, फेरीवाले,छापखाने, मिरवणुकी, स्वयंपाक घरातील आवाज, जेट विमाने, बॉम्बस्फोट व सुरूंगस्फोटाव्दारे निर्माण होणाऱ्या तीव्र आवाज लहरी इत्यादी.

**4) मृदा प्रदुषण :–** भूमी ही नैसर्गिक साधन संपदा आहे. जमिनीचे क्षेत्र मर्यादीत असल्यामुळे तिचा कोणत्याही प्रकारे केला जाणारा गैरवापर हा फार मोठा समस्या निर्माण करू शकतो. जमिनीच्या निर्मितीत हजारो वर्षाचा कालावधी लागतो. त्यामुळे जमिनीचे सरंक्षण करणे ही काळाची गरज आहे.

मृदा हा पर्यावरणाचा एक महत्वाचा घटक आहे. हा घटक सुरक्षित राहील्यास पर्यावरणातील सर्व गोष्टी सुरळीत होऊ शकतात. मृदेवर अनेक गोष्टी अवलंबून आहेत. जसे निवास व्यवस्था, अन्नधान्य उत्पादन, पाणी, संचय, वृक्षसंपदा, पर्यावरण संतुलन इत्यादी भूकंप, ज्वालामुखी, पूर, वारा या नैसर्गिक घडामोडींमुळे जमिनीमध्ये फार मोठे बदल घडून येतात.

तसेच मानवनिर्मित घडामोडीमुळे देखील मृदेचे प्रदुषण झपाटयाने होत आहे. जसे वाढती लोकसंख्या, नागरीकरण, औद्योगिकरणासाठी होत असलेली वृक्षतोड यामुळे जमिनीचे संतुलन बिघडते. शेतीत वापरली जाणारी रासायनिक खते व किटकनाशके यामुळे दिवसेंदिवस जमिनीच्या प्रदुषणाची समस्या गंभीर रूप धारण करत आहे. याशिवाय कारखान्यातील टाकाऊ पदार्थ, नागरी घन कचरा जमिनीवर टाकण्यात येणारा पारा, शिसे, कॅडामियम, क्रोमोनियम वगैरे अविघटनशील तुकडे व अनुकंद्रातील किरणोत्सर्गी सल्फेट, कोर्बोनेट, थायनाईड, फेनॉल इत्यादी रासायनिक पदार्थांचा समावेश होतो. यामुळे मातीतील वनस्पती व जीवजंतू मरतात आणि जमीन नापिक बनते. अशाप्रकारे जमिनीच्या भौतिक, रासायनिक व जैविक रचनेत व गुणधर्मात परिवर्तन होऊन जमिनीची गुणवत्ता आणि उत्पादन क्षमता यांचा ऱ्हास होतो, यालाच भू–प्रदुषण असे म्हणतात.

**5) अवकाश प्रदुषण :–** खगोलशास्त्राच्या जिज्ञासेतून अवकाशाचे ज्ञान मिळण्यास मदत होते. अवकाश म्हणजे ज्यामध्ये आपली पृथ्वी, सूर्य, सूर्यमालेतील अन्य सर्व ग्रह, तारे व आकशगंगा हया सर्व गोष्टी आकाशात तरंगत आहेत असे दिसून येते. या पोकळीलाच अवकाश अे म्हणतात. वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे अवकाशात जाऊन पाहणे मानवाला शक्य झाले आहे.

विश्वाच्या निर्मितीचे रहस्य घेण्याची मानवाची महत्वकांक्षा आहे. या महत्वकांक्षेच्या पूर्तीसाठी वैज्ञानिकांची सतत धडपड सुरू आहे. चंद्र व मंगळावर मानवाच्या वसाहती स्थापन करणे, पृथ्वीप्रदक्षिणा अंतराळप्रवास याबाबत पर्यटकांची हौस पूर्ण करणे या दिशेने वैज्ञानिक व तंत्रज्ञानाचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नामुळे मानवाचे अवकाशातील हस्तक्षेप मोठया प्रमाणात वाढत आहे. यामधूनच अवकाश प्रदुषणाची समस्या निर्माण झाली आहे.

अंतराळ संशोधन करण्यासाठी सर्वच राष्ट्रांची घोडेदौड सुरू आहे. ही घोडदौड पूर्ण करण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब केला जातो. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते मी म्हणजे जगावर प्रभूत्व प्रस्थापित करण्याची आकांक्षा! आकांक्षापूर्तीसाठी विध्वसंक शस्त्रे, अण्वस्त्रे आणि प्रामुख्याने क्षेपणास्त्रे यांचा चाचण्या मोठया प्रमाणावर केली जातात. तसेच एखादया देशावर एकाचवेळी अनेक क्षेपणासत्रे आढळली तर त्यांच्यापासून कोणत्याही प्रकारचे सरंक्षण करता येत नाही. इत्यादी प्रकारे होणाऱ्या प्रदुषणामुळे ''ओझोन'' च्या पडद्याला छिद्रे पडली आहेत. ग्रीन हाऊसचा प्रभाव वाढत आहे.

**प्रदुषणाचे परिणाम :–** पर्यावरणातील प्रदुषणाचा अत्यंत प्रतिकुल परिणाम म्हणजे नैसर्गिक असंतुलन निर्माण झाले.त्याचा जीवसृष्टीवर देखील वाईट परिणाम होत आहे. तसेच मानवसमाजावर सुध्दा पर्यावरण प्रदुषणाचा प्रतिकुल परिणाम झालेला आहे. पर्यावरण प्रदुषणाचे दूरगामी होणारे परिणाम ठळकपणे पुढीलप्रमाणे दर्शविलेले आहेत.

**1) वातावरणातील परिणाम :–** पर्यावरण प्रदुषणाचा दूरगामी परिणाम वातावरणावर झाला आहे. या वातावरणातील प्रामुख्याने अनिष्ठ परिणाम झाले व होत आहेत. वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड व हरितगृह वायुंचे प्रमाण वाढत असल्यामुळे पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. ओझोन थर

पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीचे सुर्याच्या अत्यंत प्रखर अतिनील किरणांपासून सरंक्षण करतो परंतु पर्यावरण प्रदुषणामुळे ओझोन थराला छिद्रे पडले आहेत. त्यामुळे पृथ्वीवरील मानवसहित सर्व सजीव सृष्टिच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे.

**2) वनस्पतीवरील परिणाम :–** पर्यावरण प्रदुषणांमुळे वनस्पतीवर परिणाम होतो. हवेतील कणरूप प्रदुषके वनस्पतींच्या पानांवर पसरल्याने त्याची श्वसन क्रिया मंदावते आणि ऑक्सीजनची निर्मिती पाहिजे तेवढया प्रमाणात करू शकत नाही. तसेच वृक्ष–वनस्पतीची वाढ खुंटते. आम्लपर्जन्य वनस्पतींना घातक आहे. त्यातील गंधकाम्लामुळे वनाचा नाश होतो.

**3) प्राण्यावरील परिणाम :–** पर्यावरण प्रदुषणामुळे प्राणी जीवनावर विपरीत परिणाम होतो. पर्यावरणातील दुषित गवत, झाडाची पाने, फुले, मुळे वगैरे जनावरांनी खाल्याने त्यांना विषबाधा होते आणि वन्यप्राणी, पक्षी व पाळीव प्राणी यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत आहे.

**4) जनपरिसंस्थेवरील परिणाम :–** पाण्यातील प्रदुषणामुळे जलपरिसंस्थेवर परिणाम होतो. पाण्यातील प्राणवायू वाढविणाऱ्या वनस्पती सूक्ष्मजीव त्यावर जगणारे मासे, तसेच त्यावर जगणारे पशूपक्षी व इतर जीव यांची अन्न सावली नाश पावते. भारतात नद्यांच्या संगमावर अनेक तिर्थ क्षेत्रे आहेत. त्याठिकाणी लाखो भाविक स्नान करतात, कपडे धुतात, जनावरे धुतात तसेच औद्योगिकरण नद्यांव्दारे सोडलेले सांडपाणी यामुळे पाणी दुषित होऊन त्यात सूक्ष्मजीवनजंतूची प्रचंड प्रमाणात वाढ झाल्यामुळे तसेच प्रदूषित पाण्यात शेवाळाची वेगाने वाढ होते. पाणवनस्पती व जलपर्णी यांचीही वाढ होते. तसेच पाण्यातील ऑक्सीजन त्यांना भरपूर प्रामणात लागते आणि जलचर प्राण्यांना ऑक्सिजन कमी पडत असल्याने त्यांचा मृत्यू होतो.

**5) जमिनीच्या उत्पादन क्षमतेवरील परिणाम :–** जमिन प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याचे विपरीत परिणाम जमिनीवर होऊन जमिन प्रदुषणाची समस्या निर्माण होते. किटकनाशके, जंतुनाशके आणि तणनाशकांच्या वापरांमुळे मातीतील विघटनकारी व मातीची सुपिकता वाढविणारे सूक्ष्म जीवाणू नष्ट होतात. मृदांकण विस्कळीत होतात. त्यामुळे मृदेंची झीज झपाटयाने होते. जमिनीची सुपिकता नष्ट होऊन कालांतराने जमिन ओसाड बनते. अर्थात जमिनीची उत्पादन क्षमता कमी होते. त्यामुळे शेती उत्पादनात घट होऊन अन्नधान्याची कमतरता निर्माण होते.

**6) मानवाच्या आरोग्यावरील परिणाम :–** पर्यावरणातील प्रदुषणाचा फार मोठा दुष्परिणाम मानवाच्या आरोग्यावर पडतो. वातावरणातील दुषित हवा शरीरात गेल्यास फुफ्फुसे, नाक, कान, घसा, रक्ताभिसरण इत्यांदीचे विकार जडतात. दुषित पाण्यामुळे साथीचे रोग, पचनसंस्थेत बिघाड, अतिसार, कावीळ, कॉलरा, विषमज्वर इत्यादी रोग जडतात. विविध रसायनामुळे दमा, कॅन्सर, रक्ताक्षय होतो. परायुक्त पाण्यामुळे चेतनसंस्थेचे विकार, त्वचारोग, अर्धांगवायू, वेडसरपणा, अपंगत्व येते, ध्वनीप्रदुषणामुळे मानवी आरोग्यात बिधाड होतो.

**पर्यावरण नियंत्रणाचे उपाय :–** पर्यावरण प्रदुषणाचे मानवासहित सर्वच सृष्टिवर अतिशय गंभीर स्वरूपाचे परिणाम होत आहेत. याचा उगम विविध मार्गाने होत आहे. उदा. वायुप्रदुषण, भूमी प्रदुषण, जलप्रदुषण इत्यादी प्रकारच्या प्रदुषणाचा जीवसृष्टीवर वाईट परिणाम पडला आहे. यापासून बचाव करण्यासाठी पर्यावरणाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. यासाठीचे विविध उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

**1) वृक्ष व वनस्पतीचे संवर्धन :–** वायुप्रदुषण हे मानवासाठी घातक आहे. तेव्हा वायूप्रदुषण रोखण्यासाठी वृक्ष व वनस्पती यांचे मोठया प्रमाणात संवर्धन करणे गरजेचे आहे. कारण वृक्ष व वनस्पती हे वायूप्रदुषणाचे नैसर्गिक नियंत्रक आहेत. म्हणून वृक्षतोडीवर निर्बंध घालून औद्योगीक क्षेत्रात, कारखान्याला लागून तसेच शहरांच्या परिसरात रस्त्याच्या आजूबाजूला वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करणे आणि वनिकरणाला प्रोत्साहन देणे ही आजच्या काळाची गरज आहे.

**2) दुषित पाण्याचे शुध्दीकरण :–** शहरामधील सांडपाणी आणि इतर टाकावू पदार्थ नदीनाल्यात सोडण्यापूर्वी त्यावर प्रक्रिया करून त्यातील अशुध्द घटक बाजूला ठेवावे आणि शुध्द झालेले पाणी सिंचन करावे. याविषयाची प्रक्रिया नागपूर शहरात केली जात आहे. तसेच कारखान्यातील प्रदुषीत पाण्याचे शुध्दीकरण करणे गरजेचे आहे. कारण त्यात पारा, शिसे, रसायने, क्षार इत्यादी असतात. ती वेगळी करण्याची प्रक्रिया करणे हे उद्योगांना बंधनकारक असले पाहिजे तसेच घनकचरा जलाशयामध्ये न सोडता तो खोल खडड्यामध्ये पुरणे हे बंधनकारक असले पाहिजे.

**3) कारखान्यावर प्रदुषण विरोधी योजना बंधनकारक करणे.:–** कारखान्यातील धुरांडी तसेच स्वयंचलीत वाहनांची उत्सर्जके यांना बसवलेली गाळणे ही धुरांडयावाटे कणरूप पदार्थ अडकतील अशी असावी. धुरांडयाची उंची वाढविल्यास धूर उच्च वातावरणात जाईल आणि निदान खालच्या थरात हवेचे प्रदुषण कमी होईल. यामुळे लोकांच्या श्वसनाला त्रास होणार नाही.

याकरिता कारखान्यावर प्रदुषणविरोधी योजना बंधनकारक करावी.

**4) जलशुध्दीकरण योजना राबविणे. :–** पाणी हे जीवन आहे. जीवनच प्रदुषित असेल तर मानवाच्या आयुष्यावर प्रश्न चिन्ह निर्माण होते. अर्थात याचे विपरीत परिणाम संपूर्ण जगासमोर निर्माण झाले आहे. याची खानेवारी पाहली असता, असे दिसून येते की, जगातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे 100 कोटी लोकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही. विकासाच्या उंबरठयावर असलेल्या देशात तर स्वच्छ पाण्याअभावी कोटयावधी लोक आजारी पडतात. प्रदुषित पाण्यामुळे दरवर्षाला सुमारे 3 दशलक्ष मुले मरतात तर सुमारे 90 कोटी लोकांना पोटाचे विकार जडतात. कॉलरा, गॅस्ट्रो असे रोग होऊन लाखो लोक मृत्युमुखी पडतात. तेव्हा जलप्रदुषणाच्या परिणामापासून लोकांना वाचविण्यासाठी जलप्रदुषणाच्या नियंत्रणाचे उपाय पुढीलप्रमाणे आहे.

1) जलप्रदुषणाची समस्या ही वैयक्तिक बाब नसून ती प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाब असल्यामुळे यासाठी सामुदायिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. 2) शहरातल सांडपाणी, टाकाऊ पदार्थ व विसर्जित केलेली घाण नदी, नाल्यात किंवा समुद्रात सोडण्यापूर्वी त्यावर संस्करण प्रक्रिया केल्यानंतर ते सोडावे तसेच सयंत्राकरिता सरकारने पुरेसा फंड उपलब्ध करून घ्यावा. 3) धार्मिक दृष्टया निर्माण होणारे जलप्रदुषण जसे उत्साहाच्या मुर्ती, निर्माल्य तसेच मृतजनावरे हे हया गोष्टी तलावात, नदीत, विहिरीत इत्यादी ठिकाणी टाकल्या जावू नये यासाठी लोकशिक्षणातून व्यापक स्तरावर जनजागृती करणे. 4) कारखाने, उद्योगातील प्रदुषके रोकण्यासाठी जलशुध्दीकरण प्रक्रिया संयत्रे उभारून ती कार्यवाहीत ठेवावीत. 5) सागरांमध्ये तेल गळती होणार नाही याची दक्षता घ्यावी. 6) अन्नधान्य उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शेतीत सेंद्रिय आणि रासायनिक खतांचा समतोल असावा. 7) सरकारने जलप्रदुषणासंबंधी कडक निर्बंध लादुन त्याची योग्य ती अंमलबजावणी करणे. 8) पाणी शुध्दीकरणाच्या नवनवीन उपायांसाठी वारंवार संशोधन व्हावयास हवे. 9) जलप्रदुषण नियंत्रणाची माहिती देऊन तसेच पाण्याचे महत्व काटकसर पाणी प्रदुषणाची कारणे प्रकार व त्यावरील उपाय या विषयी समाजजागृती करणे गरजेचे आहे. अशाप्रकारे सामुदायिक प्रयत्न केल्याने जलप्रदुषणाच्या समस्येचे निराकरण होऊ शकते.

**5) रासायनिक खते व किटकनाशकांचा वापरावर मर्यादा घालणे :–** रासायनिक खते व किटकनाशकांचा अतिवापरामुळे शेतजमिनीच्या गुणवत्तेवर फरक पडून ते नापिक होते. विषारी जंतुनाशकांच्या अतिवापरामुळे एकीकडे शेतजमिनीचे उत्पादन क्षमता कमी होत जाते. तर दुसरीकडे हे सर्व पदार्थ मानवी आरोग्याच्या दृष्टिनेही घातक असतात. अशाप्रकारची घातकता टाळण्यासाठीचे नियंत्रणात्मक उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

1) रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर कमी करून त्याऐवजी नैसर्गिक खते व किटकनाशकांचा वापर वाढवावा. 2) शेतीतील काडीकचरा, तण, सड इत्यादींपासून कंपोस्ट खत तयार करावे. 3) जनावरांपासून तयार झालेल्या शेणखताचा वापर करावा. या नैसर्गिक खताचा वापर हा शेतीसाठी विकास उत्पन्न झालेल्या अन्न–धान्याची सकसता वाढेल आणि मानवाचे आरोग्य देखील सुदृढ राहील. 4) रासायनिक खते व किटकनाशकांच्या अतिवापरामुळे अन्न धान्याची तात्पुरती वाढ होते. पण त्यात सकसता नसते. 5) फळांवर किटकनाशकांचा फवारा केल्याने फळे विषारी बनतात. अशा फळांच्या सेवनाने विषबाधा होण्याची शक्यता असते. 6) शेतीत वापरली जाणारी रासायनिक खते व किटकनाशके यामुळे दिवसेंदिवस मृदा प्रदुषणाची समस्या गंभर रूप धारण करीत आहे.

अशाप्रकारे रासायनिक खते व किटकनाशकांच्या अतिवापरामुळे होणारी हानी लक्षात घेऊन जनजागृती करणे आजच्या काळाची गरज आहे.

**6) अपारंपारिक सौर उर्जेचा वापर करणे :–** सौरउर्जा हे महत्वाचे अपांरपारिक उर्जा संसाधन आहे. सौर उर्जा सूर्यकिरणापासून सहज आणि मुबलक प्रमाणात पृथ्वीवर उपलब्ध होते. पृथ्वीपासून अंदाजे वय करोड कि.मी. वर असलेला सुर्य एक तप्तगोळा असून उदजन (60%) आणि हिलीयम (28%) हया मुख्य मुलद्रव्यांचा बनलेला आहे. त्यांच्या केंद्रीय भागाचे तापमान 1.5 ग $10^7$ केल्वीन आहे. आण्विकमुळे सुर्यावरील उदजन (Fusion) वायुंचे सतत हिलीयम वायुमध्ये रूपांतर होऊन हया क्रियेत प्रचंड उर्जा उत्सर्जित होते. तेव्हा उर्जेच्या विद्युत चुंबकीय लहरी आणि भारित कणांच्या स्वरूपात किरणांव्दारे पृथ्वीवर पोहचतो यामुळे पृथ्वीला उष्णता आणि प्रकाश मिळतो. यामुळेच परिसंस्थेतील सर्व सजीव जगत आहेत.

सौरउर्जेचा वापर अमेरिका, जपान, इस्त्राईल इत्यादी देशात औद्योगिक व घरगुती वापरासाठी केला जातो तसेच भारतातील राजस्थान व आंध्रप्रदेशात कृषी व घरगुती कार्यात व्यापक प्रमाणात वापरला जातो. या उर्जेच्या वापरामुळे कोणत्याही प्रकारचे प्रदुषण नसल्यामुळे त्याचा वापर करणे कसे गरजेचे आहे ते पुढीलप्रमाणे –

1) पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टी सौर उर्जेमुळे विकसित झाली आहे आणि जगत आहे. 2) सौरउर्जेचा वापर विद्युत उत्पादनासाठी, सौर उपकरणांव्दारे गरम पाणी आणि भोजन मिळविण्यासाठी होतो. 3) सौरउर्जा ही सुर्यापासून मिळणारी अखंड उर्जा पारंपरिक आणि क्षयी उर्जा संसाधनाऐवजी वापरता येणे शक्य आहे. 4) सौरउर्जेचा उपयोग औद्योगिक आणि घरगुती क्षेत्रात करता येते. त्यासाठी उर्जा संग्रहित करणे,वाहून नेणे, इत्यादीसाठी तंत्राचा व उपकरणाचा विकास होणे गरजेचे आहे. 5) अपरंपरागत सौर उर्जेसाठी अपरंपरागत इंधनाच्या संशोधनावर भर देण्यात आला पाहिजे.

**7) पर्यावरण कायद्याची योग्य अंमलबजावणी करणे** :– पर्यावरण संतुलनासाठी आणि प्रदुषण रोखण्यासाठी भारत सरकारने वेळोवेळी अनेक कायदे केले आहेत. जसे पर्यावरण संतुलनासाठी भारत सरकारने 1952 मध्ये वननीती जाहीर केली. वन्यजीवन सरंक्षण कायदा 1972, जलप्रदुषण बचाव व नियंत्रण कायदा 1980, वायुप्रदुषण व नियंत्रण कायदा 1981, राष्ट्रीय पर्यावरण निवाडा कायदा 1995 आणि जीवविविधता कायदा 2002 इत्यादी कायदे हे शासनाने पर्यावरण प्रदुषण रोखण्यासाठी केले आहेत. या सर्व कायद्यांची योग्य अमंजबजावणी झाल्यास पर्यावरण प्रदुषण रोखल्या जावू शकते.

**8) पर्यावरण शिक्षण व जनजागृती करणे** :– वाढते पर्यावरण प्रदुषण रोखण्यासाठी जनजागृतीची गरज आहे. यासाठी सर्व प्रथम पर्यावरण शिक्षण दिले पाहिजे. यात पर्यावरणाचे महत्व व प्रदुषणामुळे होणारी हानी याविषयीचे शिक्षण सर्व पातळीवर दिले पाहिजे. पर्यावरण जर आपल्या घरापासून सुरू होते तर त्याचे सरंक्षण करणे आपले देखील कर्तव्य आहे. रोगाच्या साथींची ज्याप्रमाणे आपण स्वतः प्रतिबंधक उपाय करतो. तसे प्रयत्न आपण सभोवतालचे पर्यावरण स्वच्छ राखण्यासाठी केले पाहिजे. प्रसार माध्यमांना यात सिहांचा वाटा उचलता येईल. आपले प्रयत्न राजकीय, इच्छाशक्ती व प्रसारमाध्यमे, वर्तमानपत्र, दूरदर्शन, रेडीओ इत्यादींच्या संयुक्त विद्यमाने समाजात पर्यावरणाची चेतना यशस्वीपणे जागृत करता येईल.

.....................................................................................................

**संदर्भग्रंथ**

1) डॉ. सुभाषचंद्र सारंग, पर्यावरण भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर

2) डॉ. रमेश उमाटे व प्रा. रेखा ठाकरे, पर्यावरणशास्त्र,वि.सा.बुक्स नागपूर.

3) डॉ. के.एम.भांडारकर, पर्यावरणशिक्षण, नित्यनुतन प्रकाशन, पुणे.

4) डॉ. मेघा सिन्हा, पर्यावरण अध्ययन, विजय प्रकाशन, वाराणसी.

5) प्रा. रा.ज. लोटे, भारतीय समाज, आव्हान आणि समस्या, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.

6) डॉ. तोष्णीवाल, भारतीय समाज, समस्या आणि प्रश्न, विश्व पब्लिशर्स नागपूर.

7) डॉ. प्रदिप आगलावे, भारतीय समाज, प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

8) डॉ. बी.एम. कऱ्हाडे, भारतीय समाज, प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर.

.....................................................................................................

-----------------------------------------------------------------------------------------------------------------

# ग्रंथालयातील मानव संसाधन विकास

**प्रा. सौ. रंजना व्यवहारे (तायवाडे)**, ग्रंथपाल, विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, न्यु नंदनवन, नागपूर

प्राचीन काळापेक्षा आधुनिक काळातील ग्रंथालयाचे स्वरूप हे बदललेले आहे. ग्रंथालयाच्या बदलत्या स्वरूपानुसारच ग्रंथालयातील कर्मचारी सुध्दा अद्ययावत असायला पाहिजे. ग्रंथालय संगणक व इंटरनेटच्या वापराशिवाय अधुरे समजल्या जाते. प्रत्येक काम हे संगणकाच्या माध्यमातून केल्या जात आहे. ग्रंथालयातील सेवेत इंटरनेटचा वापर होत असून नवीन नवीन संगणक आज्ञावली उपलब्ध आहेत. या आज्ञावलीचा वापर योग्य प्रकारे होण्याकरिता कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. ग्रंथालयातील सेवा अधिक कार्यक्षमतेने व प्रभावीपणे वाचकापर्यंत पोहचवण्याकरिता कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षित करणे आवश्यक झाले आहे.

**प्रस्तावना** :– ग्रंथालय हे सेवा भावी संस्था असून ग्रंथालयातून उत्कट सेवा पुरविण्याकरिता पुरेसा कर्मचारी वर्ग असायला पाहिजे. नुसता कर्मचारी वर्ग असून चालणार नाही तर तो प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग असायला पाहिजे. आज नवनवीन तंत्रज्ञान उदयास येत आहे. ग्रंथालयात नविन तंत्रज्ञान आज्ञावलीचा वापर सुरू झाला असून त्या नविन आज्ञावलीचा स्विकार करण्याची कर्मचाऱ्याची मानसिकता तयार असायला पाहिजे. ग्रंथालयात तीन महत्वाचे घटक असतात. 1) ग्रंथ संग्रह 2) उपभोक्ता वर्ग 3) कर्मचारी वर्ग. ग्रंथालयात ग्रंथाची भर पडत जावून ग्रंथाची संख्या वाढत जाणारी असते. या वाढत्या ग्रंथसंग्रहाची योग्य ती सांगड ग्रंथालयातील कर्मचारी वर्गाला करावी लागते. ग्रंथालयात येणाऱ्या उपभोक्त्याला योग्य ते साहित्य पुरविणे हे त्यांचे कर्तव्य असते. वाचकांचे, उपभोक्त्यांचे समाधान होणे हे ग्रंथालयाचे व ग्रंथालयीन कर्मचाऱ्याकरिता महत्वाची गोष्ट असते.

ग्रंथालय व्यवस्थापनात मानव संसाधन व्यवस्थापन ही एक महत्वाची बाब मानली जाते. कारण आपले ग्रंथालय हे मोठे आहे, ग्रंथांची संख्याही खूप आहे. तसेच सर्व सोई उपलब्ध आहेत, पण त्या सर्वात प्रशिक्षीत असा कर्मचारी वर्गच नसेल तर ते ग्रंथालयाचे अपयश आहे. कारण ग्रंथांना हाताळणारे व त्याचे व्यवस्थापन करणे हे कर्मचाऱ्याचे काम असते. ग्रंथालयात येणाऱ्या सेवकांचा प्रत्यक्ष संबंध कर्मचाऱ्यांशी येतो. कर्मचाऱ्यांना त्यात आवड असेल, त्यांची कार्यक्षमता योग्य असेल तरच योग्य प्रकारचे काम करू शकतील म्हणून ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे योग्य ते सहकार्य ग्रंथालयाला मिळण्याकरिता कर्मचाऱ्यांची निवड, कर्मचाऱ्याचे प्रशिक्षण, त्यांची पदोन्नती, सुरक्षितता, समस्या समजून घेऊन त्यांना जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे काम करण्याकरिता प्रोत्साहन देणे आवश्यक असते. याकरिता ग्रंथालयात मानव संसाधनाचे व्यवस्थापन करणे एक आव्हान झाले आहे.

**व्याख्या** :– 1) **पिटर** ''व्यवस्थापन हे बहुद्‌देशीय साधन आहे. त्यात उपयोगी धंद्याचे व्यवस्थापन होते. कामगार व काम यांचे व्यवस्थापन होते''. 2) **डेल चोडर** यांच्या मते, ''शक्तीच्या भव्य स्त्रोतांपैकी भिन्न असणाऱ्या मानव शक्तीचे वस्तुनिष्ठ नियंत्रण आणि उपयोग यांच्याशी संबंधीत असणारी व्यवस्थापनाची अवस्था म्हणजे कर्मचारी व्यवस्थापन होय.'' 3) **एडविन फिलप्पो** यांच्या मते, ''व्यक्तीगत, संघटनात्मक आणि सामाजिक उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी मनुष्यबळाची प्राप्ती, विकास, एकात्मता, क्षतिपूर्ती, भरणपोषण इत्यादी बाबी साध्य करता याव्यात म्हणून योजना आखणे, संघटन करणे, निर्देशन देणे व नियंत्रण करण्याला मानव संसाधनाचे व्यवस्थापन असे म्हणतात.''

**मानव संसाधन व्यवस्थापनाची उद्दिष्टये** :– कोणत्याही संस्थेची काही उद्दिष्टे असतात. ती उद्दिष्टये साध्य करण्याकरिता मानव संसाधन आवश्यक असते. म्हणून ग्रंथालय संस्थेत मानव संसाधन महत्वाचे अंग बनले आहे. कोणत्याही संस्थेची उद्दिष्टये हेच कर्मचाऱ्यांचे उद्दिष्टये असते. मानव संसाधन व्यवस्थापनाद्वारे ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात. ग्रंथालयातील तांत्रीक उपकरण सांभाळणे, त्यांची वेळोवेळी देखरेख करणे, ग्रंथाचे व्यवस्थापन करणे याची वेळोवेळी दखल घेत असतात. म्हणून ग्रंथालयात कर्मचाऱ्यांना अनुकूल ठरेल अशा पध्दतीचे नियोजन करणे, त्यांना गरजेनुसार प्रशिक्षीत करणे, आवश्यक तेव्हा तांत्रिक ज्ञान देणे, त्यांच्यात असलेल्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्या अंतर्गत गुणांना जागृत करणे, योग्य वेळी पदोन्नती देणे, यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण होऊन संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होते.

ग्रंथालय ही संस्था सेवाभावी संस्था आहे, ग्रंथालयात येणाऱ्या वाचक वर्गाचे समाधान करणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्टे कर्मचाऱ्याच्या सहकार्याशिवाय पूर्ण होणे शक्य नसते. कर्मचारी हे नेहमी शिकण्यास उत्सुक असले पाहिजे. त्यांच्यात कार्य करण्याची तळमळ असली पाहिजे. आजच्या स्पर्धेच्या युगात वेगवेगळ्या प्रकारची नवनवीन माहिती ही वाचकांना पाहिजे असते. ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग उत्सुक व सकारात्मक विचारांचे असतील तर ते वाचकांची गरज तात्काळ पूर्ण करू शकतात व ग्रंथालयाचा मूळ उद्‌देश साध्य करण्यास मदत मिळते. व त्यातूनच सामाजिक विकास साध्य करण्यास मदत होते.

**नियोजन** :– ग्रंथालयाच्या व्यवस्थापनात नियोजन हे महत्वाचे अंग आहे. ग्रंथालयाचे सर्वप्रथम कार्य, कार्याची योजना तयार करणे हे आहे. या योजना राबवितांना ग्रंथालयातील मानव संसाधनाचा विचार करावा लागतो. ग्रंथालयातील कोणतेही कार्य किंवा योजना राबवितांना त्या व्यवस्थित राबविल्या गेल्या पाहिजे, ग्रंथालयाचे ध्येय साध्य झाले पाहिजे. याकरिता योग्य मनुष्यबळाची आवश्यकता असते, याचा अंदाज होऊन वेगवेगळ्या स्तरावरिल कार्य करणाऱ्या कुशल, कार्यक्षम नेतृत्वाचे नियोजन करावे.

ग्रंथालयात मानव संसाधनाचे व्यवस्थापन करतांना प्रत्येक स्तरातील कार्याचा विचार करावा. प्रत्येकाची कामे वाटून देण्यात यावे. यामुळे कामात पुनरावृत्ती येणार नाही. तसेच ग्रंथालय सेवा अधिक परिणामकारक देता येतील. समजा एखाद्या कर्मचाऱ्याचे कार्य कुशलतापुर्ण व कौशल्यपूर्ण असेल तर त्याला प्रोत्साहन देऊन बाकीच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्याप्रमाणे काम करण्यास प्रवृत्त करता येते. हा योग्य नियोजनाचा भाग असतो.

**अभिप्रेरण** :– कोणत्याही ग्रंथालयाचे यशापयश हे त्यांच्या कर्मचाऱ्याच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. कुशल व कार्यक्षम कर्मचारी वर्ग ही कोणत्याही संस्थेची संपत्ती समजली जाते. ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग हा कुशल, कार्यक्षम व प्रामाणिक असेल तर ग्रंथालयाचे ध्येय साध्य करणे सोपे जाते. प्रत्येक कर्मचाऱ्यांमध्ये कामाप्रती ओढ व कोणतीही नवीन गोष्ट शिकण्याची जिद्‌द असली पाहिजे. नवीन तांत्रीक ज्ञान आत्मसात करून सेवा देण्यात त्याचा उपयोग करावा. कर्मचारी वर्ग नेहमी शिकण्यास तत्पर व कामाप्रती उत्साहीत असावे, याकरिता जे प्रयत्न केल्या जातात त्याला अभिप्रेरणा असे म्हणतात.

**ग्रंथालयात मनुष्यबळ** :– ग्रंथालय ही सेवाभावी संस्था असून ना नफा ना तोटा या तत्वावर चालणारी आहे. म्हणून यात मनूष्यबळास महत्व देण्यात आले आहे. ग्रंथालयात देण्यात येणाऱ्या सेवा या यंत्राद्वारे दिल्या जात असल्या तरी मानवी स्पर्श हा सेवेत महत्वाचा असतो. कारण काही सेवा मानवी स्पर्शाने पूर्ण होतात. आज ग्रंथालयात अद्यावत तंत्रज्ञान अज्ञावली आल्या असून त्याद्वारे नवनवीन माहितीची दालने उघडल्या गेली आहेत. पण त्या नवीन तंत्रज्ञान अज्ञावली बरोबर हाताळून सर्व कार्य व्यवस्थित पार पाडण्याकरिता ग्रंथालयातील व्यवस्थापनात मनुष्यबळ विकास हा महत्वाचा घटक मानला गेला आहे. ग्रंथालयात आवश्यक असलेल्या मनुष्यबळाचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे :–

1) उच्चस्तर – ग्रंथपाल.

2) मध्यस्तर– उपग्रंथपाल / सहायक ग्रंथपाल

3) निम्नस्तर – व्यावसायिक प्रशिक्षीत वर्ग

4) इतर वर्ग – अर्धशिक्षीत ग्रंथालय सहायक – लिपिक, शिपाई वर्ग.

5) इतर प्रशिक्षित वर्ग – संगणक हाताळणारे, प्रतिलिपी, तंत्रज्ञान, संदर्भलिपी तंत्रज्ञान, ग्रंथ बांधणीचे तंत्रज्ञान असणारे.

6) सर्वसाधारण कामगार :– चतुर्थ श्रेणीतला कर्मचारी वर्ग, सफाई कामगार, सुरक्षा कर्मचारी इत्यादी – ग्रंथालयातील काम व्यवस्थित पार पाडण्याकरिता या संपूर्ण मनुष्यबळाची आवश्यकता भासते.

**ग्रंथालयात मनुष्यबळ भरती निवडीचे स्त्रोत** :– ग्रंथालयात मनुष्यबळ भरती ही दोन प्रकाराने केल्या जाते. 1) अंतर्गत 2) बाहयस्त्रोत.

1) **अंतर्गत** – यात वरिष्ठ जागेवर नियुक्ती करायची असल्यास कनिष्ठ कर्मचाऱ्यालाच त्याच्या चांगल्या कार्यावरून लक्षात घेतल्या जाते व त्यालाच पदोन्नती देण्यात येते. यामुळे बाकीच्या कर्मचाऱ्याना प्रोत्साहन मिळून तेही आपली कार्ये अधिकाधिक कार्यक्षमतेने करण्यास उत्सुक राहतात. त्यांना ग्रंथालयाविषयी आपुलकी वाटू लागते.

2) **बाह्यस्त्रोत** – बाह्यस्त्रोत याकरिता कार्यालयीन अर्ज बोलाविला जातो. काही वृत्तपत्रातून जाहिराती दिल्या जातात. नंतर आलेल्या अर्जातून छाननी करून त्यांना मुलाखतीकरिता बोलाविण्यात येते व त्यातून त्यांची निवड करण्यात येते.

**ग्रंथालयीन कर्मचाऱ्याचे प्रशिक्षण** :– ग्रंथालय आणि इतर संस्था यामध्ये फरक दिसून येतो. बाकीच्या संस्थामध्ये काम करणारे कर्मचारी हे बहुसंख्यांक

असतात. पण ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या ही अल्पसंख्यांक असते. समाजाला सुसंस्कृत करयाचे काम ग्रंथालय करित असतात. म्हणून ग्रंथालयात काम करणारे कर्मचारी ग्रंथप्रेमी, ज्ञानपिपासू, सेवाभावी, जिज्ञासू, असावे. ग्रंथालय संस्था दिवसेंदिवस विकसित पावणारी संस्था आहे.

आज ग्रंथालयात नविन तंत्रज्ञाानाचा वापर सुरू झाला असून आपल्या ग्रंथालयातून सेवा देतांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कर्मचाऱ्यांना करता यावा, नवीन पध्दतीने सेवा प्रदान करता याव्यात म्हणून ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांने वेळोवेळी प्रशिक्षित होणे गरजे अरहे. प्रशिक्षणामधून ग्रंथालय कर्मचाऱ्याच्या कौशल्यामध्ये सुधारणा होवून आधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर सेवा देतांना करू शकतील. आज ग्रंथालयात संगणक, इंटरनेट, इ–सेवा, ई–बुक, ई–जर्नल, चा वापर सेवेत केला जातो. ग्रंथालयीन प्रत्येक कर्मचाऱ्याचे काम वेगळे असते. त्यांच्या कामाचे स्वरूप व महत्व बघून प्रत्येक कर्मचाऱ्याला कोणत्या प्रशिक्षणाची गरज आहे हे बघून प्रत्येकाला प्रशिक्षण देणे आवश्यक झाले आहे.

**ग्रंथालयातील कार्यविश्लेषण** :– ग्रंथालयात मानव संसाधन व्यवस्थापन करतांना कार्य विश्लेषण महत्वाचे आहे. ग्रंथालयात वेगवेगळे कामे असतात. ही कामे वेगवेगळ्या स्तरातील असतात. आणि त्या प्रत्येक स्तरावरिल काम करण्याकरिता प्रत्येक स्तरातील कामाच्या योग्यतेनुसार कर्मचाऱ्यांची निवड करण्यात येते. यालाच कार्यविश्लेषण असे म्हणतात.

ग्रंथालय प्रमुखाने अशा प्रकारे कार्यविश्लेषण करावे की त्यात ग्रंथालयातील सगळ्या लहान मोठ्या कामाचा समावेश झाला पाहिजे. ही कामे विविध कर्मचाऱ्यांमध्ये विभागतांना कामाचा दर्जा व कर्मचाऱ्याची शैक्षणिक पात्रता, त्याची क्षमता लक्षात घेणे गरजेचे राहिल. त्याच्या शिवाय ग्रंथालयातील कामात समतोलपणा राखता येणे शक्य होणार नाही.

**ग्रंथालयातील कार्य मुल्यमापन** :– कोणत्याही एखाद्या गोष्टीचे मुल्यमापन करायचे झाल्यास दुसऱ्या समगोष्टीशी तुलना करून त्या गोष्टीचे मुल्यमापन करावे लागेल. ग्रंथालयात कर्मचाऱ्यांच्या कामाचे मुल्यमापन करायचे असेल तर प्रत्येक कामाचा स्तर, त्याचे महत्व, त्याचे स्वरूप, त्या स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याची क्षमता या सर्व गोष्टी लक्षात घेऊन त्यांचे मुल्यमापन करायला पाहिजे. कोणत्या कर्मचाऱ्याचे कोणते व किती कार्य पार पडले व त्यासाठी त्याला कोणत्या प्रकारची शारीरिक व मानसिक गरजेची आवश्यकता लागली त्याचा विचार करून कार्य विश्लेषण करणे सोईस्कर होते. कार्य विश्लेषण केल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेचे व त्यांच्या ज्ञानाच्या विकासाचे महत्व ओळखू येते. त्यामुळे त्यांना पदोन्नती देतांना सोईचे पडते.

**सारांष** :– आधुनिक काळात ग्रंथालयाचे व्यवस्थापन बऱ्याच प्रमाणत बदलले असून तेथील कर्मचाऱ्याचे व्यवस्थापन सुध्दा त्यानुसार बदललेले दिसून येते. वाचकांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता ग्रंथालयात अमूलाग्र बदल झालेले आहेत. या सर्व बदलांना सर्वप्रथम ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना सामोरे जावे लागते. बदलत्या काळानुरूप कौशल्य आत्मसात करणे आवश्यक झाले आहे. याकरिता कर्मचाऱ्यांमध्ये ग्रंथालयाविषयी आत्मीयता, आदरभाव, सेवाभावीवृत्ती व आपल्या कामाप्रती प्रामाणिक असणे गरजेचे आहे. याकरिता ग्रंथालयातील मानव संसाधनाचा विकास अतिशय महत्वाचा मानला जातो. कारण ग्रंथालयाचे यश, अपयश हे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांवर अवलंबून असते म्हणून ग्रंथालयाला यश संपादन करण्याकरिता मानव संसाधन व्यवस्थपनास अतिशय महत्व दिल्या गेले आहे. कर्मचारी हा ग्रंथालयाचा कणा मानल्या गेला आहे. त्याकरिता त्यांना प्रत्येक वेळी योग्य त्या सोई उपलब्ध करून देणे हे ग्रंथालय व्यवस्थापकाचे प्रमुख कार्य आहे. कारण ग्रंथालयापासून समाज विकसीत होण्यास मदत होते.

.......................................................................................................

**संदर्भ सूची** :–

1) डॉ. प्रभाकर देशमुख, मानवी संसाधनाचे व्यवस्थापन, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर 2003

2) प्रा. बी. एल. जिभकाटे, मानवी संसाधनाचे व्यवस्थापन, विश्व पब्लिशर्स ॲड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर 2004.

3) एस. पी. पवार आणि इतर, ग्रंथालय व माहिती शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर 2009

4) डॉ. सत्यप्रकाश निकोसे, ग्रंथालय व्यवस्थापन, प्रज्ञा प्रकाशन, नागपूर 2007.

.......................................................................................................

# बहुजन समाज के कर्मचारियों में 'बामसेफ' द्वारा निर्मित की गई सामाजिक एवं राजनीतिक चेतना

**डॉ. वाय. डी. मेश्राम,** राजनीति विज्ञान विभाग, सेठ केसरीमल पोरवाल कॉलेज, कामठी, जि. नागपुर

बामसेफ संगठन 85% समाज का बना हुआ है। लेकिन वास्तव में इस संगठन में दलित कर्मचारी ही ज्यादा दिखाई देते है और व्यवहार में इस संगठन का संचालन भी दलित कर्मचारियों के हाथो में ही दिखाई देता है। बामसेफ संगठन ने इस बात पर गौर करके संगठन में 85% बहुजन समाज को कैसा लाया जाये, इन बातो पर शक्ती खर्च करनी चाहिए। भाषणों पर नही।

**1) बामसेफ क्या है? :–** 'बामसेफ' भारतीय एवं महाराष्ट्रीय समाज में, दलित, शोषीत, समाज के शिक्षीत कर्मचारीयों का एक क्रियाशील सामाजिक संगठन है। इसका अर्थ एवं संक्षिप्त रुप निम्नलिखित है, 'दि ऑल इंडिया बॅकवर्ड (एस.सी./एस.टी. /ओबीसी) एण्ड मायनॉरिटी कम्युनिटीज एम्प्लॉईज फेडरेशन' 'बॅकवर्ड' इस शब्द को भारतीय संविधान के संदर्भ में प्रयोग किया है। भारतीय संविधान के अनुसार दलित, शोषीत, समाज को तीन वर्गो में विभाजीत किया गया है। ये है – 1) अनुसूचित जाती 2) अनुसूचित जनजाती 3) अन्य पिछड़े वर्ग। भारत सरकार द्वारा 1953–54 तथा 1977–80 मे नियुक्त काका कालेलकर आयोग तथा बी. पी. मंडल आयोग इन दोनो आयोगो ने इस वर्गो की विशेष रुप से जनगणना की है। मुस्लीम, सिख, इसाई और बौध्द आदि धर्मो में परिवर्तीत इस दलित, शोषीत, जातीयों से संबंधित धार्मिक अल्पसंख्यांक लोग भी जातीयव्यवस्था के भेदभाव तथा शोषण के शिकार है इसको ही बामसेफ बहुजन समाज कहते है।

**2) बामसेफ का उद्देश :–** दलितों, शोषीतो, वंचीतो, पिड़ीतों तथा पिछड़ो को इकट्ठा करने का काम ज्योतिबा फुले, छत्रपती शाहु महाराज, ई. व्ही. पेरियार, रामासामी नायकर तथा डॉ. बाबासाहब अंबेडकर ने किया है। इसका परिणाम यह निकला की दलित शोषीत समाज में पढ़े लिखे कर्मचारियों का एक वर्ग बड़े पैमाने पर तैयार हुआ है। यह बात कांशीरामजीने ध्यान में रखी, और इस प्रदेशही नही तो देश के हर कोने–कोने में दलितो, शोषितो, वंचीतो, पिड़ीतो तथा पिछड़ो को तैयार करने लगे, उनको अनेको महाराष्ट्रो के तथा अन्य राज्यों के कर्मचारीयोने साथ दिया। कांशीराम कहते है, बामसेफ का महत्त्वपूर्ण काम है, समाज को देना और इस देश में सामाजिक, सांस्कृतिक एवं राजनीतिक परिवर्तन की पताका हम बहुजन समाज के लोगों को तैयार करके ही दम लेंगे। 'दि ऑल इंडिया बैकवर्ड (एस.सी./एस.टी./ओबीसी) एण्ड मायनॉरिटी कम्युनिटी एम्प्लॉईज फेडरेशन)' है। बामसेफ संगठन का उद्देश यह रहा है की जिन अभाग भाइयों में तुम्हारा जन्म हो गया है। उसकी तरक्की के लिए यथाशक्ती त्याग करना चाहिए यही बामसेफ का उद्देश, बामसेफ संगठन के कर्मचारी यह बामसेफ के ब्रेन बैंक, टेलेंट बैंक और फाइनेंशियल बैंक है। कांशीराम कहते है की, हम अपना आत्मनिर्भर, स्वाभिमानी, स्वावलंबी आंदोलन इसके माध्यम से चला सकते है' और यह उन्होने करके भी दिखाया है सारे भारत देश में।

**3) कांशीरामजी और बामसेफ :–** कांशीरामजीने जब बामसेफ की शुरुवात की तब उन्होने 365 दिन महाराष्ट्र और सारे भारत में दलितो, शोषीतो, पिड़ीतो, वंचीतो, पिछड़ो तथा आदिवासीयों के कर्मचारियों में सामाजिक एवं राजनीतिक चेतना जगाने के लिए महाराष्ट्र ही नही भारत के विभिन्न भागों में कार्यक्रम चलाये जैसे विभागीय, क्षेत्रीय, तथा प्रांतीय अधिवेशन, महिला, विद्यार्थी तथा युवको के विशेष प्रबोधन, परिसंवाद, क्या अम्बेडकरवाद का पुनरुत्थान हो सकता है? लॉंगमार्च का नेतृत्व कौन कर रहा है। महाराष्ट्र के दलितों में नेतृत्व का अभाव, लोकसंसद का सम्मेलन, महाराष्ट्र में दलितो, वंचितो, पिछड़ो, शोषीतों मे जागृती लाने हेतू सारे अंचलो में साईकिल मार्च का आयोजन किया था। साप्ताहिक/पाक्षिक/मासिक एवं स्वयं लिखीत किताबो द्वारा योगदान दिया था। वैसेही अनेको अखबारो के संपादको ने कहा है कि, 'कांशीराम ने अपना सर्वस्व, त्याग, सेवा, और समर्पण देकर दलितों, शोषितो, पिड़ीतो, वंचितो तथा पिछड़े कर्मचारीयों में सामाजिक एवं राजनीतिक योगदान दिया है। इस योगदान से दलितों, पिछड़ो, वंचीतो, शोषीतों और आदिवासीयों में आत्मसम्मान, निर्भयता, परिवर्तन,

समाज को कुछ देना है, समाज के साथ रहना है, अपनी खोई हुई शक्ती को वापस लाना है। फुले–शाहू–अंबेडकर को सफलता दिलानी है, छुआछुत, अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, जातीयवाद को समाप्त कर इस देश और विशेष रुप से इस महाराष्ट्र की सामाजिक एवं राजनीतिक व्यवस्था को बदलना है। ऐसा जज्बा कांशीराम ने बहुजन समाज के कर्मचारीयों में निर्माण किया था। 4)

**बामसेफ संगठन की क्रियाशीलता :–** भगवान बुध्द, सम्राट अशोक, संत कबीर, महात्मा ज्योतिबा फुले, पेरियार, रामासामी नायकर और शाहु महाराज ने अपने जीतेजी बहुजन समाज के अति दलित, पिडीत, शोषीत, पिछडे तथा वंचितो के समाज मे समज और हुनर पैदा करने का काम यह महापुरुषों ने अपने अलग–अलग अंदाज में किया है। जैसा की ब्राम्हणी व्यवस्था से पिड़ीत लोगो में तथागत ने अपने उपदेशों से चेतना जगायी, उसी प्रकार सम्राट अशोक, संत कबीर इन्होने भी ब्राम्हणी व्यवस्था यह कैसी विषमतावादी है और इसी में जलता हुआ यह देश और प्रदेश का बहुजन समाज का अति पिछड़ा वर्ग जिसमें दलित, शोषीत समाज पिछड़ रहा है। ऐसा कहकर इस देश और प्रदेश के बहुजन समाज के लोगो में चेतना जगाने का अनोखा काम किया है। डॉ. अम्बेडकर के पहले, फगुजी किसन बनसोडे, गोपालबाबा वलंगकर, वी. रवि मुनपंडित, कालीचरण नंदगवली, और शिवराम जानबा कांबले, इन तमाम लोगो ने दलितो, शोषीतो, वंचितो, अछुतो में चेतना जगाने का काम किया है। दलित पँथर, दलित साहित्यीक, कवी एवं गायकोने भी चेतना फैलाने का काम बहुजन समाज के कर्मचारीयोने किया है।

**5) वामन मेश्राम बी. डी. बोरकर और एस. एफ. गंगावने की बामसेफ की क्रियाशीलता :–** वामन मेश्राम, बी. डी. बोरकर और एस. एफ. गंगावने इन्होने राष्ट्रीय, राज्यीय परिसंवादो, प्रबोधनों के माध्यम से लोगो में चेतना जगाने का काम किया है। जैसे अंबेडकरवाद पर परिसंवाद, बामसेफ यह बहुजन समाज के कर्मचारीयों की तिसरी आँख है। हमे हमारे संगठन और समाज का विकास करना होगा, राजनैतिक क्रांती से धार्मिक क्रांती, सांस्कृतिक क्रांती को हमे लाना है। महिला, विद्यार्थी और युवको की समग्र समस्या का हल करना होगा। डॉ. अंबेडकर और फुले को समझकर हमने हमारी पत्रकारिता और मिडीया का निर्माण करना होगा। महाराष्ट्र की समस्या और ब्राम्हण बनिया प्रचार माध्यम और बहुजन समाज को ब्राम्हणवाद से मुक्त करना। घुमन्तू जातियों में वैचारिक परिवर्तन लाना, महाराष्ट्र क्यों पिछड़ा है, समाज उत्थान की समस्या मुसलमानोंने बनानी चाहिए। सामाजिक परिवर्तन के लिए सबसे ज्यादा धोका उदारमतवादी हिंदूओं से है। आजादी के 50 साल में शासक जातीयों ने बहुजनो के साथ क्या सलूक किया, महाराष्ट्र में नया नेतृत्व फुले–शाहु और अंबेडकरवादि लोगों में डर पैदा करके, शिवाजी महाराज का ब्राम्हणीकरण, संविधान बदलने की साजीश का पर्दाफाश करेंगे, गुलाम और गुलाम करनेवालों का धर्म एक नही। तालीबान और बुध्द प्रतिमा का विध्वंस, अपराध, भ्रष्टाचार और ब्राम्हणवाद, डॉ. अंबेडकर फिल्म के साथ धोकेबाजी। धर्म निरपेक्षता, गुजरात दंगे, एवं महाराष्ट्र के मुस्लीम मुलनिवासी समाज और ब्राम्हणवाद, ब्राम्हणवादियों का आजादी का आंदोलन बहुजन विरुध्द अल्पजन 15% बनाम 85% विधानसभा में चर्चा किए बगैर कानून पास करना। पूना करार एक झुठी साजीश। ओबीसी के आरक्षण पर अंमल ना करना। जानवरों की गणना, किन्तु हिंदू ओबीसी की नही। सच्चर कमिशन के मुताबिक यह काँग्रेस का धोखा है मुसलमानों के साथ।

**6) बामसेफ का समीक्षण :–** किन्तु इन बामसेफ के सारे ग्रुपो ने ऐसी, इस महाराष्ट्र और भारत के प्रमुख समस्या पर लोगों को जगाया, उनको समझाया मगर कांषीरामजी के बाद उपलब्धी शुन्य रही हैं। कांशीराम से बिखरे हुये नेता केवल भाषणबाजी करने में ही आघाडी में रहे है। किन्तु बहुजन समाज और उसके कर्मचारियों की समस्या को हल करने में यह बामसेफ संगठन पूर्ण रुप से विफल रहा है, उसी के साथ–साथ यह संगठन कौन–कौनसी समस्याओं को छुड़वाने में विफल रहा है वे निम्नलिखित है। 1)दंगे फसाद रोकने में छुआछुत अन्याय–अत्याचार गिराने में यह संगठन विफल रहा है। 2)आरक्षण को पूर्ण समय से लागू करवाने में यह संगठन असफल रहा है। 3)बहुजन समाज के कर्मचारीयों का पदोन्नति पर शोषण रोकने में यह संगठन विफल रहा है। 4) यह संगठन बहुजन समाज और उसके कर्मचारियों के समग्र समस्या का हल करने में विफल रहा है। 5) शिक्षा की समस्या का निराकरण करने में विफल। 6) केवल पिकनिक मनाते है बामसेफ के चोटि के नेता। 7) आंध्रा सरकार का निर्णय सुप्रीम कोर्ट ने मुसलमानों के आरक्षण के खिलाफ दिया है। इस बारे में यह संगठन कुछ भी नही कर सका। 8) इस संगठन ने अनेको कर्मचारियों की जिन्दगी तबाह कर दी है किन्तु उपलब्धि शुन्य रही है। 9) भारत के संविधान का यह संगठन पूर्ण रुप से

बचाव करने में असफल रहा है। 10) इस संगठन ने अनेको कर्मचारियों का सामाजिक संगठन बामसेफ जिसका चार बार विभाजन हुआ है। जैसे (1986, पहला), (1991 दुसरा), (1996 को तिसरा) और अंत मे 2003 को चौथा विभाजन हुआ है। 1986 से लेकर आज तक बामसेफ संगठन के टूटने के कारणो का यह कारण रहा है की, आपसी लढाई–झगड़े, स्वार्थ, प्रवृत्ती, अहंकार संगठनन मे झगड़े लगाने की प्रवृत्ती को बरकरार रखना ताकी कार्यकर्ता एक होकर सही निर्णय ना कर सके, और इन बदमाशो पर लोग निर्भर रहे जिससे चोटी के नेताओंकी मनमानी चलती रहे और इनकी नेतागिरी चमकती रहे भले ही समाज के कर्मचारियों का कुछ बने या न बने अथवा वो कही भी जाये हमे उनसे कोई लेनदेन नही है, ऐसा डी. के. खापर्डे, वामन मेश्राम, बी. डी. बोरकर, एस. एफ. गंगावने, तथा तेजींदर सिंग झल्ली का दृष्टिकोन था। न्यायपालिका लष्कर और निजी उद्योग में आरक्षण आजादी के बाद से बहुजन समाज को नही मिला है। न्यायपालिका के न्यायाधिश भ्रष्ट हो चुके है। निजी उद्योगो को सेज के नामपर शासक लोग बढावा दे रहे है। बड़े–बड़े उद्योगपतीयों को किसानो की जमीन कम किंमत पर दे देते है। उनको पाणी, बिजली, और सड़क की व्यवस्था भी कम किंमत में दी जाती है। इस उद्योग में बहुजन समाज के लोगो को और उनके कर्मचारीयों को आज तक आरक्षण की सुविधाए देने में और सरकार पर दबाव तंत्र का इस्तेमाल करने में यह संगठन कांशीरामजी के बाद में विफल हो चूका है। पुलीस प्रशासन की ओर से दलित, शोषित, पिड़ीत और वंचीत समाज पर अन्याय अत्याचार हो रहा है। अनेको बेकसूर लोगो को जेलो में ठुसवा दिया जा रहा है। और कसुरवार लोगों पर पुलिस प्रशासन चूप रहता है इसीलिए की पुलिस प्रशासन में भ्रष्टाचार बड़े पैमाने पर मौजूद है। इस मसलो पर बामसेफ ने कोई भी गल्ली से विधानसभा तक और दिल्ली के संसद तक कोई भी आंदोलन नही किया है। इसी कारणवश यह बामसेफ संगठन नाम के लिए बामसेफ रहा है लेकिन बहुजनों के लिए यह नामशेष रहा है यही इसकी महानतम विफलता है। और आगे कुछ करेगी ऐसी उम्मीद दूर–दूर तक दिखाई नही देती है।

**7) बामसेफ को सुधरने हेतू कुछ महत्त्वपूर्ण सुझाव** :– 1) पिछले 50 वर्षो में लगभग 70% ग्रामीण दलितो, पिड़ीतो और वंचीतो ने अपना गाव छोड़ दिया है। इसका मुख्य कारण जातीवाद रहा है। इन दलितो, शोषितो और वंचीतो के पास गावों मे भूमी नही है। और जो थोडी बहुत है वह भी बेकार पड़ी है। अच्छी भुमी तो उच्च वर्गो द्वारा छीन ली गई है। यही कारण है कि आज अधिकतर भूमीहिन व सीमांत किसान दलितो, शोषितो, पिड़ीतो और वंचीतो के वर्ग के ही है, इन वर्गो पर बामसेफ संगठन ने ध्यान देना चाहिए। 2) दलितो शोषितो के जो चमड़ो से संबंधित छोटे उद्योग थे वो आज उच्च वर्ग के हातों के खिलौने बन गये है। बामसेफ ने इसपर आंदोलन करना चाहिए। 3) आज के कम्प्युटर युग में दलित, आदिवासी और शोषितो के कर्मचारीयों के बच्चो को केवल आरंभिक शिक्षा ही मिल पाती है। कम्प्युटर की उच्च शिक्षा के खर्च का भार इस वर्ग के लोग वहन नही कर सकते। अतः इन दलितो को केवल टायपिंग आदि का ही कार्य मिल रहा है। इस पर बामसेफ संगठन ने ध्यान देने की जरुरत है। 4) इस देश और महाराष्ट्र में दलितों, शोषितों और पिड़ीतो पर आए दिन अन्याय–अत्याचार की सीमा बढ़ चुकी है। इस अत्याचारों पर लगाम लगाने हेतू राज्य स्तर पर आयोगों का गठन हो चुका है। परन्तू यह आयोग कोई भी कार्य नही कर पा रहे है, जिस प्रकार उन्होने करना चाहिए। इस आयोग में बैठे हुए लोगों पर दबाव लाने का काम बामसेफ संगठन के सभी गुटो ने करना चाहिए। 5) बामसेफ संगठन 85% समाज का बना हुआ है। लेकिन वास्तव में इस संगठन में दलित कर्मचारी ही ज्यादा दिखाई देते है और व्यवहार में इस संगठन का संचालन भी दलित कर्मचारियों के हाथो में ही दिखाई देता है। बामसेफ संगठन ने इस बात पर गौर करके संगठन में 85% बहुजन समाज को कैसा लाया जाये, इन बातो पर शक्ती खर्च करनी चाहिए। 6) उँची जातियाँ जैसे ब्राम्हण, बनीया तथा बड़ा जमीनदार इन लोगों के साथ दबंग मराठा और कुनबी जातियों में शहरो तथा ग्रामीण इलाको में भी दलितो, शोषितों के उपर बड़े पैमाने पर अन्याय–अत्याचार की घटनाएँ हो रही है। जैसे खैरलांजी का कांड। बामसेफ संगठन ने मराठा कुनबी जातीयों में अंबेडकरवाद के प्रति समझदारी बढ़ाने की आवश्यकता है। यह बामसेफ ने करना चाहिए। 7) इस प्रदेश और देश में जो निजी संस्था है उनमे टाटा, बिरला, अंबानी बंधू, थापा और किर्लोस्कर ये उद्योगपति दलितों, शोषितों, पिड़ीतो और वंचित समाज को नीच समझते है। और उद्योगों में आरक्षण को नकारते है। यह उनका मनूवादि और प्रतिगामी दृष्टिकोन है। (शेष पृष्ठ 55 पर....)

ISSN 2278-3199

*Published By*

**DEPARTMENT OF SOCIOLOGY**

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE & SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in

Website - www.snmorcollege.org.in

Phone No. - 07183-233300 / 07183-233301

Mobile - 09422113067 / 09420359657, 08857078577